
आधुनिक केसरी

# विरोधाचे विराट रुप...!






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## चहा घ्यावा, चहा द्यावा ...!

आधुनिक केसरी



ही डॉक्टर मंडळी ना, कमालीची अरसिक बुवा...! नाहीतर काय ? काहीही सांगतात...! म्हणे दुपारी झोपू नका. आता दुपारची एखादी डुलकी घेतल्यावर किती फ्रेश वाटते ते यांना कोण सांगणार...! नंतर म्हणे चहाघेऊ नका, भजी इ. सारखे तळलेले पदार्थ खाऊ नका. सगळा नन्नाचा पाढा. आपण म्हणतो ना नकारात्मत्क बोलू नये. पण ते यांना ते कोण सांगणार... ? आणि ते जे होकारात्मक सांगतात ते मानवत नाही. उदा. लवकर उठा, व्यायाम किंवा योगा करा. उकळलेले पाणी प्या. वगैरे. आणि हो डॉक्टरांकडे जाताना अशा वेळी सौ बरोबर नसली म्हणजे मिळवली. " नाहीतर बघा, मी म्हणत होते ना...पण माझं मेलीचं कोण ऐकत... ? असे काही ऐकून घेण्याची तयारी ठेवावी." या डॉक्टरांच्याही पार्ट्या होतात म्हणे...! ओल्या वगैरे मी म्हणत नाही. त्यावेळी सगळे चालते मग पेशंटलाच गंभीर चेहऱ्याने असे सल्ले का देतात कुणास ठावूक ? ( हा सर्व मजकूर डॉक्टर मंडळींची माफी मागून लिहिला आहे. काय आहे बरेच डॉक्टर माझे मित्र आहेत. त्यांच्याकडे केव्हाही जावे लागेल तेव्हा माझी खैर नाही. ) मंडळी हे सगळे लिहायला कारण असे झाले की, काल मी दुपारी थोडा वेळ झोपलो होतो. म्हणजे रोजच थोडा वेळ डुलकी चांगल्या शब्दात सांगायचे तर वामकुक्षी घेतो. काल जाग आल्यावर उठून पहिले तर मस्त पाऊस पडत होता. अशा वेळी माझा आवडता छंद म्हणजे बाहेर येऊन बसणे. आणि पाऊस न्याहाळणे. पावसाचा आनंद घेणे. हा आनंद घेत असताना हातात वाफाळत्याचहाचा कप असेल तर काय मजा येते महाराजा ..! ( अशा वेळी गरम कांदा भजी असतील तर काय विचारता..! वि वा शिरवाडकरांना कांदा भजी खूप आवडत असत असे ऐकले आहे. या बाबतीत त्यांच्या आणि माझ्या आवडी जुळतात. पण कांदा भजी हा वेगळा विषय आहे.आजचहाबद्दलच बोलू या. ) **क्रमशः**



## आनंदी पहाट

## संस्कार हे संस्कृतीनेच प्राप्त होतात

आधुनिक केसरी

विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. खरे तर, संस्कार संस्कृतीनेच प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## शीतयुद्ध....

आधुनिक केसरी

भारत आणि पाकिस्तानातं नेहमीच शीत युद्ध चालू असते. हे आपल्याला माहित आहे. पण मुलं ,आई-वडील, भाऊ-बहीण, नातेवाईक यांच्यातही शीतयुद्ध असतं . हे ऐकायला जरा जड जातं... पण असतं!! ते असू नये यासाठी आपण प्रयत्न करावे. आपल्या मुलांमध्ये व त्यांच्या मित्रांमध्ये कधीकधी शीत युद्ध चालतं. मुलं लहान असताना त्यात आपण मध्यस्थी करावी. व ते युद्ध तेवढ्याच शांतपणे संपवावं. म्हणजे मोठेपणी आपली मुलं शीतयुद्धात अडकणार नाहीत. अडकली तरी आपण त्या युद्धात सहभागी होऊ नये. तटस्थ पण राहू नये. मध्यस्थीची भूमिका घ्यावी. मुलांवर जबाबदार नागरिक म्हणून एक चांगला संस्कार घडवावा. बेजबाबदार पणाचा संस्कार नको. मोठ्यांशी कसं मानानं वागावं, बोलावं हेही सांगावं. आपल्या वर्तणुकीतून लहान वयातच मुलांमध्ये वागण्या बोलण्याचं प्रौढत्व नको. त्यांच्या वयाला साजेसं त्यांचे वागणं बोलणं असावं . हे आई वडिलांनी मुलांना शिकवावं. " आपला तो बाळ्या अन दुसऱ्यांचं ते कार्ट" ही शिकवण अजिबात नको. समोरचा माणूस कुरुप, वंगाळ, रंक,राव, प्रतिभावान, सुंदर, लहान मोठा कसाही असो, त्याचा योग्य तो मान राखावा. त्याच्याशी आदराने बोलावे. शेवटी तो माणूसच असतो. जनावराला सुद्धा प्रेम दिले तर ते प्रेमाने आपल्याकडे पाहते. जवळ येते. मग माणसांना का नाही? कुत्र्यावर प्रेम करायचे आणि आई बापाला वृद्धाश्रमात पाठवायचे. कुठला संस्कार तुम्ही तुमच्या मुलांवर करत आहात?? तुमचं भविष्य त्याच्याच हातात आहे .तो सर्व पाहत असतो. बाबा तुम्ही आजोबाशी असेच वागत होता ! असं तो जेव्हा म्हणतो ना तेव्हा केलेल्या पापाचा पश्चाताप सुद्धा करता येत नाही. वेळ हातातून जाण्याआधीच तिला धरून ठेवा. आपले व मुलांचे आयुष्य शीतयुद्धातून वाचवा ....संस्कारशील बनवा आयुष्याला....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-53

## श्री जनार्दनस्वामी

आधुनिक केसरी

इस्लामी सत्तेत देवगिरी अथवा दौलताबाद येथे अधिकारावर राहून दत्तोपासनेचा प्रसार करणारे व एकनाथांवर अनुग्रह करणारे म्हणून थोर दत्तोपासक श्रीजनार्दनस्वामी यांचे नाव प्रसिद्ध आहे. फाल्गुन व. ६ शके १४२६ रोजी यांचा जन्म चाळीसगावाच्या देशपांडे घराण्यात झाला. हे शुक्ल यजुर्वेदीय वाजसनेयी माध्यंदिन ब्राह्मण असून नित्य धर्मकृत्ये व पूजाउपासना यांत यांना प्रथमपासूनच गोडी वाटत होती. शके १४४७ मध्ये त्यांनी एकाच कुलगोत्रातील दोन मुलींशी लग्न करून गृहस्थाश्रमास प्रारंभ केला. भगवच्चिंतन, स्नानसंध्यादि कर्मे, अतिथिसेवा, राजकार्य आणि सावित्री-रमा या दोन स्त्रियांशी संसार; असा त्यांचा जीवनक्रम होता. राजकारणात नित्य दगदग, वसुली, अधिकारी लोकांची ताबेदारी, यवनांची लहर, हीन लोकांशी संबंध यांतून त्यांना मार्ग काढायचा होता. स्वधर्मनिष्ठा राखायची होती. घरातील दत्तोपासना वाढवायची होती. कृष्णातीरी अंकलखोप, कुरवपूर, वाडी, औदुंबर इत्यादी दत्तस्थानांना ते भेटी देत असत. अंकलखोप येथे त्यांना दत्तात्रेयांचा अनुग्रह झाला. कर्मयोगी श्री जनार्दन स्वामी देवगिरीवर येऊन त्यांनी यवनसेवा पत्करली. या एका प्रसिद्ध स्थानाभोवती जनार्दनस्वामी व एकनाथ यांच्या अनेक रम्य व भावगर्भ स्मृती एकवटलेल्या आहेत. दुर्गातीर्थ व श्रीगोरक्षगुहा ही दोन स्थाने भाविकांना सुखविणारी होती. जनार्दनपंतांनी यवनसेवा पत्करूनही आपली धार्मिक वृत्ती सोडली नाही. नित्याचे आन्हिक, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथांची पारायणे, नामस्मरण व राजकारण यांत त्यांचे चित्त रंगून गेले होते. गोरक्षगुहा व गडाखाली सहस्रस्तंभ देवीजवळचे स्थान या ठिकाणी एकान्तात त्यांची ध्यानधारणा चाले. **‘जनार्दनांचा नित्य नेम । स्नान संध्या अति उत्तम । तयावरी आवड परम । निज धर्म आचार ॥ सिद्धराज श्रीज्ञानदेव । ज्ञानेश्वरी अमृतानुभव । स्वानुभवें वदला अपूर्व । जनार्दना भाव त्या ग्रंथीं ॥ तया पठनी अति गोडी । नित्य व्याख्यानाची आवडी । मध्यान्हापर्यंत प्रतिदिनीं । नित्यनेमें असावें ॥ तयावरी भोजनपंक्ति । सहब्राह्मण ब्रह्ममूर्ती । सारूनियां यथा पद्धती । राजदर्शना मग जावें ॥ न्याय नीती तया रीतीं । शिष्टांशी मान्य पडे रीतीं । या परी प्रपंच परमार्थी । दक्षता लोकसंग्रहार्थी ॥’**

## “निरुपण”

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**भक्ती**

**त्वया विना जगत्शून्यंआप्ता मित्राणि नान्यथा ।**
**त्वया सह जगत्सर्वं**
**देवेश्युपस्थितं शुभे ।।६।।**
**तुझ्या विना जग शून्य आहे. आप्त मित्रही तसेच आहेत. हे देवेशी, शुभे तुझ्यासह सर्व सर्व जग सार्थ असे उपस्थित होते.**

## ।। दासबोध स्तवन ।।



## परमार्थ म्हणजे काय

आधुनिक केसरी


ब्रम्हज्ञानी लोक खात्रीपूर्वक सांगतात की,परमात्मवस्तु अपरंपार आहे. तिच्या छोट्याशा भागावर पण विश्वाचा देखावा दिसतो. मुळातच परमात्मस्वरूप असलेले विश्व आपल्या इंद्रियांना पदार्थ रूप दिसते. वास्तविक ते तसे नाही. कारण इंद्रियांना खरेखोटे समजत नाही. इंद्रियांना दिसणारे पदार्थ हे ब्रम्ह आतबाहेर व्यापून आहेत. पण विश्वाच्या बाहेर ते आणखी किती आहे याचा पत्ता कोणालाही लागला नाही. ब्रम्ह अतिसूक्ष्म आहे. ते अतींद्रिय आहे सदोदित आपल्या जवळ आहे. ते संपूर्ण खरे असल्याने त्याच्या मानाने आपले हे विश्व झोपेतल्या स्वप्नात असल्या प्रमाणे वाटते. आपण देहबुद्धीत आहोत तोपर्यंत ते खरे वाटते व जडत्वाने अनुभवायला मिळते. पण ज्ञानाची तळमळ लागल्यावर तेच परमात्मस्वरूप अनुभवायला येते.तेव्हा ज्ञानाची खरी ओळख साधणे म्हणजे "परमार्थ"होय. ब्रम्ह स्वरूप विशाल आहे. सर्व विश्वाला सर्व बाजूंनी व्यापून आहे. जीवाला आतबाहेर चिकटून आहे. पण ते आपल्या जवळ आहे याची जाणीव आपल्याला नसते. ब्रम्ह कसे आहे ते आकाशासारखे पोकळ आहे रूप नासलेले व बेहद्द विशाल आहे. एकवीस स्वर्ग,सात पाताळे मिळून एक ब्रम्हगोल होतो. अशा विशालकाय ब्रम्हाला त्या निर्मल ब्रम्हाने व्यापले आहे. म्हणजेच जळी स्थळी काष्टी, पाषाणी ब्रम्ह व्यापून राहिले आहे. जन्मलेल्या बाळापासून ते मरेपर्यंत सर्वांना ब्रम्हाची गरज आहे. आकाशाच्या पुढे कोणी जात राहिला तर तो जिकडे जाईल तिकडे आकाश त्याच्या पुढे जात राहील म्हणून ब्रम्हाला कधीही कोठेही शेवट नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# देहसुखाची अनासक्ति म्हणजे वैराग्य

आधुनिक केसरी



भगवंत असण्याची जी स्थिति तिचे नाव भक्ति; आणि हा सर्व विस्तार माझा नाही या बुद्धीने राहणे याचे नाव वैराग्य. सर्व काही रामाचे आहे असे समजणे, म्हणजे सर्वस्व रामास अर्पण करणे होय. परमार्थाच्या आड काय येते ? धन, सुत, दारा वगैरे आड येत नाहीत, तर त्यांच्यावरचे जे ममत्व, ते आड येते. वस्तूवर आसक्ति न ठेवणे हे वैराग्य आहे, ती वस्तूच नसणे हे वैराग्य नव्हे. एखाद्याची बायको मेली किंवा नसली म्हणजे तो विरक्त आणि असली तर आसक्त, असे म्हणता येणार नाही. बायको असून लंपट नसेल तर तो विरक्तच आहे. आहे ते परमात्म्याने दिले आहे, आणि ते त्याचे आहे, असे मानून आनंदाने राहणे हे वैराग्य होय. या भावनेत राहून जो इंद्रियांच्या नादी लागत नाही तो वैरागी. संसार हा नश्वर आहे हे ओळखून वागायचे आहे. तो टाकता येत नाही; त्यात राहून आसक्ति न ठेवली की तो टाकल्यासारखाच नाही का ? फळाची आशा न करता सत्कार्य करणे हे भक्तिचे लक्षण आहे, आणि कर्तव्याच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट बाजूला सारणे हे वैराग्याचे लक्षण आहे. आसक्ति न ठेवता कर्तव्याच्या गोष्टी करणे ही तपश्चर्या होय. देहसुखाची अनासक्ति किंवा हवेनकोपण टाकणे म्हणजे वैराग्य. खरोखर, विचार करा, प्रपंचात मनासारख्या गोष्टी मिळतात कुठे ? त्या मिळणे न मिळणे आपल्या हातातच नसते. अमुक हवे अथवा नको, असे कशाला म्हणावे ? असे न म्हणता, रामाचेच होऊन राहावे म्हणजे झाले. जो रामाजवळ विषय मागतो, त्याला रामापेक्षा त्या विषयाचेच प्रेम जास्त आहे असे सिद्ध होते. विषय बाधक नाही, पण विषयासक्ति बाधक आहे. भगवंताला प्रसन्न करून घेऊन नाशिवंत वस्तु मागितली तर काय उपयोग ? नामावर प्रल्हादाने जशी निष्ठा ठेवली, तशी आपण ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले. आपण ते विषयासाठी घेऊ नये.

जगातले सर्व लोक सुखासाठी प्रयत्न करीत आहेत. शास्त्रांचे पुष्कळ संशोधन होऊन इतकी सुधारणा झाली. त्यामुळे देहसुख पुष्कळ वाढले; पण मानव सुखी झाला नाही. आजारी माणसाचा ताप जोपर्यंत निघत नाही तो पर्यंत त्याचा रोग बरा झाला नाही. त्याचप्रमाणे मानव सुखी झाला नाही, तो पर्यंत खरी सुधारणा झाली नाही असे समजावे. सध्या जगाला सुधारण्याचा आणि जगावर उपकार करण्याचा काळ राहिलेला नाही. प्रत्येकाने आपल्याला तेवढे सांभाळावे. यासाठी भगवंताचे अनुसंधान चुकू देऊ नये; मग धोका नाही. सगळ्यांनी असा निश्चय करा की, भगवंताच्या नामापरत्या गोष्टी ऐकायच्या नाहीत. जे मिळेल त्यात समाधान मानायला शिका. 'मी भगवंताचा आहे' असे म्हटल्यावर सर्व जगत् आपल्याला भगवत्स्वरूप दिसू लागेल यात शंका नाही. ही केवळ कल्पना नाही, आपण अनुभव घेऊन पाहात नाही. त्यासाठी नामस्मरणात आपण राहू या.

**आजचे बोधवचन आहे – जगात भगवंतावाचून सत्य वस्तू नाही ही ज्याची निष्ठा तोच खरा.**

आधुनिक केसरी

रविवार, १८ डिसेंबर २०२२

किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -१२३

आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 18 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-123 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-5


# महाराष्ट्रद्रोह्यांना गाडल्याशिवाय राहणार नाही: उद्धव ठाकरे

## शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून महापुरुषांच्या बदनामीची स्पर्धा : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महापुरुषांनी भीक मागितली असे म्हणाऱ्यांचे हे वैचारिक दारिद्र्य आहे. आजचा मोर्चा ही सुरुवात आहे आणि महाराष्ट्रद्रोह्यांना गाडल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला. महाविकास आघाडीने रिचर्डसन अँड कृडास कंपनी, नागपाडापासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत हल्लाबोल मोर्चा काढला.**

या मोर्चात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आ. भाई जगताप, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी मंत्री वर्षा गायकवाड, माजी मंत्री अस्लम शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, छगन भुजबळ, समाजवादी पक्षाचे अबु आझमी, शेकापचे जयंत पाटील प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह मविआचे सर्व घटक पक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनीही मोर्चाला संबोधित केले.

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून सीमावादाचा प्रश्नाने डोके वर काढले असून सीमेवरची गावं शेजारच्या राज्यात जाण्याची मागणी करत आहेत. महापुरुषांचा अपमान, सीमावाद या प्रश्नावर महाराष्ट्रद्र्योह्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा हा मोर्चा आहे. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र स्थापनेचा मंगल कलश आणला तेव्हापासून महाराष्ट्र एकसंध रहावा यासाठी प्रयत्न करण्यात आले पण ईडी सरकार मात्र महाराष्ट्राचे तुकडे करू पहात असून आम्ही ते कदापी होऊ देणार नाही, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. मोर्चाला संबोधित करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मुंबईत असे मोर्चे निघत होते आज तशाच पद्धतीचा मोठा मोर्चा निघाला आहे. महाराष्ट्र स्वतंत्र झाला पण काही गावं अजून महाराष्ट्रात आलेली नाहीत त्यासाठी आजही संघर्ष सुरु आहे. आजच्या मोर्चात महाराष्ट्राच्या सन्मानासाठी आपण सर्वजण एकत्र आलो आहोत. सत्तेत असलेले लोक छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करत आहेत ते आम्ही कदापी सहन करणार नाही. काही मंडळींनी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा अपमान केला. शिक्षणाची व्यवस्था नसताना शिक्षणाचे दालन या लोकांनी सर्वसामान्य घरातील मुलांसाठी उघडे केले. त्यांनी भीक मागतिली असे एक मंत्री म्हणतात. हे सरकार आल्यापासून महापुरुषांच्या बदनामीची स्पर्धा सुरु झाली आहे.

माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले की, बऱ्याच वर्षानंतर देशाने एवढा प्रचंड मोर्चा पाहिला असेल. या मोर्चात मी एकटाच चाललो नाही तर माझ्याबरोबर हजारो लोक महाराष्ट्राद्रोह्यांच्या छाताडावर चालले. आज महाराष्ट्रद्रोही सोडून सर्व पक्ष एकवटले आहेत राज्यपाल हे राष्ट्रपतींचे दूत असतात पण त्या पदावर बसून कोणालाही टपल्या मारायच्या नसतात. कोश्यारी यांना तर मी राज्यपाल मानतच नाही. आग्र्यावरून सुटल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले आणि त्याची तुलना बंडखोरांशी केली जाते, छत्रपतींचे नाव घेण्याचा अधिकारही या लफंग्यांना नाही. महापुरुषांनी भीक मागितली असे म्हणाऱ्यांचे हे वैचारिक दारिद्र्य आहे. आजचा मोर्चा ही सुरुवात आहे आणि महाराष्ट्रद्रोह्यांना गाडल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

विधानसभेतील विरोधी पक्ष नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्राचा अभिमान कायम ठेवण्यासाठी मविआचा हल्लाबोल मोर्चा आहे. महापुरुषांविरोधात गरळ ओकण्याचे काम भाजपा नेते करत आहेत, याच्या मागचा मास्टर माईंड कोण आहे, हे समोर आले पाहिजे. चुकून बोलले तर माफी मागितली जाते पण भाजपा मात्र जाणीवपूर्वक वक्तव्य करत आहे. यावेळी अजित पवार यांनी राज्यपाल कोश्यारी यांच्यावरही निशाणा साधत राज्यपालांना हटवले पाहिजे अशी मागणी केली.

# स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला

## 'आधुनिक काळातील व्यक्तिमत्त्व विकास' केडगाव येथे पाचवे पुष्प गुंफणार विनोद जैतमहाल

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व.



मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प जालना येथील लेखक, कवी, पत्रकार विनोद जैतमहाल हे 'आधुनिक काळातील व्यक्तिमत्व विकास' या विषयावर गुंफणार आहेत. दि. 20 डिसेंबर रोजी दुपारी 2 वाजता सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर, केडगाव, अहमदनगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संदीप भोर हे असतील. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा



साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर, केडगाव, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थितीचे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, मराठवाडा साथीचे अहमनगर आवृत्ती प्रमुख बाजीराव खांदवे, केडगावचे पत्रकार बाबासाहेब वायकर यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.

# बिल्किस बानो यांच्या पदरी निराशाच

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** गुजरातमध्ये २००२ साली घडलेल्या बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या ११ दोषींची सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला होता. या निर्णयाविरोधात देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, बिल्किस बानो यांनीही या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर गुजरात सरकारने बिल्किस बानो सामूहिक बलात्कार आणि हत्या प्रकरणातील दोषींना १५ ऑगस्ट २०२२ रोजी चांगल्या वर्तणुकीच्या आधारावर तुरुंगातून सोडून दिले होते. १४ वर्षांच्या तुरुंगावासानंतर या दोषींना गुजरात सरकारने मुक्त केले होते. स्वातंत्र्यदिनालाच दोषींची सुटका झाल्याने देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला होता. विरोधकांसहित अनेक प्रतिष्ठित व्यक्तींकडूनही या निर्णयाचा निषेध करण्यात आला होत. दोषींच्या सुटकेला सीबीआय आणि विशेष न्यायालयानेही विरोध दर्शवला होता. गुजरातमधील लिमखेडा तालुक्यात ३ मार्च २००२ रोजी बिल्किस बानो



यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. यावेळी त्या ५ महिन्यांच्या गर्भवती होत्या. यावेळी बिल्किस बानो यांच्यावरील बलात्कारासोबतच त्यांची ३ वर्षीय मुलगी आणि इतर १४ जणांची हत्या करण्यात आली होती. पुढे न्यायासाठी बिल्किस बानो यांनी मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली होती. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणीची सीबीआय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. जीवे मारण्याची धमकी येत असल्यामुळे न्यायालयीन सुनावणीसाठी हे प्रकरण गुजरातमधून महाराष्ट्रात स्थानांतरित करावे, अशी मागणी बिल्किस बानो यांनी केली होती. बानो यांची ही मागणी पुढे मान्य करण्यात आली होती.

# यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय डोळ्यासमोर ठेवावे

## वैद्य जयंत देवपुजारी; छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या नूतन वास्तूचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या नूतन वास्तूचे उद्धघाटन नवी दिल्ली येथील भारतीय चिकित्सापद्धती राष्ट्रीय आयोगाचे चेअरपर्सन वैद्य जयंत देवपुजारी यांच्या शुभहस्ते शुक्रवार, दि. २५ रोजी करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, डॉ. बाळासाहेब आहेर, संस्था सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्राचार्य डॉ. दत्ता पाटील आणि प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

उद्‌घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैद्य देवपुजारी म्हणाले आयुर्वेदात शिक्षणतज्ज्ञ आहेत. परंतु त्यात प्रशिक्षित शिक्षणतज्ज्ञांची कमतरता आहे आणि या त्रुटीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आम्ही आयुर्वेदातील औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण व्यवस्थेशी कसे जुळवून घेऊ शकतो, हे पाहणे आवश्यक आहे. आम्ही 3,000 हून अधिक शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि 100 प्रशिक्षित शिक्षणतज्ज्ञांची एक टीम या क्षेत्रात प्रवेश करण्यास तयार आहे, ज्ञानाचा प्रगतीशील उलगडा हा आयुर्वेदाचा आत्मा म्हणून समाविष्ट केला जाऊ शकतो आणि संबंधितांना भविष्यात संबंधित होण्यासाठी क्षेत्रातील नवकल्पनांची तयारी करण्याचे आवाहन केले. आयुर्वेद शैक्षणिक कार्यक्रमांची पुनर्रचना किंवा सुधारणा करण्याची गरज आहे. जागतिक दृष्टीकोनातून आयुर्वेदाचा विचार करण्याची आणि जागतिक स्थान प्राप्त करण्यासाठी स्थानिक पातळीवर योजना आखण्याची आणि कृती करण्याची हीच योग्य




वेळ आहे, आयुर्वेदात शिक्षणतज्ज्ञ आहेत परंतु त्यात प्रशिक्षित शिक्षणतज्ज्ञांची कमतरता आहे आणि या त्रुटीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आम्ही आयुर्वेदातील औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण पद्धतीशी कसे एकत्र येऊ शकतो हे पाहणे आवश्यक आहे. आम्ही 3,000 हून अधिक शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि 100 प्रशिक्षित शिक्षणतज्ज्ञांची एक टीम या क्षेत्रात प्रवेश करण्यास तयार आहे, ज्ञानाचा प्रगतीशील उलगडा हा आयुर्वेदाचा आत्मा म्हणून समाविष्ट केला जाऊ शकतो आणि संबंधितांना भविष्यात संबंधित होण्यासाठी क्षेत्रातील नवकल्पनांची तयारी करण्याचे आवाहन केले. सध्या कौशल्य, समर्पण आणि सॉफ्ट स्किल्सचा अंतभाव करून अत्यन्त कुशल शिक्षकांच्या संख्येत वाढ करून तशा स्वरूपांचे प्रशिक्षण समान देणे आवश्यक आहे. आयुर्वेद व योगविज्ञान ही भारतीय संस्कृतीची ताकद असून भारताला विश्वगुरु बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी इतिहास, संस्कृती व परंपराही महत्त्वाची आहे. आयुर्वेद, योगविज्ञान व आध्यात्मिक विचारदर्शनही महत्त्वाचे असल्याचे शिक्षणाच्या आधारावर मूल्याधिष्ठित शिक्षण व परिवार पद्धती महत्त्वाची आहे. आयुर्वेद ही मोठी विचारधारा व विज्ञान आहे. आयुर्वेद योग्यप्रकारे जगासमोर मांडण्याचा आपला प्रयत्न आहे. या सादरीकरणातून यश मिळाले तर आपण विश्वगुरु होऊ शकतो. जागतिक स्तरावर ही बाब कशी मांडायची याची एक पद्धती आहे. आपला विचार श्रेष्ठ असला तरी त्याचे सादरीकरण करताना जगाला ज्या माध्यमातून, ज्या भाषेतून पाहिजे आहे, तसे मांडले तरच आपण यशस्वी होऊ, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. शिक्षण क्षेत्रासोबत सामाजिक सेवा क्षेत्रातही अनेक संस्था चांगले काम करीत आहेत. सामाजिक जाणीवेच्या भावनेतून अशा संस्थांना मदत करणे आवश्यक आहे. आयुर्वेदाचा विकास करीत असताना त्यावर संशोधन करणे आवश्यक आहे. संशोधन करण्यास इच्छुक असलेल्या वैद्य आणि विद्यार्थ्यांना संशोधनाबद्दल बारकाईने अभ्यास करून उपलब्ध संशोधनात भर घालावी. कोरोना महामारीत झालेले आजार आणि जीवनशैलीमुळे होणारे आजार त्यावर समाजाचा होणारा खर्च आयुर्वेदाच्या माध्यमातून कसा कमी करता येईल याकडे आम्ही गांभीर्याने पाहत आहोत.

आता आयुर्वेदाला प्रोत्साहन मिळते व त्याचा प्रचार ही होतो . ज्ञान व अनुभवानंतर पदवी मिळते पण चिकित्सा क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा परिणाम दिसल्यावर सन्मान मिळतो . त्यामुळे अभ्यासादरम्यान मिळालेल्या ज्ञानातून नैतिकता राखत, योग्य औषधांचा वापर करुन लोकांना व्याधीमुक्त करणे हा त्याचा परिणाम आहे . तंत्रज्ञानामुळे आता नवी उपकरणे आली आहेत, त्याचा योग्य वापर करण्याचा सल्ला देखील यांनी दिला . हजारो वर्षांपासूनच्या शाश्वत, प्रभावी अणि उपयुक्त अश्या आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसेच आयुर्वेदाच्या वैज्ञानिक दृष्टीने सेवा, संशोधन व शिक्षण देण्याच्या उद्देशाने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रणजीत मुळे, सचिव पदमाकरराव मुळे आणि प्राचार्य डॉ . श्रीकांत देशमुख हे सर्व जण सकारात्मक प्रयत्न करत आहेत, त्याबद्दल वैद्य जयंत देवपुजारी यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .

यावेळी डॉ. सुभाष भोयर, डॉ. दत्तात्रय शेळके, डॉ. उल्हास शिंदे, डॉ. गणेश डोंगरे, डॉ. जयश्री देशमुख आणि विभागप्रमुख, अधिकारीवृद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी धन्वन्तरी स्तवन डॉ. यशश्री वितोन्डे, सूत्रसंचालन डॉ शमिका जोशी तर आभार प्रदर्शन डॉ. मेघा सुरवसे यांनी केले. कार्यक्रमानंतर राष्ट्रगीत होउन समारोप करण्यात आला.

# अंधारलेल्या वाटा, भरकटलेले राजकारणी, गोंधळलेला महाराष्ट्र !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही अशी भूमी जेथे अनेक कर्तृत्ववान महापुरुष जन्माला आले. त्यांनी त्यांच्या कार्याने संपूर्ण समाजाला, जगाला पण दिशा दिली. अक्षरशः हेवा वाटावा अशी स्थिती आहे. या महापुरुषांनी एखादा विषय निवडला, त्यावर अभ्यास केला आणि तो प्रश्न सोडवण्यासाठी सर्वस्व वाहून दिले आणि समाज जीवनात बदल घडवून आणले. आपली बुद्धी, क्षमता याचा उपयोग त्यांनी यासाठी केला . या महापुरुषांच्या समोर होता संपूर्ण हिंदू समाज आणि त्यांच्या मध्ये निर्माण झालेले दोष ! काहींचे विचार बंडखोरीच्या स्तराचे होते पण त्यात अंतिमतः हेतू होता निर्दोष समाज निर्मितीचा ! काही महापुरुषांनी परंपरेतील संचित हेच आधार मानले तर काहींनी परंपरा नाकारल्या तर काहींनी परंपराच दोषी ठरवल्या. सगळे वेगवेगळ्या मार्गाने मार्ग चोखळात होते पण ते परस्परांना आदर देत होते . त्यांच्या हेतू बद्दल शंका घेत नव्हते आणि कुठला मार्ग योग्य ? हे ते काळावर सोपवून प्रामाणिक पणे आपले कार्य करत होते आणि म्हणूनच ते महापुरुष होते !**

पण एखाद्या कर्तृत्ववान, कर्तबगार बापाच्या पोटी कर्तृत्वशून्य मुलगा जन्माला यावा तशी आज महाराष्ट्राची परिस्थिती झाली आहे. ज्यांनी संपूर्ण समाज हेच आपले ध्येय ठेवले त्यांना, त्या महापुरुषांना जातीच्या कोंडवाड्यात कोंडायचे काम आज आम्ही महाराष्ट्रातील करंटी मंडळी करत आहोत. आमच्या पूर्वजांनी दिलेले विचार वैभव, सामाजिक संवेदनशीलता आणि त्या प्रेरणेतून निर्माण करायचा सामाजिक प्रकल्पा ऐवजी राजकीय बाहेरख्याली पणा आणि व्यसने यात आमची विचारांची इस्टेट आम्ही दिवाळखोरीत काढत आहोत.

आम्ही महापुरुषांचे नाव घेत त्यांचा जप करत राहतो, त्यावर आमच्या राजकीय पोळ्या शेकुन घेतो पण ना आमच्यात शिवाजी महाराजांचा पराक्रम उरला आहे, ना महात्मा फुलेंचा शिक्षणाचा कळवळा, ना बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेची धारणा, ना कर्मवीरांचा ध्यास, ना संत गाडगे बाबांची स्वच्छतेची तळमळ, ना लोकमान्यांची स्वराज्याची आस, ना सावरकरांची क्रांतीची ज्योत ना संतांचे वैराग्य ना संभाजी राजेंचे धर्मप्रेम आणि ना शाहू महाराज यांच्या मधील सामाजिक अभिसरणाची उदारता ! उरल्या आहेत त्या फक्त आणि फक्त खानदानाच्या उत्कर्षाचा राक्षसी महत्वाकांक्षा आणि त्यासाठी आम्हाला वापरायचे आहेत राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या शिड्या ! आम्ही कर्म दरिद्री ! त्या कर्तृत्ववान बापाच्या पोटी जन्माला आलेल्या सामान्य पोरासारखे ! तो पोरगा बापाची इस्टेट फुकुन खात असतो आम्ही आमच्या असामान्य महापुरुषांच्या विचारांना फुकुन राजकीय पोळ्या भाजत आहोत.

कोण कुठली अंधारी बाई आमच्या संत, प्रभू रामचंद्र श्रीकृष्ण यांच्यावर वाह्यात सारखे बोलते आणि तिला सन्मानाने पक्षात घेणारे महापुरुषांच्या बदनामी बद्दल बंद पुकारून समाजाला वेठीस धरतात ! आमच्याच महाराष्ट्रातील श्रद्धा नावाच्या मुलीला मारून तिचे 35 तुकडे केले जातात याबद्दल याना खेद ना खंत ! शब्दांचे श्लेष काढून विकृत मनोवृत्तीच्या माध्यम कर्मीना हाताशी धरून, तरुणांना पेटवून महापुरुषांच्या विचारांची माती करण्याचा संकल्पच जणू या दिवाळखोर राजकारण्यांनी घेतला असावा.



आजच या गॅंग मधला एक जण बरळला आहे. लव्ह जिहाद हा राजकीय विषय आहे ! यावर कायदा करण्याची गरज नाही आणि घटनाबाह्य पण आहे. छत्रपती यांच्या जन्म स्थळाच्या जवळ जन्माला आलेले हे महाशय आणि त्यांचे नेते शिवाजी महाराजांना धर्मनिरपेक्ष ठरवत अफजलखानाच्या उरुसात नाचणारे महाराजांची बदनामी होते म्हणून मोर्चे काढत आहेत.

राजकीय आणि सामाजिक विषयांना बेमालूमपणे मिसळत सामाजिक आणि जातीय विद्वेष निर्माण करत हिंदू ऐक्याचा बळी देण्याचा हा काही मंडळींचा डाव ओळखण्याची गरज आहे.

राज्यपाल म्हणजे तुमच्या घरचे शिपाई नाहीत. १२ आमदारांची नियुक्तीचा राग तुम्ही जरूर काढा, कायदेशीर लढाई लढा पण महाराजाना का मध्ये आणता? हेच राज्यपाल या वयात पायी रायगड चालून गेले होते, ते महाराजांच्या श्रद्धेपोटीच हे विसरू नका !

लोकांना भ्रमित करण्याचे धंदे बंद करा ! तुमचे राजकारण काही महिन्याचे असेल पण तुम्ही पेटवलेल्या विद्वेषाची झळ कमी करायला दशके कमी पडतात ! कृपा करून हे पाप करू नका !

मराठवाड्यात नामांतर आंदोलन पेटले तेव्हा गावागावात दुही माजली होती ! अशा वेळी संघ विचारांच्या मंडळींनी गावोगावी यात्रा काढून जन मानस तयार केले. आजचे पुरोगामी, समाजवादी त्यावेळी मराठवाडा अभिनिवेश घेऊन विरोध करत होते ! त्यावेळी परिषदेचे पुर्णवेळ काम करणारे चंद्रकांत पाटील त्यात सक्रिय होते. त्यांचा कुठला तरी शब्द पकडून रान उठवणारे विकृत मेंदूचे सडके बोरू बहाद्दर जातीय विद्वेष पसरवत आहेत कारण चंद्रकांत पाटील त्यांना राजकीय प्रतिस्पर्धी वाटत आहेत. मोठ्या राजकीय घराण्यात जन्म न घेता राजकारणात उच्च पदस्थ कसे होऊ शकता? ही मळमळ असू शकते पण त्यासाठी महाराष्ट्रात विद्वेष निर्माण का करता ?

अशा वेळी जो तरुण वर्ग या राजकारण्यांच्या या कारस्थानाला बळी पडतो तेव्हा निश्चितच चिंता वाटायला लागते समाज असा जेव्हा गोंधळतो तेव्हा लेखणीच्या माध्यमातून साहित्यिक, विचारवंत समाजाला मार्गदर्शन करतात पण आमच्याकडे हिंदुत्वाला शिव्या देणाऱ्या, शहरी नक्षलवादाचा पुरस्कार करणाऱ्या, अफजल गुरूला शांतता प्रिय म्हणून गौरवणाऱ्या पुस्तकाला पुरस्कार देणारे लोक शासनाच्या समितीत जाण्यासाठी जन्माला आले आहेत. एक कादंबरी लिहून जो गौरवला गेला त्या भांडवलावर ज्याने आयुष्य काढले आणि अचानक मग हिंदू नावाची कादंबरी लिहून नवीन शोध लागल्यासारखा बडबड करायला लागला ! पुरोगामी भाट तर त्याला डोक्यावर घेतच होते ! आता तर तो थेट चीनची तरफदारी करतो आहे आणि लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेल्या सरकारला फॅसिस्ट ठरवतो आहे ! हिंदू द्वेष हा ज्यांच्या पुरस्काराचा पाया आहे ते आपल्या मिठाला जागत आहेत. पण त्यांना आणि त्यांच्या साहित्याला झिडकारण्याची गरज निर्माण झाली आहे.

जाणीवपूर्वक भगव्या रंगाच्या बिकिनी मध्ये नायिका आणि हिरव्या रंगातील वस्त्रातला नायक आणि त्यांची उत्तान दृश्ये निमूटपणे हिंदू समाजाने बघावे अशी अपेक्षा गृहीत धरून बॉलिवूड आम्हाला नाचवत आहे आणि आम्ही हे सहन करावे अशी या राजकारण्यांची अपेक्षा आहे.

एकूणच राजकारणातील उठलेली ही वावटळ सगळे सामाजिक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहे ! राजकीय गिधाडे सामाजिक सौहार्दाचे लचके तोडत महाराष्ट्रातील जनमानस उध्वस्त करत आहेत .त्यामुळे महाराष्ट्रातील समाजजीवन अंधार वाटेत ठेचकाळत आहे. अशा परिस्थितीत गोंधळलेला समाज भानावर आणण्यासाठी राष्ट्रप्रेमी नागरीक आणि कार्यकर्ते यांनी खूप समयोचित काम केले पाहिजे ! समयोचित वागले पाहिजे ! संयमाने व्यक्त झाले पाहिजे पण विचारांवर ठाम राहिले पाहिजे ! काहींना आपल्या राजकीय आणि खानदानी स्वार्थासाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील एक संपूर्ण पिढी बरबाद करायची आहे आणि आम्हाला भारताच्या उज्वल भविष्यासाठी महाराष्ट्र घडवायचा आहे !

बघू या ! लढाई तर दीर्घ पल्ल्याची आहे ! कोण हरतो ? कोण जिंकतो ? संत ज्ञानदेव आणि संत तुकाराम महाराज यांची शिकवण आमचे पाथेय आहे ! तेच आम्हाला मार्ग दाखवेल आणि तेच आम्हाला ही लढाई जिंकून देईल !

# धर्म आणि राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**अलीकडच्या काळात धर्माचा राजकारणातील शिरकाव हा अनेक बुद्धिवंतांना पटणार नाही इतका वाढला आहे. पण हे फक्त अलीकडेच झाले आणि आपल्याकडेच झाले आहे का? तर त्याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. खरेतर धर्माने राजकारणात हस्तक्षेप करणे ही काही वाईट गोष्ट नाही, परंतु धर्म अत्यंत वैयक्तिक बाब असल्याने त्याबद्दल आपणांस काही म्हणावयाचे नाही. जेव्हा संघटित स्वरूपाचा धर्म राजकीय क्रियाकलापामध्ये हस्तक्षेप करतो तेव्हा प्रश्न निर्माण होतात. संघटित धर्म हे सुद्धा राजकारणच असते. त्यास हवे तर आपण रिलीजन म्हणू शकतो.**

धर्म हा वैयक्तिक तर रिलीजन संघटितरूपाने आपल्यासमोर येतो. परंपरागत अर्थाने भारतीय राजकारण धर्माचा कधीही अव्हेर करणारे नव्हते, उलट एखाद्या धार्मिक सत्पुरुषाच्या सल्ल्याने राजा विशिष्ट कृती करत असे. येथे संघटित धर्माचे म्हणजे रिलीजनचे काम नव्हते तर धार्मिक गुणांशी कर्तव्ये होते. परोपकार, प्रेम, सहानुभूती, दया, चैतन्याभूती, सामाजिक दायित्व आणि कर्तव्य पालन हे धार्मिक गुण अंगिकारून केलेले कार्य राजकीय स्वरूपातील असले तरी धार्मिक म्हणायला हरकत नसावी. कारण निव्वळ राजकारणात प्रेम किंवा दयेला काहीच अर्थ नसतो. या गोष्टी नितीशास्त्राशी संबंधित असल्याने व नैतिकता पार्थिवतेसोबतच अभौतिक असल्याने धर्माने राजकारणात शिरकाव करणे हिताचे ठरते. राजकारण हे काही चांगल्या व्यक्तीचे क्षेत्र नव्हे, असे आपण म्हणतो तेव्हा त्यातील अवगुणांचाच विचार प्रकर्षाने आपल्या मनात असतो. या अवगुणांचे प्राबल्य कमी करायचे तर धर्माशिवाय दुसरा कोणता पर्याय असू शकतो? आम्हांला धर्म म्हणजे रिलीजन असा अर्थ शिकविला गेल्याने मोठीच पंचाईत झाली आहे. भारतावरील बाह्य आक्रमनापूर्वी येथे कोणतेच रिलीजन अस्तित्वात नसण्याचे हेच कारण होते. येथे एका गावात तर सोडाच एका कुटुंबात विविध उपासनापद्धती अस्तित्वात होत्या व त्यांना तेवढाच आदर होता. सम्राट चंद्रगुप्त मौर्य आणि त्यांचा मुलगा बिंदुसार यांची उपसनापद्धती वेगळी होती तर सम्राट बिंदुसार आणि त्यांचा मुलगा सम्राट अशोक यांची उपसनापद्धती देखील भिन्न होती. हे असे फक्त राजघराण्यातच होते असे नव्हे, तर समाजातही तेच वातावरण होते. अगदी शक, हुन किंवा कुशाण काळातही त्यात फार काही फरक पडला नाही. परंतु संघटित धर्माच्या आक्रमनानंतर मात्र यात न भूतो न भविष्यती फरक पडला. आम्हांला संघटित धर्म असावा असे न वाटण्यामागे आमचे मागासलेपण होते असे मानण्याचे काहीच कारण नाही. ब्रह्मसूत्राच्या अथातो ब्रह्मजिज्ञासापासून सुरू झालेला प्रवास भगवतगीतेच्या धर्मक्षेत्रापर्यंत येऊन पोहचतो म्हणजे या जगात



अमच्याएवढे कळणारे कदाचित आम्हीच असू. राजकारण आणि रिलीजन यांत जो काही फरक आहे तो फक्त स्वर्ग आणि नरक या कल्पनांचा. बाकी रिलीजन हाच मध्ययुगात राजकारणाचा मुख्य स्रोत राहिला आहे. पाश्चात्यांच्या अंधानुकरणामुळे आणि आमच्या उपासनापद्धतीला मिळालेल्या नामाभिदानामुळे आम्हीही त्यांच्यासारखे आहोत की काय असा बहुतेकांना पडलेला प्रश्न हा फक्त काळाची देण म्हणावा लागेल. ओशो म्हणतात त्याप्रमाणे सर्व राजकारणी लोकांचा शिक्षक ही आता धर्मानं भूमिका घेतली पाहिजे. कारण या जगाचे वाटोळे करणे जेवढे शक्य आहे तेवढे राजकारण्यांनी केले आहे. सत्यानाश करणे हा उद्देश नसला तरी जेथे महत्त्वाकांक्षा आणि सत्तास्पर्धा असते तेथे हे होणारच. कोणाला तरी पहिला यायचे असेल तर दुसरा, तिसरा किंवा पन्नासावा कोणाला तरी व्हावेच लागेल. जिथे तुलनाच नाही तेथे पसंतीक्रम देण्याचा प्रश्नच येत नाही. असे अनेक प्रश्न राजकारण उभे करते आणि उडवाउडवीची उत्तरे देते. मनुषत्वाची महत्ता टिकण्याअगोदर मनुष्याचे अस्तित्व टिकले पाहिजे. अलीकडच्या जागतिक कोलाहलात मनुष्याचे अस्तित्व कसे टिकेल? हा मोठा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. एकेका माणसाचे कैकदा अस्तित्व मिटू शकेल एवढी संहारकता कित्येक देश बाळगून असतील तर, अशा बिकट प्रसंगी या वाह्यातपणाला चार शहाणपणाचे खडे बोल फक्त धर्मच सुनावू शकतो.

धर्माची जी महत्त्वाची दहा लक्षणे शास्त्रकारांनी सांगितली त्याहीपेक्षा धर्माचे चार आधारस्तंभ महत्त्वाचे आहेत. शांती, मौन, निर्मोह आणि परोपकार हे घटक महत्त्वाचे आहेत. म्हणूनच जेरेमी बँथमला कोणाही दोन माणसांच्या सुखात तुलना करावी वाटत नाही. कारण सुख म्हणजे मांगल्य ही धार्मिक भावना यामागे आहे. अगदी त्याच्या उलट नित्सेचे तत्त्वज्ञान आहे . नित्से म्हणतो, फक्त महापुरुषालाच काय ते स्वयंभू महत्त्व असते, आणि मानवजातीचा बराच मोठा भाग हे त्याच्या एकट्याच्याच सुखाचे साधन असते. ही दोन विधाने दोन वृत्तीची निदर्शक आहेत. एकात धार्मिकता ओतप्रोत भरून आहे तर दुसरे निव्वळ राजकीय स्वरूपाचे आहे, तर्कविरहित आहे, म्हणून ते रिलिजिअस आहे. धर्म आणि राजकारणात एक महत्त्वाचा फरक आहे. धर्म सत्याचा मागोवा घेत विकसित होणारे व्यक्तिकेंद्री विज्ञान आहे, तर राजकारण सत्याचा विपर्यास करून सामूहिक भ्रम फैलावणारे समष्टीकेंद्री गारुड आहे. येथे व्यक्तीपेक्षा समूहाला प्राधान्य असते. कोण व्यक्ती किती चांगला अथवा वाईट हे शोधण्याएवढी फुरसत राजकारणात नसते. येथे गट, वर्ग, जात, रिलीजन असे मोठमोठे मापक महत्त्वाचे असतात. सगळे कावळे काळे असतात आणि काळे कावळे धूर्त असतात, असा एकदा शिक्कामोर्तब मारल्यानंतर मग कोण्यातरी हिटलर अथवा तत्सम राजकारण्याला मनुष्यत्वाचा संहार करणे सोपे जाते. कारण आमच्या इच्छेवर चांगले की वाईट ही ठरविण्याची पद्धत ही राजकारणाची देण असू शकते, धर्माची नव्हे. धर्म इच्छेशी निगडित नसून मूल्याशी संबंधित असतो, मूल्ये नीतिशास्त्रांतर्गत येतात, नीती भौतिक आणि अभौतिक दोन्ही स्वरूपाची असते. राजकारण फक्त भौतिकतेशी संबंध ठेवते, म्हणून धर्माने राजकारणात हस्तक्षेप करून समाजमन उच्चतर अवस्थेकडे नेण्यासाठी मदत करणे कधीही हिताचे ठरू शकते. कार्ल मार्क्स वगैरे प्रभृतीच्या समोर संघटित धर्म म्हणजेच रिलीजन होता, धर्माचे पौर्वात्य रूप पाहिले असते तर कदाचित धर्म नाहक बदनाम झाला नसता.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# भारत- चीन सीमा प्रश्नावर विरोधीपक्षाचा उतावीळपणा ?

आधुनिक केसरी

**भारताच्या अरूणाचलप्रदेश सीमेवरील तेवांग सेक्टरच्या यंगस्टे भागात चीनने घुसखोरी करण्याचा पुन्हा प्रयत्न केला. दि. ९ डिसेंबरच्या रात्री चीनच्या सुमारेतीनशे सैनिकांच्या हातात काठ्या व शस्त्र होते. त्यावेळी भारत व चीन सैनिकात झडप झाली. यात दोन्ही बाजूने सैनिक जखमी झाले आहेत. सुर्देवाने यात घटनेत भारतीय शहीद अथवा गंभीर जखमी झाले नाहीत. पण भारतीय चीनचा घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला. या घटनेचे लोकसभा आणि राज्यसभा पडसाद उमटले! काँग्रेसच विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहात घटनेवर चर्चा आग्रह करत आहेत. तेंव्हा देशाचे संरक्षणमंत्री राजनाथसिंह सभागृहात घटनेची माहिती देतील,असे स्पष्ट केले गेले. तरीही काँग्रेससह इतर पक्षाचे सदस्य दोन्ही सभागृहात गोंधळ घालत राहिले. पण गंभीर घटनेविषयी सरकारकडून अधिकृत माहिती घेण्याची विरोधी पक्षाची मानसिकता दिसून येत**

देशाचे संरक्षण मंत्री जेंव्हा सभागृहात माहितीची देतात, ती चुकीची असू शकत नाही. तवांग यंगेस्ट भाग १८ हजार फूट उंचीवर व डोंगराळ भाग आहे. तेथे तपमान अतिशय कमी असते.अश्या कठीण परिस्थितीत भारतीय सैनिक सीमेचे संरक्षण करत आहेत. वातानुकूलीत सभागृहात बसणाऱ्या राजकीय नेत्यांना याची कल्पना आहे काय?वास्तविक घटनेवर राष्ट्र एकसंघ असावयास पाहिजे. सभागृहात भारतीय सैनिकांच्या पराक्रमाचे सर्वच पक्षांनी कौतूक करावयाचे होते.भारत-चीन सीमा वादाचा प्रश्न आजचा नाही, तत्कालिन पंतप्रधान नेहरूंच्या कार्यकालापासून आहे. त्यात सीमा वादाचा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षतेचा व संवेदनशील विषय आहे. यावर 'राजकारण' करू नये, याचे भान विरोधकांना नाही. केवळ चीनच्या या घटनेवरून विरोधक भाजपा व मोदी सरकारला लक्ष्य करत आहेत, असे चित्र दिसत आहे.संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी दोन्ही सभागृहात या घटनेची माहिती दिली.तरी विरोधी पक्ष म्हणतात आमचे समाधान झाले नाही.विरोधकांचा देशाच्या संरक्षणमंत्र्याच्या माहितीवर विश्वास नाही, असे दिसतेय! या घटनेवर विरोधकांना कोणते प्रश्न विचारावयाचे आहेत? यातून निष्पन्न होणार आहे?विरोधी पक्षाचा भाजपा व मोदी सरकारचे म्हणजे देशाचे वाभाडे काढण्याचा उद्देश आहे. संरक्षणमंत्र्याच्या निवेदनानंतर दोन्ही सभागृह अध्यक्षांनी या घटनेवर संसदेने एकजूट दाखवावी व भारतीय सैनिकांच्या पराक्रमाचे कौतूक करावे, अशी विनंती केली.पण याकडे विरोधी पक्षांनी दुर्लक्ष केले.काँग्रेसने सदस्यांनी तर नंतर बहिष्कार केला. काँग्रेसचा हा निषेध बहिष्कार कोणासाठी होता?देशाच्या विरोधात होता का?भारतीय सैनिकांच्या पराक्रमावर अविश्वास दाखविणे, हा त्यांचा अवमान करणे नाही काय? सीमेवर अचानकपणे घटना घडली, तेंव्हा सैनिक प्रमुख निर्णय घेत असतात.तेंव्हा भाजपा व मोदी सरकारचा आदेश नसतात.भारताचे दुर्देव असे की.संसदेच्या दोन्ही सभागृहात चीनच्या घुसखोरीचा निषेध आणि भारतीय सैनिकांच्या पराक्रमाच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने संमत होऊ शकलेला नाही. किमान संसदेत राजकीय पक्षांनी या राष्ट्रीय सुरक्षा प्रश्नावर एकजूट दाखविली असती तर भारताच्या शक्तीचा संदेश जगभर गेला असता. पण संसदेत तसे चित्र पहावयाला मिळालेले नाही.याची प्रत्येक भारतीय नागरिकांना खंत वाटते. भारतात राजकारणासाठी अनेक विषय आहेत. देशाच्या राष्ट्रीयसुरक्षापेक्षा राजकारण महत्वाचे नाही.चीनचा अश्या कुरापती काढण्याचा इतिहास आहे.काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खडगे यांनी याविषयावर विरोधी पक्षाची बैठक घेतली!यात उध्दव शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, राजद, दम्रुक, भाकप, माकप, आप, समाजवादी पक्ष, संयुक्त जनता दल, केरळ काँग्रेस, नॅशनल काँग्रेस, राष्ट्रील लोकदल असे १७ पक्ष काँग्रेसबरोबर आहेत. पण यात तृणमूल काँग्रेसला साथ देत आहेत. काँग्रेसचे नेते आधीररंजन चौधरी म्हणाले, १९६२ च्या भारत व चीन युध्दानंतर संसदेत चर्चा झाली होती.त्यावेळी भारताला पराभवाचा सामना करावा लागला होता.तेंव्हा काँग्रेस नेतृत्वाच्या इच्छाशक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.आता तिवांग तसे घडलेले नाही.तेंव्हा विरोधी पक्षाने बैठकीत कोणते प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत? याची बैठकीत गंभीरपणे चर्चा केलेली दिसत नाही, पण विरोधी पक्षाची एकजूट असल्याचे मोठा मथळा देणारे वृत्त वृत्तपत्राने दिले! पण शहाचे काँग्रेसने काँग्रेसला जे प्रश्न विचारले त्याचे मोठा मथळावृत्तपत्रात दिला जाणार नाही.केवळ भाजपा व मोदी विरोधात लेख, वृत्त, देण्याऱ्या पत्रकारितेला काय म्हणावे? चीन सीमेवर अश्या कुरापती का करतो?

चीनचे प्रसिध्द चीनचे माजी सेनापती व युध्दनीती तज्ज्ञ 'सून- झू' यांचे "द आर्ट ऑफ वॉर' नावाचे पुस्तक आहे.त्यात त्यांनी म्हंटले आहे की, लढाई न करता शत्रूला हरविणे हीच युध्दाची सर्वोत्कृष्ट कला आहे, चीन सरकार या सिध्दातांनुसार असे कारस्थान करत असतो.तर भारत चाणक्यनीती व कुटनीतीतून चीनला प्रतिउत्तर देत असतो.चीनच्या या विस्तारवादी भूमिकेवर पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर खडे बोल सुनावलेले आहेत.या घटनेवरून विरोधी पक्ष भारत सरकारला काय सल्ला देणार होते?भारताने "चीनला जश्याच तसे उत्तर द्यायला' पाहिजे. असेच ना! प्रत्येक घटनेवर युध्द करणे, हा पर्याय असू शकत का?भारतीय सैनिकात चीनला उत्तर देण्यास क्षमता आहे! पूर्वीप्रमाणे भारत आता दुबळा राहिलेला नाही, याची चीनला कल्पना आहे.पण चीनची घटना घडली की काँग्रेस पक्ष उतावीळ व आक्रमक का होतो?मोदी व्यक्ती असले तरी ते भारताचे पंतप्रधान आहेत. मोदी वैयक्तीक व्देषातून भारतीय सैनिकांचे मनोधर्ये वाढविण्याऐवजी खच्चीकरण करत आहोत, अशावेळी विरोधी पक्ष नेते बुध्दी कोठे पेंड खाते?चीन राष्ट्राची सीमा सुमारे तेरा राष्ट्रालगत आहे, त्यामुळे केवळ भारत नव्हे, यात भारत, म्यानम्यार, अफगानिस्तान, भूटान, रूस, लाओस, नेपाल, मंगोलिया, कजाकिस्तान, कर्गिस्तान, उत्तर कोरीया, ताजिकस्तान, आणि वियतनम या तेरा राष्ट्राची चीनची सीमा आहे.भारत- चीनची रेषा ३४८८ कि.मी.ची. आहे.ही लद्दाख, हिमाचल सिक्कीमउत्तराखंड, अरूणाचल प्रदेशच्या लगत आहे.भारत -चीन सीमेला मॅकमोहन रेषा म्हंटले जाते.चीन तर अरूणाचल प्रदेशवर दावा करत असतो. तेवांग ही घटना प्रत्यक्ष नियंत्रण सीमा रेषेवर ( LAC) वर घडली.या सीमेवर जमीनीवरभारत व चीनचा दावा करत असो. दुसरी सीमा रेषा पाकिस्तानमध्ये नियंत्रण रेषा LOC) आहे.चीन वादग्रस्त प्रत्यक्ष सीमेवर बदलण्याचा सतत प्रयत्न करतो. यातून हा संघर्ष होत असतो.२३ देश चीनच्या विस्तारवादी भूमिकेमुळे त्रस्त आहेत.यात भारत- चीन सीमा विषयावर राजकारण करावयाचे आहे त्यांनी आधी इतिहास वाचावा, तत्कालिन पंतप्रधान नेहरू नीतीमुळे जम्मू-काश्मीर, व भारत पाक भारत-चीन सीमावाद निर्माण झाले आहेत. त्याचे भारताला दूरगामी परिणाम भागाले लागत आहेत.याच अर्थ नेहरूंनी देशाच्या विकासात योगदान नाही, असे नाही. इतिहासात ज्या घोडचूका झाल्या आहेत, त्या चूका काँग्रेस मान्य करते काय?मग आता भाजपा गृहमंत्री अमित शहांनी काँग्रेसला जर गंभीर चुकांचा आरसा दाखविला तर मग चुकले कोठे?पण काँग्रेस समर्थक तथाकथित बुध्दीवादी विचारवंत, पत्रकार लगेच नेहरू व्देष विरोध म्हणतील! केंद्रात मोदी व भाजपा सरकार आल्यापासून सीमा प्रश्न निर्माण झालेला आहे काय?, हे नव्या तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे.पंतप्रधान मोदींना यांनी शासकीय कार्यक्रमात विरोधी पक्षावर टीका करणे शोभत नाही, असा टोमणा राष्ट्रवादी नेते शरद पवार यांनी नुकताच मारला. मोदींना टोमणा मारणे म्हणजे पवारांचे राजकारणातील विचारातील मोठेपण म्हंटले जाईल.पण मोदींविषयी शिवराळ भाषा वापणारे, त्यांची हत्या केली पाहिजे, त्यात अग्नीविरांना चार वर्षात जोडे मारून काढले जाईल, असे म्हणणारे काँग्रेसचे नेते राहूल गांधी व आदर्श शिष्य संजय राऊत यांच्या सारख्या बेताल बोलणाऱ्या नेत्यांना सल्ला असा देत नाहीत !यात पवार विचारात संकुचितपणा दिसणार नाही. राजकारणात सुस्कृंतपणा कधीपासून आला.आता महाराष्ट्रात सद्या तरी काँग्रेसचे नेते यशवंतराव



चव्हाण यांचे सारखा अभ्यासू व्यक्तीमतत्व, चारित्र्यसंपन्न, सभ्यपणा, संयमी, विनम्र असा राजकीय नेता दिसून येत नाही.पुरोगामी महाराष्ट्रात महापुरूषांच्या नावावर राजकारण केल जातय!. भारतातील महापुरूष हे महानच आहेत! यात दुमत नाही.व्यक्तीच्या मनात महापुरूषाबद्दल आकस, व्देष नसताना केवळ शब्दावरून त्यांना 'टार्गेट' केल जातय! त्यांना व्देषी ठरविल जातय!मग आणि त्यातून राजकीय निषेध म्हणून 'जोडो मारो' 'शाई फेको' अश्या कृतीला आंदोलन म्हंटले जातय!अशी आंदोलन करणारे कार्यकर्ते डॉ.आंबडेकर, शाहू, फुले, व महात्मा गांधी विचारांचे आहेत ना? मग हे शोभते का? लढाई कधी विचाराची असावी!असो. भारत-चीन सीमावादाची ठिगणी मध्ये १९५९ पडली.चीनमभधील गैर व्यवहारामुळे तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांनी पलायन केले व तेंव्हा भारताने त्यांना आश्रय दिला.तेंव्हा चीनने भारताच्या विरोधात आक्षेप घेतला होता.तेंव्हा लगेच चीनने लडाख मधील कोंगका खिंडीत भारतीय सैनिकांवर हल्ला केला होता, तेंव्हा सैनिक शहीद झाले होते.त्यानंतर १९६२ चीनने भारतीवर चौकीवर हल्ला केलाव तेरा ठाणे कब्जा केला. चीनने सीमेत घुसखोरी केल्यानंतरही भारताने एकतर्फी सैनिक मागे घेण्याची केली.यात भारताला पराभवाचा धक्का बसला.आशियाचे नेतृत्व करण्याचे नेहरूंचे स्वप्न धुळीला मिळाले.नेहरूंनी अमेरिकीकडे लष्कर मदत मागितली होती. या युध्दात भारतीय सैनिकांना अतिशय यातना सहन कराव्या लागल्या.यात सैनिक शहीद झाले.या युध्दाचा पाश्वभूमीवर १९६४ मध्ये 'हकीकत' चित्रपट काढला गेला होता.तेंव्हा भारतीयांचे मनोबल, सैनिकांचे मनोधर्ये खचून जाऊ नये म्हणून कवी प्रदिप यांनी 'ऐ मेरे वेतन के लोगो, जरा आंख भर दो पानी' हे गीत लिहिले व ते स्वरसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर यांनी तत्कालिन पंतप्रधान नेहरूंच्या उपस्थितीत गायिले, तेंव्हा नेहरूंच्या डोळ्यात अश्रू आले होते. पण कार्यक्रमाला कवी प्रदिप तेथे निमंत्रित केले गेले नव्हते.यावेळी नेहरू भारत -चीन करार केला.त्यानुसार ३८ हजार किलोमीटर भारतीय जमीन चीनच्या अवैध कब्जात आहे.तसेच नेहरूंनी पाकला ५१८० किलोमीटर जमीन आहे.संयुक्त सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य भारताला मिळणार होते.पण नेहरूंनी१९५० माओला खूष करण्यासाठी चीनला पाठिंबा दिला.ते एका पत्रात कबूल करतात, पण काँग्रेसचे नेते शशीथरूर यांनी मात्र 'नेहरू द इन्वेंशन ऑफ इंडिया'या पुस्तकात भाजपाचा हा दावा खारिज केला आहे.त्यानंतर १९६७ मध्ये भारतीय सैनिकावर गोळीबार केला.त्यावेळी ८० भारतीय सैनिक शहीद झाले तर चीनचे जवळपास चारशे सैनिक मारले गेले.त्यानंतर १९७५ पुन्हा चीनने भारतावर हल्ला केला.त्यानंतर १९८७ तवांग भागात-भारत सीमेवर वाढला होता.यासर्व घटना केंद्रात काँग्रेस राजवटीतल्या आहेत.केद्रात मोदी आल्यानंतर पाक व चीन राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण सबंध असले पाहिजे असे प्रयत्न केले.पण दोन्ही राष्ट्र दगाबाज आहेत! २०१७ मध्ये डोकलाम याभागात भारत व चीनचे सैनिक समोरा- समोर आले होते, तेथे ७३ दिवस तणावाची परिस्थिती होती.नंतर गलवान येथे भारत व चीन सैनिकात झडप झाली!त्यात भारतीय सैनिक शहीद झाले पण चीनचे ३८ सैनिक मारले गेले. पण परराष्ट्रनीतीचे अभ्यासक, अध्यात्मिक गुरू राजकीय विचारवंत व राहूल गांधी यांचे मोदी सरकार आल्यापासून चीनचा विषय प्रश्न आले की, प्रखर राष्ट्रप्रेम उफाळून येते.त्यांनी मोदींनी भारताची एक हजार किलोमीटर जमीन चीन दिली?असा आरोप केला होता.या तथ्य काहीच नाही.केंद्रात मोदी सरकार असेपर्यंत भारत एक इंचही जागा चीनला घेवू देणार नाही.उलट मोदी सरकारने चीनची आर्थिक कोंडी करण्यासाठी भारताने चायनीच वस्तुवर बंदी घातली.यात चीनचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. काँग्रेस नेते राहूल गांधी चीनचा विरोध केवळ देखावा आहे.यातून त्यांचे चीनचे अंतर्गत मधूर सबंध आहेत.म्हणजे 'वरुन कीर्तन आतून तमाशा' असे धोरण आहे.भारतीय राष्ट्रप्रेमासाठी चीन वस्तुवर बहिष्कार टाकत आहेत.ते दहा रूपायाची सुध्दा चीनी वस्तु घेत नाहीत. दुसरीकडे राजीव गांधी फांऊडेशनसाठी चीनकडून १.३५ कोटीची आर्थिक मदत घेतली, याची पक्षाला थोडीही शरम वाटली नाही. इतकेच नव्हे, भारत - चीनमध्ये तणाव असताना गांधी हे चीन राजदूताला गुप्तपणे भेटावयास का गेले होते? इतिरेक्यांना प्रोत्साहन देणारा, डॉ. झाकीर नाईक याच्याकडून आर्थिक मदत घेतली, असे शहा यांनी सांगितले, ते खोटे आहे काय?काँग्रेस चीन प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी करत आहे. यावेळी काँग्रेसचे मोदीवर व भाजपा सरकारवर टीका करतील, मग भाजपाचे सदस्य, सरकारही प्रतिउत्तर देतीलच.मग काँग्रेस नेते उत्तर न ऐकण्याची तयारी ठेवत नाही.काँग्रेस पक्ष सभागृहातून पलायन करेल! असेच घडत आले आहे.अश्या चर्चा काँग्रेसच्या अंगलट येणारी आहे! मग आरोप झाली की, काँग्रेसचा तीळपापड होता.तेंव्हा काँग्रेस सत्तेची भूक लागली आहे.त्यासाठी काँग्रेस असे प्रश्न उपस्थित करत आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# बिहार: दारूबंदीचा पुन्हा पर्दाफाश

आधुनिक केसरी

**बिहार मधे दारूबंदी असूनही छपरा जिल्ह्यात विषारी दारूमुळे ४०जणांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.राज्यात विषारी दारूमुळे मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत असली तरी सरकार व प्रशासनाने मात्र मौन पाळले आहे. बिहारमध्ये१ एप्रिल २०१६ मध्ये दारूबंदी करण्यात आली आहे. २०१५ मध्ये मुख्यमत्री नीतिश कुमार यांनी राज्यात दारूबंदीची घोषणा केली होती. पण दारूबंदी असूनही बिहारमध्ये दारूचे अवैध धंदे जोमार सुरू असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. हा धंदा वाढतच चालला असून दारूची तस्करी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. प्रशासनातील अधिकारी व पोलिसांचीही त्याला साथ मिळत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जातो.**

बेकायदेशीरपणे दारू तयार करून ठिकठिकाणी त्याची विक्री केली जात आहे. त्यामुळे बिहारमध्ये अनेकदा विषारी दारून पिल्याने नागरिकांना जीव गमवावा लागल्याचे समोर आले आहे. ऐन दिवाळीत तीन दिवसांत ३१ जणांचा जीव गेला होता. त्याआधी देखील सहा जणांचा मृत्यू झाला होता. आतापर्यंत विषारी दारूने शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला असून सर्वाधिक मृत्यू याचवर्षी झाल्याचे समोर आलं आहे.

२०२१ मध्ये पंधरा वेगवेगळ्या घटनांमध्ये आतापर्यंत ९३ जण दगावले होते हे प्रमाण आता वाढत असल्याचे चित्र आहे. २०२१ मध्येच होळीच्या दिवशी नवादा येथे विषारी दारूने १६ जणांचा जीव घेतला होता. तसेच बेगूसरायमध्ये दोन, कोचामध्ये चार, विजयपूरमध्ये तीन नागरिकांचा मृत्यू झाला होता.

बिहारमध्ये केवळ कागदावरच दारूबंदी आहे. बनवाट दारूबंदी बाबत सरकार व प्रशासन बेजबादार असून सरकार व पोलिसांमध्ये लोकांना सहज दारू मिळत आहे. काळ्याबाजारातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असून जनता मात्र मरत आहे.दुसरीकडे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी म्हटले आहे की, बनावट दारूमुळे







सुरुवातीपासूनच लोक मरतात. सर्वांनी सतर्क राहावे, कारण दारू बंदी झाली की खराब दारू मिळेल. जो दारू पितो तो मरतो.

विषारी दारू प्यायल्यामुळे मृत्यू होण्याच्या घटना विविध राज्यात यापूर्वीही झाल्या आहेत. कोलकात्यात २०११ मध्ये विषारी दारू पिऊन १३० लोकांनी जीव गमावला होता.

काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारे गावठी दारूमुळे उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये जवळजवळ १०० लोकांचा बळी गेला होता. साधारण तीन-चार वर्षांपूर्वी मुंबईजवळही अशाच प्रकारे विषारी दारूचे अनेक बळी गेले होते. गुजरातमधील बोटाद जिल्ह्यातील रोजिद गावात बनावट दारू प्यायल्याने २१ जणांचा मृत्यू झाला आहे तर ४० हून अधिक गंभीर जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. देशी दारूला कच्ची दारू असंही म्हणतात. तिचं मिश्रण करणं अतिशय सोपं असतं. पण या कच्च्या दारूची झिंग वाढवण्याच्या नादात ती विषारी बनते.सामान्यतः गूळ आणि उसाच्या मळीपासून देशी दारू तयार केली जाते. त्यात युरिया आणि बेलाची पानं टाकली जातात. त्यामुळे त्याची नशा आणखी जास्त होते.मिथिल अल्कोहोलदारू जास्तीत जास्त चढावी, यासाठी त्यात ऑक्सिटॉसिन टाकलं जातं, जे मृत्यूला निमंत्रण देते. गेल्या काही वर्षांत अशी माहिती मिळाली आहे की ऑक्सिटॉसिनमुळे वंध्यत्व येतं आणि मज्जासंस्थेशी निगडीत आजार होतात. त्याच्या सेवनामुळे डोळ्यात जळजळ खाज आणि पोटात जळजळ होऊ शकते. दीर्घकाळ सेवन केल्यास डोळ्यांची दृष्टीही जाऊ शकते. कच्च्या दारूत युरिया आणि ऑक्सिटॉसिन सारखे रासायनिक पदार्थ मिसळल्यास मिथिल अल्कोहोल तयार होतं आणि त्यामुळे मृत्यू ओढवू शकतो.मिथिल अल्कोहोल शरीरात जाताच झपाट्याने रासायनिक प्रक्रिया होते. त्यामुळे शरीराच्या आतले अवयव निकामी होतात आणि लगेच मृत्यू ओढवतो.

# उसाला रिकव्हरी 12 टक्के मग कारखान्याची 8 टक्के कशी ?



राम कुलकर्णी
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**मराठवाड्यात साखर उद्योग चालवणारे कारखानदार वेगवेगळ्या पक्षाचे, विचाराचे असले तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची लुट करण्यासाठी साऱ्यांचं एक मत कसं असतं? काटा मारणे असेल किंवा रिकवरीचा खेळ असेल मरण शेवटी शेतकऱ्यांचं भलं मात्र कारखानदाराचं. या साऱ्या खेळात मराठवाड्यात शेतकऱ्यांचा कैवार घेण्यासाठी राजु शेट्टीसारखा नेता जन्माला कधी येणार? तत्पुर्वी लुबाडणुक कशी होते? याचे खेळ समोर येवु लागले. एफआरपी एकाच वेळेस देण्याचे आदेश केंद्र, राज्य सरकारने काढले पण जी एफआरपी कारखान्याच्या रिकवरीवर ठरते त्याचाच खेळ कसा उलटा जमेच्या बाजुने सुरू असल्याचे लक्षात येते.**

ऊसाच्या फडाची तोड करताना रिकवरी साडे बारापेक्षा जास्त असेल तरच कारखानदार तोड करतात. पण जेव्हा साडे बारा रिकवरी असलेला ऊस कारखान्याला गाळप होतो तेव्हा मग त्या कारखान्याची रिकवरी 8.50 जास्तीत जास्त 9 कशी येवु शकते असे प्रश्न आता हक्कासाठी जागा झालेल्या ऊस उत्पादकांच्या मनात येत असुन तज्ञ शेतकरी माधवराव दहिफळेसारखी या प्रश्नावर चिंता व्यक्त करताना दिसतात.

ऊसाची पंढरी म्हणुन एकेकाळी पश्चिम महाराष्ट्राकडे पाहिल्या जात असे. मात्र कालांतराने मराठवाड्याला देखील आता ऊस उत्पादनाचे पेठार म्हणुन ओळखल्या जाते. त्यातही बीड, लातुर, परभणी, नांदेड, जालना सर्वाधिक ऊसाचं उत्पादन देणारे जिल्हे म्हणुन ओळखल्या जातात. ऊस उत्पादन चळवळीचा भाग होवुन बसला. तसं पाहता बीड जिल्ह्याची ओळख ऊस तोड कामगार म्हणून अशीच होती पण स्व.गोपीनाथराव मुंडेसारख्या नेतृत्वामुळे ऊस उत्पादकांचा जिल्हा अशी ओळख आता होवुन बसली. पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हक्कासाठी परिणामी त्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी राजु शेट्टीसारखं नेतृत्व हंगाम आलं की रस्त्यावर उतरतं. कधी कधी असं वाटतं मराठवाड्यात राजु शेट्टी कधी जन्माला येणार का? गाळप हंगाम चालु होण्या अगोदरच रस्त्यावर उतरून तिकडे आंदोलन होतात. मग कारखानदारांनाही त्याची दहशत बसते. आमच्याकडे परिस्थिती उलटी म्हणावी लागेल. शेतकऱ्यांना कारखानदार वेठीस धरतात. मग काटा मारत असेल तर कुणी हवा तेवढा भाव देते. एकाच वेळेस एफआरपी कुठलाही कारखाना देत नाही. शेतकऱ्यांना गरज असते म्हणुन कारखानदाराचे लाड सहन करावे लागतात. अलीकडे तर ऊस तोड कामगार देखील उत्पादकांची मोठ्या प्रमाणावर पिळवणुक करतात. आजही 2000रूपये प्रति हेक्टर घेतल्याशिवाय फडाला कामगार हात लावत नाही. हार्वेस्टरसारखी मशिन आली तरी एकरी दोन हजार रूपये तोडायला घेतात. बिचारा शेतकरी फक्त ऊस जाण्याच्या धास्तीने मागेल तेवढे देत रहातो. वास्तविक पाहाता यंदा पाऊसकाळ जास्त होवुन देखील ऊसाचे प्रमाण कमी आहे. मार्च अखेर कारखाने चालणार



नाही अशी परिस्थिती सद्या आहे. शिवाय यंदा ऊसाची लागवडसुद्धा कमीच होत असुन सोयाबीन, कापसासारख्या पिकाला मिळणारे भाव पहाता शेतकरी ऊस पिकापासुन दुर जाताना दिसतो. यामागचं मुळ कारण कारखानदारचं म्हणावे लागतील. आश्चर्य म्हणजे बीड जिल्ह्यात हा उद्योग मोठ्या प्रमाणावर पाय पसरताना दिसतो. सहकारी साखर कारखाने मोडीत काढून अनेकांनी खासगी तत्वावर घेतले आणि काहींनी विकले. याचं मुळ कारण संशोधनाचं असलं तरी कारखानदारी मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभाची कंपनी होवुन बसली हे मात्र नक्की. ज्या कारखान्यांना बायो प्रोडोक्ट उत्पादन प्रकल्प आहेत त्यांची तर चांदीच म्हणावी लागेल. पण ज्यांना केवळ कारखानाच आहे इतर इथेनॉल किंवा ऊर्जा प्रकल्प नाहीत त्यांना कारखानदारी कशी परवडते? हा देखील प्रश्न संशोधनाचा होवु शकतो. त्याहुन अधिक बोलायचं झालं तर कारखाने जे चालवतात अशी माणसं कधीच समाधानाचं बोलत नाहीत. त्यांची चेहरे नेहमीच पडलेली असतात आणि आर्थिक संकट आल्याची भाषा जाणवते. पणा या साऱ्या उद्योगाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न आम्ही जेव्हा केला तेव्हा सत्य माहिती काही तज्ञाकडून मिळते तिथे मात्र हे कारखानदार ऊस उत्पादकांना कसे लुबाडत आहेत? याची प्रचिती येते. गंमत बघा, कारखानदार जेव्हा ऊसाची तोड करण्यासाठी शेतकऱ्यांची रिकवरी पाहातो तेव्हा 12 पेक्षा जास्त रिकवरी असेल तरच ऊसतोड करतो. पण याच ऊसाची रिकवरी कारखाना एफआरपी देण्यासाठी काढतो तेव्हा 8.50ते जास्तीत 9, 9.50 टक्के रिकवरी दाखवतात हा खेळ केवळ शेतकऱ्यांना लुबाडण्यासाठी नाही का? कारण बारा टक्के रिकवरी दाखवली तर केंद्र तथा राज्याच्या आदेशानुसार शेतकऱ्यांना प्रति टन तीन हजार रूपये भाव द्यावा लागेल आणि कमी रिकवरी दाखवली तर मग चोरट्या मार्गाने साखर विक्रीला मिळते शिवाय ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त 2500 पर्यंत भाव द्यायला मिळतो. म्हणजेच 500 रूपये प्रति टन कारखानदाराला आर्थिक लाभ् नफा मिळु शकतो. एवढं प्रचंड नुकसान शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षी सहन करावे लागते. दुसऱ्या बाजुने काटा मारण्याची अनेक कारखानदारांना लागलेली सवय मड्यावरचं लोणी खाल्याप्रमाणे आहे. शेतकरी हा काळ्या माईचं लेकरू म्हणून जिथे ओळखल्या जातं त्यांच्याशी बेईमानी करत जे कारखानदार काटा मारतात त्यांच्या आयुष्याचं कधीही चांगलं होवु शकत नाही हे मात्र तितकंच खरं. कुणी कितीही काटा मारला तरी बिचारा शेतकरी काहीच बोलत नाही. त्याचं कारण मराठवाड्यात शेतकऱ्यांचा कैवार घेणारे नेतृत्व आता कुठे पहायला मिळत नाही. तयारही होत नाही. राजु शेट्टीच्या गर्जना पश्चिम महाराष्ट्रात ऐकायला मिळतात. तिकडे विदर्भात तुपकरांची सुरू असलेली धडपड, खान्देशात अजित नवले मग मराठवाड्याला राजु शेट्टी कधी जन्माला येणार? याची वाट आता शेतकरी पहात असुन या साऱ्या खेळात कारखानदाराकडूना् होत असलेली लुबाडणुक थांबली पाहिजे. यासाठी विचारमंथन होणे महत्वाचे वाटते. साखर रिकवरी कमी दाखवायची. मग भाव कमी देता येतो आणि मग शेतकऱ्यांची लुबाडणुक होते. यासाठी एक कारखाना नव्हे तर साऱ्याच पक्षाचे सारेच कारखाने आर्थिक लुबाडणीच्या खेळात आडकलेले दिसतात. पण शेतकऱ्यांनी देखील आपल्या हक्कासाठी आणि आपली कुणी लुट करत असेल तर त्यासाठी जागं होणं आता काळाची गरज वाटते. तरूण शेतकरी ज्यांना अभ्यास करता येतो अशांनी कारखानदारांच्या मानगुटीवर बसुन शेतकऱ्यांना हक्काचा पैसा मिळवुन देण्यासाठी पुढे येण्याची गरज वाटते.

# आणि डिजिटलच्या युगात



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**Internet चे फायदे तोटे असा होता. मुलांनी तोटा काय किंवा फायदे काय फायदा सांगितला की तोटा येतच येत होता, उदा. एक मुद्दा असा की इंटरनेट मुळे जग जवळ आलेय. त्याचे उलट अर्थी उत्तर, पण माणसे दुरावत गेली. म्हणजे अशी कितीतरी खूप छान छान प्रश्नाची चर्चा चालली होती. चर्चा होऊन शेवटी निष्कर्ष असा की,त्याचा रिमोट कंट्रोल शेवटी आपल्याच हातात आहे. असा त्याचा शेवट झाला.तर सांगायचा मुद्दा बाजूलाच राहिला. मध्यंतरी जरा तब्येत ठीक नसल्यामुळे बाळाला मोबाईल देऊन खाऊ जेवन औषधे देण्याचा प्रयत्न केला. जेणेकरुन पोटात काहीतरी जावे या हेतूने पण लहान मुल ते लहान मुलचं हट्ट करून हट्ट पुरुवून न घेईल तर ते लहान मुल कसले!**

"नाही,नाही, मला हवा आहे म्हणजे हवा आहे."
"अजिबात मिळणारं नाही"
"खूप झाले लाड."
"पाहिजे म्हणजे पाहिजेच "
"एकदा सांगितलेले कळत नाही आराध्य तुला!"
...आणि रागाच्या भरात पटकन हात उचलला गेला,आणि तेवढ्यात हातातला पेन खाली पडला,
आणि ...काय ही कोणती पद्धत वगैरे वगैरे..
डोक्यात वीज चमकावी तशी पटकन कृती बदलली आणि...
हे सांगायचे कारण एवढेच की...ताई म्हटल्या प्रमाणे धरलं तर चावतेय सोडले तर पळतेय् अशीच अवस्था आहे.
मन वढाय वढाय, उभ्या पिकातल ढोर,
किती हाकला हाकला फिरी येतं पिकावर.
अर्था अर्थी तसा या ओळींचा काहीही संबंध नाही.एक संदर्भ म्हणून फक्त या ओळी इथे घेतल्या आहेत.
आजचा विषय पाहिला आणि मध्यंतरीच्या काळात माझ्या मुलीच्या शाळेत एका उपक्रमांतर्गत वाद - संवाद असा एक उपक्रम आयोजित केला होता.
वाद संवादाचा विषय होता
एक अनुभव म्हणून सांगते,जेवण औषधे च्या अर्ध्या तासाच्या कालावधीत अंगात ताप असताना गेम खेळता खेळता एक डोळा इतका लाल झाला त्याची लाली दोन दिवस डोळ्यात दिसत होती.माहित नाही ,मोबाईल मुळे की कशामुळे पण मला तरी वाटते की मोबाईलमुळे तसे झाले होते बहुतेक सांगायचे म्हणजे एक साधे उदाहरण म्हणजे जेवण औषधे देण्यासाठी त्याचा फायदा तर झाला तर झाला पण त्याचा दुष्परिणाम दोन दिवस पाहायला मिळाला, वास्तविक बाहेर गैलारित अंगणात जाऊन झाडे वेली आकाश निसर्ग दाखवत हे करता येऊ शकत होते, पण तसे न करता दूरच्या मार्गा पेक्षा जवळचा आणि सोपा मार्ग केंव्हाही सुखकारकच मोबाईल पाहताना मुले किंवा आपणही त्यात भावनिक दृष्ट्या गुंतत जातो, काल्पनिक आणि वास्तविक या दोन्हीं मधला फरक आपल्याला तर करता येवूच शकतो.किंवा तो आपल्याला करता आलाच पाहिजे, हीच भावनिक गुंतवणूक निसर्गाच्या बाबतीतही आपण करूच शकतो. ,पण तसे ना करता जवळचा मार्ग



निवडला जातो,म्हणजे या सगळ्याला आपणही कुठेतरी जबाबदार आहोत असे मला वाटते. शिक्षणाच्या बाबतीतला एक मुद्दा मोबाईलवर अभ्यास प्रश्न उत्तरे शोधून अभ्यास चांगला होऊच शकतो. पण त्याचे अनेक तोटेही आपल्याला सांगायला नकोत. उलट
एक अनुभव शेअर करावा वाटला म्हणून करतेय
कधीतरी असेही वाटते,एखाद्या क्लासमध्ये २० मुले आहेत ,प्रत्येक मुलाला एक एक पाठ प्रत्येक विषयाचा शिकवायला लावा. अगदी कमी अभ्यास करणाऱ्या मुलगा देखील बघा त्याच्या आत्मविश्वासाने किती तरी त्याच्यात INVOLVE होऊन शिकेल आणि शिकवेल.आणि मुले तो पाठ ही किती आणि कसा लक्षात ठेवतील ,त्याच्यावर प्रश्न विचारून त्याचे योग्य उत्तर आपल्याला मिळू शकेल. याचा अर्थ असाही नाही. की मुलांनाच सगळे करायला शिकवायला लावा,शिक्षकांचा अंकुश तर राहिलाच पाहिजे. कधीतरी म्हणण्यापेक्षा महिन्यातून एकदा या बंद खिडक्यांच्या आणि दारांच्या बाहेर जाऊन मुलांना निसर्गाच्या सानिध्यात जाऊन तिथे अध्ययन अध्यापन करायला लावायचे.प्राणी, फुले, निसर्ग,मोकळी हवा, एखादा मुद्दा पकडून याच गोष्टीच्या मुळापर्यंत जावून तो मुद्दा पाठाचा संबंध घेऊन मुलांना सहज समजू शकेल. शिक्षणात पारदर्शकता असायला हवी असे मला वाटते. मुलांच्या कलाकलाने घेतलेले शिक्षण केव्हाही चांगलेच असावे.असे माझे मत आहे.
याचा अर्थ या वस्तू गॅजेट्स नकोचं , अगदी तोटेच आहेत असंही नाही, त्या एका अनुभवानंतर मी त्याला आकाश निसर्ग असेच काही नाही , पण त्याला घरातील जुन्या मेहंदीच्या कोनाने वहीच्या पानावर मेहंदी काढण्यास सांगितली . पण आजकाल मोबाईल युग ,मला म्हणतो,
"मेहंदी कधी वहीच्या पानावर काढण्यासाठी असते का?"
"वहीवर चित्र काढू शकतो." "मग चित्र काढ."
"तेच तेच काय ग सारखं आई"
मुलांना नविन आणि वेगळे काहीतरी करण्याची हौस असते,मग मी म्हटल
"बर ठीक आहे माझ्या पाया वरती काढ."
आणि त्याच्या नंतर त्याच्या त्या नवनिर्मितीचा तो आनंद आणि आत्मविश्वास त्याच्या चेहऱ्यावर दिवसभर अगदी खुलून आला होता, प्रत्येक वेळी हे शक्य होईलच असे ही नाही, पण काही छोट्या छोट्या कृतीतून काहीतरी निर्मिती होत असते.त्याला मी कधीतरी पोळी भाजी करत असताना एखादी ओळ जुळवाव याला लावते.आणि मुल जुळवता त सुद्धा तेव्हा कधी कधी विषय हास्यास्पद होतो. पण म्हणून .. माघार घ्यावी.
पहिली ते दहावपर्यंत चे मुलांचे शिक्षण म्हणजे मला वाटते की सामाजिक, धर्मिक ऐताहासिक, जीवनातील च एक भाग आहे.अगदी सगळाच आहे,असे नाही पण थोडा फार तरी आहे. म्हणजे एक उदाहरण अगदी भांडी घासत असताना बेसिन मधले पाणी कुठे जाते,असे प्रश्न मुले विचारतात. असे बरचसे प्रश्न मुले विचारत अस तात.अशा बऱ्याच शा वेगवेगळ्या कृती चालूच असतात.त्यावेळेला आपणही नकळत त्याच्याशी संबधित एखादा पाठातील संदर्भ देऊन मुलांच्या विकासात योगदान देऊन , त्याच्या शैक्षणिक स्तर उंचावू शकतो.
याचा अर्थ मोबाईल टिव्ही वाईटच असतात, असे मुळीच नाही.या मोबाईलमुळे
खर सांगू तर विश्वास बसणार नाही, अतिशयोक्ती नाही किंवा अभिमान म्हणून ही नाही.पण मोठ्या गटात असणारा माझा मुलगा बेरीज वाजबकीची गुणाकार ची गणिते कितीतरी सफाईदारपणे करतो.आणि तेही इंग्लिशमधून, पण तेच मराठीच्या अक्षरात अंकात कुठेतरी मागे पडतो. टीव्ही वरील काही हिंदी कार्टून्स मालिकांमुळे हिंदी मोठ्या माणसांपेक्षा ही छान बोलतो. म्हणजे या सर्वाचा तोटा आहे असंही नाही म्हणायचं , आणि फायदा आहे असंही नाही. प्रवाहात वाहताना कधीतरी प्रवाहाच्या उताराला आणि प्रवाहाच्या चढा ला दोन्ही पूर्ण वेगळे आहे.पण म्हणजे कुठे काय करायचे कुठे काय करायचे नाही,हे आपण ठरवू शकतो. योग्य अयोग्य समजून चालले तरच प्रवाहात पोहता येऊ शकेल.सांगण्याच्या उद्देश एवढाच त्याचा वापर कसा करायचा हे तर आपण ठरवूच शकतो ना!
माफ करा यातून भावना दुखवावायाच्या नाहीत. आलेल्या अनुभवातून लेखन करावेसे वाटले ,म्हणून केले.

# सरहद्दीवरून

आधुनिक केसरी

**'सरहद से फिर' हा मनोहर बाथम यांचा मूळ हिंदी कवितासंग्रह आहे. या कविता संग्रहाचा अनेक भाषांत अनुवाद झाला आहे. मनोहर बाथरम हे सैन्यात आजही महा निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. याच पुस्तकाचा मराठी अनुवाद डॉक्टर चित्रा गोस्वामी यांनी केला आहे. या कविता संग्रहाचे नाव आहे 'सरहद्दीवरून'. या कवितासंग्रहात सरहद्दीवरील सैनिकांचे जीवन, सरहद्दीवरील गावातील लोकांचे जीवन तसेच सैनिकांच्या मनातील भाव-भावनांचे यथार्थ वर्णन केले आहे. कवितासंग्रहातील पहिलीच कविता 'अमर्याद' ही सैनिकांच्या मनातील भावना व्यक्त करते.**

मर्यादा कधीच नव्हत्या
सूर, शब्द, हवा, पक्षांना
मर्यादा असतात
फक्त देशाच्या सीमांना
मी पहारेकरी देशाचा
मी होऊ पाहतोय
सूर, शब्द, हवा, पक्षी अमर्याद..

'सरहद्द विसरा' या एका कवितेत सरहद्दीवरच्या सैनिकाला, या रक्ताने माखलेल्या सरहद्दी नकोशा वाटतात तो आवाहन करतो कि, विसरा तो सरहद्दींचा इतिहास, नको ती छातीवर मिरवणारी पदके, नको ती जीवघेणी हत्यारे त्याऐवजी पोटभर भाकरी द्या आणि वाचायला पुस्तके द्या. लज्जा रक्षणापुरते कपडे द्या, छपरांचे घर नसले तरी चालेल फक्त थोडासा दिलासा द्या आणि सुखाची झोप द्या.

दहशतवाद्यांना मारण्याचा आनंद सैनिकांना होत नसतो. त्यांच्या हातून एक माणूस मरत असतो. एखाद्या दहशतवाद्याला मारून काय मिळतं? त्याच्या पर्समध्ये काही नोटा काही पत्र एकाद दुसरा घरातल्या माणसांचा फोटो किंवा प्रेयसीचा फोटो बस्स.. दहशतवाद्याने मरणाला स्वीकारलेलंच असतं पण सैनिकाला मात्र तो लढायला भाग पाडत असतो.


'तपास काम' या कवितेत सैनिकांचा तपास कामाचा अनुभव अंगावर काटा आणणारा असतो. घरातल्या प्रत्येक माणसां सोबत जनावरेही भयभीत असतात. आपल्याला गोळ्या घातल्या जातील या भीतीने... कधी कधी तपास काम करताना धर्माच्या पलीकडे जाऊन माणूसपण दिसते तेव्हा मात्र सैनिकाला देव पावल्याचा आनंद होतो. एक भुकेला माणूस दुसऱ्या भुकेल्या माणसा साठी काहीतरी करू पाहतोय पण सैनिकाला त्याच्याकडेही संशयाने पहावे लागते. एकीकडे सीमेवर माणसांना मारण्यासाठी युद्ध आहे. तर दुसरीकडे अनेक जीवांची भुकेची लढाई सुरू आहे, सैनिकाला हे सर्व उघड्या डोळ्यांनी अनुभवावे लागतं.

तपास करत असताना
तिच्या डोळ्यात संताप
तरीही सावरत स्वतःला
ती तिथे माझी वहिनी
बाळाला जन्म देण्याच्या
शेवटच्या वेणा देत
प्रसूतीच्या अंतिम क्षणात
कृपया मेहरबानी करा

असेही प्रसंग सैनिकाच्या आयुष्यात येतात तेव्हा सैनिक हातबल होतो.

कारण तो सैनिक
असला तरी
प्रथम एक माणूस
असतो.
एखादा
आतंकवादी
लपतछपत
आपल्या
साथीदारांसोबत
येतो तेव्हा
त्याच्यासोबत
एखादी
आतंकवादी स्त्री
सुद्धा असते.
रात्रभर त्याच्या
मिठीत
ती आतंकवादी स्त्री;
बिचारी पत्नी मात्र
तितकीच एकाकी






या कडव्यात आतंकवाद्यांच्या पत्नीच्या भावना काय असतील याचा विचार सुद्धा सैनिक करत असताना दिसतो. 'लढाई माणुसकी संपवण्याची' ही संपूर्ण कविता वाचून जेव्हा आपण शेवटच्या कडव्या पर्यंत पोहोचतो तेव्हा..

नापाक लढाई लढताय तुम्ही
ज्यात हार जीत नाहीत
माणुसकी हरते आणि
परमेश्वराचे नियम सुद्धा..

तेव्हा आपला कपाळ मोक्ष व्हायचा तेवढा बाकी असतो संतापाने रक्त तापलेलं असतं. डॉक्टर चित्रा यांनी शब्दांना जिवंत केले आहे याचा प्रत्यय ही कविता वाचताना होतो.

दोन्ही देशांच्या सीमांवरचे सैनिक एकमेकांना ओळखत नसतात पण तरीही ते एकमेकांचे शत्रू असतात. सैनिक म्हणजे मनाने मेलेले मृत शरीरच जणू ...अशा दोन देशांच्या प्रेतांमध्ये शीतयुद्ध चालू असते. नेहमीच कोणी भुकेलेल्या वर गोळी झाडतो तर कोणाची गोळी गर्भवती स्त्रीला लागते तर कित्येक वेळा निरपराध गोळ्यांना बळी पडत असतात. हे सगळे उघड्या डोळ्यांनी आणि मेलेल्या मनाने पचवायचं असतं एका सीमेवरील सैनिकाला..युद्ध लढणं सैनिकाला अशक्य नसतं पण त्याला जिंकायचे असते ते 'अहिंसक' युद्ध..

'सरहद्दीवरून' या कवितासंग्रहातील कविता फक्त एका सैनिकाच्या नाहीत तर सरहद्दी वरील गावातील जनमानसाच्या या कथा आहेत. सरहद्दी वरील लोक कसे जीवन जगतात हे वाचून अंतःकरण गलबलून जातं. सतत मरणाच्या छायेत जगणं,बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज.. बॉम्बची भीती अशा भितीच्या छायेत मुलांचं घडणं आणि बिघडणं सगळंच कल्पनेच्या पलीकडचं आहे. कविता वाचून झाल्यावर थोडा वेळ आपण कवितेच्या त्याच विषयावर विचार करू लागतो आणि अस्वस्थ होतो. डॉक्टर चित्रा गोस्वामी यांनी कवितेतल्या एका एका शब्दाला जिवंत केलं आहे.

कवितेतील एक एक शब्द म्हणजे बंदुकीच्या गोळ्या आहेत. संपूर्ण कविता वाचताना आपल्या तना-मनावर आगीचा जणू वर्षावच होत राहतो. कधी अंगावर काटे येतात, कधी आपण भावना-विवश होऊन जातो तर कधी कधी प्रचंड संताप येतो. सैनिकांचे जीवन म्हणजे फक्त बंदूक आणि कठीण परिस्थितीत सरहद्दीवर राहणे, शत्रूंचा सामना करणे, युद्ध करणे एवढेच नसून त्या सैनिकाला स्वतःच्या मनाशी, माणुसकीशी आणि आत असलेल्या संवेदनांशी सुद्धा लढावे लागते. आतंकवाद्यांचा सामना बंदुकींच्या गोळ्यांनी करता येईल पण सरहद्दीवरील सर्वसामान्य माणसांचे काय? त्याने कसे जगावे ? सीमेवरील सर्वसामान्य माणूस मात्र स्वतःशीच लढत असतो,आपल्या जगण्या-मरणाशी लढत असतो, याचे सैनिकाला प्रचंड दुःख होते.

एका सैनिकाचे आयुष्य अशा अंधारात घडते ते सामान्य माणसाला माहीत नसते. त्याच्यासाठी तो एक परिपूर्ण प्रतिक आहे जो देशासाठी आपले जीवन अर्पण करतो पण त्याची अनामिकता आणि एकटेपणा कोणास ठाऊक तरी असतो का? 'सरहद्दीवरून' मधील या कविता अशाच सैनिकांच्या आहेत ज्या वाचताना आपण व्यतिथ होतो.

कविता वाचताना कुठेही शब्दच्छल दिसून येत नाही. साधी सरळ शब्दरचना, कविता वाचता वाचता सहज समजत जाते. कविते मधील भावना, क्रोध, मनाचा ठाव घेतात. मध्ये मध्ये अनेक कविता पुन्हा पुन्हा वाचायचा मोह होतो.एक कवयित्री म्हणून डॉक्टर चित्रा गोस्वामी या कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. देशावर आणि सैनिकावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने 'सरहद्दीवरून' हा कवितासंग्रह वाचायलाच हवा.

**जयेश अर्जुन माधव**

# भाऊबंदकीची 'ग्रामीण' गोष्ट



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**आपल्या मराठी साहित्य संस्कृतीला ग्रामीण साहित्याचा फार समृद्ध असा वारसा लाभला आहे. भरत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' ही महाकादंबरीही तोच वारसा पुढे नेणारी. कथेचा भौगोलिक संदर्भ, सांस्कृतिक पार्श्वभूमी ही या कादंबरीची अत्यंत प्रबळ बाजू आहे. मराठवाड्यातील अस्सल ग्रामीण भाषेतले शब्द आणि लहेजा सांभाळत लेखक आपल्यापुढे एका खेडेगावाचं चित्र उभं करतो. व्यवसायाने गावकरी पिढीजात शेतकरी आहेत.**

गाव कसं असेल, तिथली लोकं कशी आहेत ह्याचा प्रत्यय आपल्याला पहिल्या दोन पानातच येतो. गावात ज्या गोष्टी अनपेक्षितपणे घडतात त्याचा लोकांना सहाजिकच धक्का बसतो आणि गावकरी मग सारखी त्याचीच चर्चा करू लागतात. अगदी गावातलं एखादं झाड जरी पडलं किंवा नदीला पूर जरी आला तरी त्यावर चर्चा करणारं गाव आपल्या पुढे उभं रहातं. ह्याच पार्श्वभूमीवर लेखक आपल्याला काशिनाथ आणि विश्वनाथ ह्या दोघा भावांची ओळख करून देतो आणि कथा झरझर पुढे सरकू लागते.



द्वारकाबाईच्या कुटुंबातील भाऊबंदकीची ही प्रातिनिधिक कहाणी. द्वारकाबाईंनी पतीच्या पश्चात आपल्या विश्वनाथ आणि काशिनाथ या दोन मुलांना मोठे करून त्यांची लग्ने लावून दिली आहेत. पिढीजात मालकीची शेतजमीन बऱ्यापैकी. दोन्ही भावांना आधुनिक शिक्षणाचा गंध नाही. काशिनाथ हे गावातलं मोठं आणि सन्माननीय प्रस्थ आहे. गावातल्या लोकांमध्ये त्याचा आदर आणि प्रचंड दरारा आहे. गावातल्या प्रत्येक निर्णयात ज्याच्या शब्दाला मान आहे, प्रत्येक शुभाशूभ प्रसंगी ज्याचा सहभाग आहे, असा काशिनाथ लग्न झालं असूनही एका परस्त्रीच्या (चंद्रीच्या) मागे लागतो आणि गावात चर्चेला तोंड फुटतं. काशिनाथच्या तोंडावर हे सगळं बोलण्याची कुणाची हिंमत नसल्याने त्याचा त्रास विश्वनाथला सहन करावा लागतो. त्यावरुन काशिनाथ आणि विश्वनाथ एकमेकांसमोर उभे ठाकतात आणि भाऊबंदकीची सुरवात होते. त्यांची आई द्वारकाबाईही त्यातून ह्या दोघांना सावरु शकत नाही.

आईचा आपल्या सर्व लेकरांवर एकसारखा जीव असतो. परंतु पक्षपातीपणाच्या आरोपाची वेदना प्रत्येक आईच्या वाट्याला येते आणि द्वारकाबाईही त्यातून सुटलेल्या नाहीत. भाऊबंदकी आणि संकुचित दृष्टीने ग्रासलेल्या द्वारकाबाईच्या कुटुंबात दोन्ही जावा आपापल्या शैलीने कौटुंबिक स्वास्थ्याला तडे देण्यामध्ये व विभक्त होण्यासाठी नवऱ्यांना चेतवण्यामध्ये कृतकृत्यता मानणाऱ्या दिसतात. द्वारकाबाई वयस्कच नव्हे, तर जगाचे सजग भान असलेल्या परंतु सुनांपुढे हतबल ठरत चाललेल्या चितारल्या आहेत. संपूर्ण कादंबरीवर द्वारकाबाईंचे व्यक्तिमत्त्व 'जिवंत' सावलीसारखे छाया करते. ऋतू बदलाप्रमाणे व वयोमानाप्रमाणे कुटुंब आणि घर ,आपल्याच रक्तामाणसाची माणसं यांच्यावरची संपत जाणारी पकड माणसाला किती क्लेशकारक आणि उन्मळून टाकणारी असते हे दाखवण्यात लेखक यशस्वी झाला आहे. सर्वसामान्य ग्रामीण शेतकरी जमीन जुमला असलेल्या सधन कुटुंबातील दोन भावांची हि कथा नकळत वैश्विक व आपल्या सर्वांची होऊन जाते. कुठल्याही मोहाला बळी पडतांना कुटुंब, समाज आणि अनेक गोष्टी आपल्या पावलावर पाऊल टाकून मागोमाग येत असतात. आपल्या सैरभैर वागण्याचे भयंकर परिणाम पुढे आपल्यावर अवलंबून असलेल्या आपल्याच आप्त स्वकियांवर कसे होतात याचे यथार्थ चित्रण हि कथा करते. सत्तापिपासू वृत्ती आणि अहंकाराच्या चक्रीवादळात सापडलेली अनेक कुटुंब आपण पहातो आणि त्यामुळे ही कथा आपल्याला आपल्या जवळची वाटते. शेतीमातीच्या, चुलते भावकीच्या वातावरणात वाढलेल्या प्रत्येक वाचकाला ती भावुक करुन जाते.

कादंबरीमध्ये येणाऱ्या विविध व्यक्तिरेखा मधून कादंबरीचा आशय उलगडत जातो. प्रत्येक व्यक्तिरेखा ही तिच्या काही ना काही वैशिष्ट्यामुळे वेगळी भासते आणि आपला ठसा उमटवून जाते. भाऊबंदकीतून तरारणारी वांझोटी स्पर्धा, केविलवाणी ईर्षा आणि कूपमंडूकी असूया यांचे प्रमाणशील, वास्तवदर्शी चित्रण यांनी ही कादंबरी समृद्ध झाली आहे.

भारत काळे हे काळाचा वेध घेऊन लेखन करणारे कादंबरीकार आहेत. त्यांनी केलेली मानसशास्त्रीय अंगाची मांडणी ही त्यांच्यातल्या वेगळेपणाची ओळख करून देणारी आहे.

त्यांनी मानवी मनाचे अनेक धागे वाचकांच्या समोर आपल्या साहित्यातून मांडले आहेत.मानवी मनाचे बदलत जाणारे कंगोरे...स्त्रीसुलभ कृती...बालमनांचे कवडसे आणि वृद्धांचे शरीर मनाने झुरत झिजत जाणे असे अनेक बारकावे लेखकाने सुंदररित्या मांडले आहेत. काळेंच्या कादंबरीत स्वप्नाळू ध्येयवादाची कृत्रिम लकाकी तर नाहीच, पण निम्नस्तरीय सौंदर्यवादाचे हव्यासी सावटसुद्धा तिला ग्रासत नाही. या महाकादंबरीच्या शोकांताकडे प्रथमपासून झालेल्या आशयपूर्ण अपरिहार्य वाटचालीमध्ये वाचक गुंतत जातो. ४८४ पानांच्या या दीर्घ कादंबरीने ललित साहित्यप्रेमी चोखंदळ वाचकांच्या श्री. काळेंबद्दलच्या अपेक्षा नक्कीच बळावल्या आहेत. बऱ्याच दृष्टिकोनातून तिचे अप्रूप रसिक मनाचा वेध घेते. पुस्तकाच्या मलपृष्ठावरील अभंग आपलं लक्ष वेधून घेतो.

अभंगाच्या ओळी कथेला अगदी समर्पक अशा आहेत. त्यावरुन कादंबरीची कथा काय असेल ह्याची पुसटशी कल्पना आपल्याला येते. आपल्या पोरांची मने सांधण्यात अयशस्वी ठरलेल्या द्वारकाबाईंसारख्या अनेक हतबल मातांना ही कादंबरी लेखकाने समर्पीत केली आहे आणि ती किती सार्थ आहे हे कादंबरी वाचताना क्षणोक्षणी जाणवते.

एकूणच 'ऐसे कुणबी भूपाळ' हि कादंबरी नसून स्वार्थीपणामुळे झालेल्या पडझडीचा, वाताहतीचा जणू एक चित्रपट आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. ही दिर्घ कादंबरी प्रत्येक ग्रामीण वाचकाच्या संग्रहात राहिल यात शंकाच नाही.

**कादंबरी: ऐसे कुणबी भुपाळ**
**लेखक: भारत काळे**
**प्रकाशक: देशमुख आणि कंपनी पब्लिकेशन**

# ओ आय सी ची नसती उठाठेव !



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**ओ आय सी ( ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉपरेशन ) नावाची एक जागतिक संघटना असून त्या संघटनेत जगभरातील ५७ मुस्लिम देश आहेत. या संघटनेवर सौदी अरेबिया या देशाचे वर्चस्व आहे. या संघटनेचे मुख्यालय देखील सौदी अरेबिया या देशाची राजधानी जेध्दा येथे आहे.**

या संघटनेचे महासचिव हिसेन ब्राहिम ताहा यांनी काश्मीर संबंधी नुकतेच एक वक्तव्य केले आहे त्यांच्या वक्तव्याचे पडसाद भारतातच नाही तर संपूर्ण जगात उमटत आहेत. ओ आय सी चे महासचिव ताहा यांनी म्हटले आहे की आमची संघटना काश्मीर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी पाकिस्तान आणि इतर मुस्लिम देशांना सोबत घेऊन एक योजना तयार करत असून ही योजना अंतिम टप्प्यात आली आहे. या योजनेनुसार ओ आय सी भारतावर दबाव आणून पाकिस्तानशी चर्चा घडवून आणेल या चर्चेत पाकिस्तानला पूर्ण न्याय मिळेल. ताहा यांच्या या वक्तव्याचे जगभर पडसाद उमटू लागताच भारताने ताहा यांना चांगलेच खडसावले आहे. काश्मीर प्रश्नांत डोके खुपसण्याचा अधिकार ओ आय सी ला कोणी दिला ? भारताला न विचारताच ओ आय सी काश्मीर संदर्भात एखादी योजना कशी आखू शकते ? काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असताना ओ आय सी काश्मीरला वादग्रस्त भाग असे का संबोधते? काश्मीर प्रश्नी कोणाचीही मध्यस्थी खपवून घेतली जाणार नाही अशी भारताची भूमिका असताना ओ आय सी भारत पाकिस्तानमध्ये मध्यस्थी का करत आहे? ओ आय सी ला मध्यस्थी करायची असेल तर ती पी ओ के वर अर्थात पाकव्याप्त काश्मीरवर करावी कारण पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग असून पाकने तो बळजबरीने बळकावला आहे. अशी रोखठोक भूमिका घेऊन भारताने ताहा यांना चांगलेच झाडले आहे. अर्थात भारताने आपली रोखठोक भुमीका मांडल्याने पाकची मात्र चांगलीच गोची झाली आहे कारण ओ आय सी मध्ये काश्मीर प्रश्न गेल्यास भारतावर दबाव येईल असे पाकला वाटले होते मात्र भारताने आता ओ आय सी लाच खडसावल्याने पाक आणि ओ आय सी कोणती भूमिका घेणार याकडे जगाचे लक्ष लागले आहे. वास्तविक काश्मीर प्रश्नांत नाक खुपसण्याची ओ आय सी ला काही गरज नव्हती. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून त्या संदर्भात कसलीही तडजोड केली जाणार नाही असे भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला अनेकदा सांगितले आहे पण तरीही आंतरराष्ट्रीय पटलावर हा मुद्दा उपस्थित करून पाक आपले हसू करून घेतो. पाकच्या नादिला लागून ओ आय सी सारख्या जागतिक संघटना देखील आपले हसे करून घेतात. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असताना काश्मीर हा आपलाच भाग असल्याचा दावा पाकिस्तान करतो आणि त्यासाठी त्यांनी १९६५, १९७१ आणि १९९९ अशी तीन वेळा भारताशी युद्ध छेडले त्याआधी १९४८ साली त्यांनी टोळीवाल्यांचा रुपात आपल्या सैनिकांना काश्मीरमध्ये पाठवून दिले पण प्रत्येक वेळा भारताने त्यांना पाणी पाजले. समोरासमोर युद्ध करूनही आपण काश्मीर हस्तगत करू शकत नाही हे लक्षात येताच त्यांनी अतिरेक्यांना हाताशी धरून काश्मीर अस्थिर करण्याचा प्रयत्न केला मात्र काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम हटवल्यानंतर अनेक अतिरेकी आणि काश्मीरमधील फुटीरतावादी जेरबंद झाले त्यामुळे काश्मीर अस्थिर करण्याचा पाकचा डावही फसला त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय पटलावर जिथे जिथे संधी मिळेल तेथे तिथे काश्मीर प्रश्न उकरून कढण्याचा नवा उद्योग पाकने सुरू केला आहे. ओ आय सी च्या महासचिवांचे वक्तव्य हा त्याचाच एक भाग. पण भारतही पाकची ही चाल चांगलीच ओळखून असल्याने पाकिस्तानची ही चालही फसते आणि पाकिस्तानला नामुष्की झेलावी लागते. ओ आय सी असोत की आणखी कोणती आंतरराष्ट्रीय संघटना, या आंतरराष्ट्रीय संघटनांनी देखील पाकच्या नादी लागून स्वतःचे हसे करून घेऊ नये कारण काश्मीर प्रश्नी तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी भारत मान्यच करणार नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून यासंदर्भातील कसलीही तडजोड भारतीय नागरिक स्वीकारणार नाही हे ओ आय सी सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी आता तरी ध्यानात घ्यावे.

# गौरवमुळेच वाचले सापाचे प्राण...!



भानुदास धोत्रे
संपर्क क्र: 7972625086

आधुनिक केसरी

**सायंकाळची वेळ. हिवाळ्याचे दिवस असल्यानं लवकरच दिवस मावळला. सगळीकडे अंधार पसरला होता. तरीही स्ट्रीट लाईटच्या प्रकाशात गौरव, सुशांत आणि निखिल डांबरी रस्त्याच्या कडेला कसलातरी खेळ खेळत होते. त्यांचा खेळ अगदीच रंगात आलेला. रस्त्यानं तुरळक रहदारी सुरु होती. नुकताच स्वयंपाकपाणी आटोपून शेजारच्या दोन्ही काकू शतपावली करण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. तेवढ्यात मेघना काकूंना एक मोठ्ठा साप दिसला.**

सापाला पाहताच त्या जोरात किंचाळल्या. त्यांच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून बाजूलाच खेळत असलेली मुले त्यांच्याकडे धावत गेली. काय झालं हे त्यांच्या लवकर लक्षात येईना. अन सापाच्या भीतीनं गाळण उडाल्यामुळे त्या दोन्ही काकूंना पटकन काय झालं ते सांगताही येईना. त्यांच्या अंगाचा नुसता थरकाप उडू लागला. थोडा वेळ निघून गेल्यानंतर मेघना काकूंनी स्वतःला सावरत मुलांकडे बघून नुसता बोटंचा इशारा केला नी "तो बघा मोठ्ठा साप.....! " एवढंच म्हणाल्या.

मुलांनी बोटाच्या ईशाऱ्याकडे पाहिलं, तर साप आपल्या तोंडात भक्ष पकडून तसाच निपचित पहूडलेला त्यांना दिसला. त्याचा आकार चांगला हाताच्या मनगटाएवढा होता. त्याच्या तोंडाकडे निरखून पाहिलं तर तोंडात चक्क अर्धा अधिक गिळलेला बेडूक होता. सापाला पाहताच सुशांत आणि निखिलची भीतीनं चांगलीच गाळण उडाली. "अरे बापरे....!" म्हणत ते दोघेजण बाजूला जाऊन लांब उभे राहिले. जोर जोरात ओरडून रस्त्याने येणारा जाणारांना आवाज देऊन बोलावू लागले. गौरव मात्र थोडा धीट होता. तो तिथेच सापावर लक्ष ठेऊन होता. इतरांनाही गोंगाट करू नका म्हणून बजाऊन सांगत होता. सापानं भक्ष गिळल्यामुळे त्याला जलद हालचाल करता येत नव्हती. त्यामुळे तो पळून जाणार नाही हे गौरवला पक्क माहित होतं.

निखिल आणि सुशांतनं आरडा ओरडा करून माणसांना जमवलं. माणसांनी जवळ येऊन सापाला पाहताच, कोणी दगड घे. कोणी काठी घे. जे हातात पडल ते घेऊन सापाला मारण्यासाठी धावू लागले. "अरे नुसते पाहता काय? मारा त्या सापाला. चांगलाच विषारी दिसतो." असे म्हणून सगळे जण आवेशात पुढे सरसाऊ लागले. पण एकटा गौरव धिटाईन पुढं होऊन त्या लोकांना विनऊ लागला. "थांबा थांबा काका..! नका मारू त्या सापाला. साप हा माणसांचा, शेतकऱ्यांचा मित्र असतो. त्यालाही आपल्यासारखाच जगण्याचा अधिकार आहे.तोही ह्या निसर्गाचा आपल्यासारखाच एक महत्वपूर्ण घटक आहे. हवं तर आपण एक करू. सर्पमित्रांना फोन करून बोलावून घेऊ. ते लगेच येतील अन त्याला पकडून त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देतील. पण त्याला नका मारू प्लिज" असं गौरव सर्वांना विनवणी करून सांगू लागला. पण लोकं त्याला वेड्यात काढू लागले. म्हणू लागले "साप कुठं माणसाचा मित्र होऊ शकतो का? तो तर आपला एक नंबरचा शत्रू. चावला की मृत्यू हा ठरलेलाच." पण गौरव तेथे उपस्थित असलेल्या सर्वांना पुरून उरला. तो अगदी सराईतपणे युक्तीवाद करू लागला. "आमच्या शाळेत आमच्या सरांनी आम्हाला परिसर अभ्यासामध्ये शिकवलं की, साप हा खरंच शेतकऱ्यांचा, माणसांचा मित्र असतो. तो आपल्या आसपासचे आपल्याला उपद्रव देणारे प्राणी खातो आणि आपल्याला त्यांच्यापासून होणाऱ्या त्रासातून मुक्त करतो. तसेच आपल्याकडे आढळून येणारे सर्वच साप हे काही विषारी नसतात. त्यातले बहुतांश साप हे बिनविषारी असतात. अन अगदी बोटावर मोजण्या ईतक्याच प्रजाती विषारी असतात."

गौरवची धीटाई आणि त्याचं सापाबद्दलचं ज्ञान पाहून तेथे उपस्थित असणारे सर्वच लोक अचंबित झाले. गौरवचं म्हणणं त्यांना खरोखर पटलं. पण आता सर्पमित्राला तरी बोलवायचं कसं? आणि त्याचा फोन नंबर तरी मिळवायचा कसा? असा प्रश्न उपस्थित होताच गौरवनं क्षणाचाही विलंब न लावता तेथे उपस्थित लोकांना म्हणाला, " तुम्ही सापाकडे लक्ष ठेवा. मी आत्ता माझ्या परिसर अभ्यासाच्या पुस्तकाच्या पानावर लिहून ठेवलेला सर्पमित्राचा फोन नंबर घेऊन येतो. आमच्या सरांनी धडा शिकवतांना आम्हाला लिहून घ्यायला सांगितला होता. " असं म्हणून तो घराकडे गेला. आईच्या मोबाईलवरून सर्पमित्राला फोन लावून त्याला साप निघालेल्या ठिकाणचा व्यवस्थित पत्ता सांगितला. सर्पमित्रानेही पंधरा ते वीस मिनिटात येतो म्हणून आश्वासन दिलं. सर्पमित्राशी बोलून लगेच गौरव स्पॉटवर हजर झाला. तोपर्यंत दिलेल्या ॲड्रेसप्रमाणे बाईकवर सर्पमित्र येऊनही पोहचला. त्याच्या हातात अकोडा असणारी एक लोखंडी गजाळी होती. हातात साप पकडतांना घालावयाचे खास जाडजूड प्लास्टिक मोजे होते. बारीक बारीक असंख्य छिद्र असणारा एक झाकणबंद प्लास्टिकचा डब्बा होता. त्यानं जवळ येऊन सापाला न्याहाळताच हा बिनविषारी साप असल्याचं खात्रीपुर्वक सांगितलं. एका क्षणात त्यानं सापाची शेपटी पकडून त्याच्या तोंडातील पायाकडून अर्धवट गिळलेला बेडूक बाहेर काढला. तो अजूनही जिवंतच होता. फक्त सापाच्या दातानं गंभीर जखमी झाला होता. त्याला मोकळ्या मैदानात सोडून दिलं. सापाला पकडून सोबत आणलेल्या डब्यात बंद केलं. त्या डब्याला अनेक छिद्र असल्यामुळे साप त्यामध्ये मरत नाही. सापाला डब्यात टाकताच तिथे उपस्थित असणाऱ्या एका जणाणे कुतूहलापोटी सर्पमित्राला प्रश्न केला की, "तुम्ही आता या सापाचं काय कारणार?" यावर तो उत्तरला की, आम्ही असे साप पकडून त्यांना मोकळ्या मैदानात निर्मनुष्य जागेत त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देतो." दुसऱ्याने पुन्हा एक प्रश्न केला की, " तुम्हाला एवढी फुकटची धावपळ करून काय मिळतं?" त्यावर सर्पमित्र उत्तर देतो की, "एक तर आपण निसर्ग साखळीतील महत्वाच्या असणाऱ्या सापांचे प्राण वाचवतो. अगोदरच सापांच्या अनेक दुर्मिळ प्रजाती नष्ट होत आहे. त्या वाचवनं केवळ आणि केवळ आपल्याच हातात आहे. म्हणून भूत दयेच्या दृष्ठिकोनातून आम्ही हे काम अगदी विनामूल्य करतो. त्यातून एक आत्मिक समाधान आणि आनंद मिळतो. तो इतर ठिकाणी कोठेही पैसे खर्चून सुद्धा मिळत नाही." सर्पमित्राचे हे उत्तर ऐकून सर्वजण आवक झाले. तेवढ्यात सर्पमित्राला पुन्हा कुठून तरी साप निघाल्याचा फोन आला, नि तो निघून गेला.

इकडे गौरवच्या चेहऱ्यावर सापाला वाचवल्याचं समाधान स्पष्ट दिसत होतं. तेथे उपस्थित असणारे सर्वजण गौरवच्या धाडसाचं, त्याच्या परोपकारी वृत्तीचं, त्याच्या निर्णय क्षमतेचं, सरांनी वर्गात शिकविलेल्या गोष्टींचं उपयोजन प्रत्यक्ष जीवनात कठीण समयी तात्काळ निर्णय घेऊन करायचं असतं. हे त्याच्या कृतीतून सगळ्यांना दिसून आलं. म्हणून सर्वजण त्याचं तोंडभरून कौतुक करीत होते. वाहवा करीत होते. त्या मेघना काकूंनी तर गौरवला आपल्या जवळ घेऊन अगदी त्याच्या गालाचे मुके घेतले. अन म्हणाल्या की, "खरंच आपल्या भारत देशाला भावी संस्कारक्षम नागरिक म्हणून गौरव सारख्या विद्यार्थ्यांची गरज आहे. तो जर आज इथे उपस्थित नसता तर कदाचित त्या सापाचे प्राण वाचले नसते."

# व्यक्तिगत स्वातंत्र्य हा 'मौल्यवान' अधिकार



व्यक्तिगत स्वातंत्र्य हा एक ''मौल्यवान आणि अविभाज्य अधिकार'' आहे. त्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालय आपले ''साधे घटनात्मक कर्तव्य, बंधन आणि कार्य पार पाडते. त्यात अधिक आणि कमी असे काही नाही, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने शुक्रवारी स्पष्ट केले.

प्रलंबित खटल्यांचे प्रमाण मोठे असताना सर्वोच्च न्यायालयाने जामीन अर्ज आणि क्षुल्लक जनहीत याचिकांवर सुनावणी घेऊ नये, असे विधान केंद्रीय विधिमंत्री किरेन रिजिजू यांनी केले होते. त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाचे वरील भाष्य महत्त्वाचे मानले जाते.

आम्ही आमच्या सदसद्विवेकबुद्धीचे ऐकत नसू तर आम्ही येथे असण्याचे औचित्य काय? अशी उद्विग्नताही खंडपीठाने व्यक्त केली. खंडपीठात न्या. पी. एस. नरसिंहा यांचाही समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या दृष्टीने कोणताही खटला लहान किंवा मोठा नसतो. त्यामुळे आम्ही व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या प्रकरणांवर कारवाई केली नाही आणि याचिकाकर्त्यांना दिलासा दिला नाही तर आम्ही येथे काय करीत आहोत, असा प्रश्न निर्माण होतो, असेही खंडपीठाने सुनावले. उत्तर प्रदेशातील एक याचिकाकर्ते इकराम यांना दिलासा देताना सर्वोच्च न्यायालयाने व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि न्यायालयाचे घटनात्मक कर्तव्य यावर टिप्पणी केली.

**प्रकरण काय?**

उत्तर प्रदेशातील इकराम यांना तेथील न्यायालयाने वीज कायद्याशी संबंधित नऊ फौजदारी खटल्यांत दोषी ठरवले होते. इकराम यांना प्रत्येक खटल्यात दोन वर्षांचा कारावास आणि दंडाची शिक्षा सुनावली होती. ते तीन वर्षांपासून तुरुंगात आहेत. त्यांना ही शिक्षा एकाच वेळी न भोगता क्रमशः भोगावी लागेल, असे तुरुंगाधिकाऱ्यांनी सांगितले होते. त्यामुळे त्यांना १८ वर्षे तुरुंगात राहावे लागेल. उच्च न्यायालयाने दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

**खंडपीठ काय म्हणाले?**

आम्ही व्यक्तिगत स्वातंत्र्याशी संबंधित बाबींची दखल घेऊन कारवाई केली नाही तर ते राज्यघटनेच्या अनुच्छेद १३६ चे (दिलासा देण्यासाठी विशेषाधिकाराची तरतूद) उल्लंघन ठरते. एखाद्या प्रकरणातील तथ्ये सर्वोच्च न्यायालयाला नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षक म्हणून आपले अधिकार वापरण्याची सुस्पष्ट संधी देतात. न्यायालयाने आपले कर्तव्य पार पाडले नाही तर नागरिकांचे स्वातंत्र्य संपुष्टात येईल.

# घरपण



सौ. मनीषा कांदळकर
मु. पो. ता. येवला, जि. नाशिक

आधुनिक केसरी

**स्त्री परमेश्वराची सुंदर कलाकृती. स्त्री केवळ देहाने सुंदर नसून ती प्रेयसी बनते तेव्हा प्रियकराचे भावविश्व बदलून टाकते, ती पत्नी होते तेव्हा कर्तव्य श्रद्धा यांनी चार भिंतीत प्राण ओतून घरपण आणते. निसर्ग ज्याप्रमाणे गाजावाजा न करता काम करीत असतो, फुले फुलवीत असतो त्याप्रमाणे स्त्रिया कुटुंबात सतत कष्ट करून आनंद निर्माण करतात. ती घरात असणारी गृहिणी असो किंवा उच्च विभूषित अधिकारी असो ती कष्टाळू मूर्ती असते. त्यागमूर्ती व प्रेममुर्ती ही भारतीय स्त्रियांची दैवते आहे. स्त्रीचे जीवन म्हणजे पेटलेला अग्निकुंड असतो ती सर्वस्वाने पतीची पूजा करते आणि लग्नानंतर मुलांच्या व पतीच्या इच्छेतच आपली ईच्छा मानते.**

स्त्री सर्वांची सेवा करते परंतु तिला सुख आनंद मिळावा म्हणून कोणी प्रयत्न करते का? कारण स्त्री हृदय नेहमी मुके असते ती फक्त देण्याची वृत्ती ठेवते. एकदा पतीला माझा म्हटला की त्याची लहर सांभाळणे पतीच्या मुखावरचे हास्य म्हणजे पत्नीचे सुख सर्वस्व पती गोड बोलला तर तिला सारं मिळालं.

मुलगा खोडकर व्यसनी असला साऱ्या जगाने मुलाला नावे ठेवली तरीही आई मायेचं पांघरून घालते, मी माझ्या मुलाला प्रेमाचा शब्द दिला नाही तर हे घर तरी कशाला? घर म्हणजे आधार विसावा प्रेम. हे घर पतीसाठी, मुलांसाठी ती प्रेमाने भरून ठेवते. पतीशी स्त्रीचे पटत नाही म्हणून भराभर घटस्पोट घेत राहिलो तर जगात प्रेम त्याग या शब्दांना अर्थ राहणार नाही. संसार म्हणजे तडजोड प्रेमात इतका बळ असते की ते दुर्गुनाला ही सांभाळते. एक दिवस पतीलाही प्रेमाची अनुभूती होईल या आशेवर एकनिष्ठेने ती पतिव्रत सांभाळत असते.

माणूस काम क्रोध विकारांनी भरलेला आहे. हा क्रोध म्हणजे पोटातील विष ती ओतण्याची जागा म्हणजे पत्नी. कोठे तरी आपल्या विकारांना प्रकट होण्यास औसर हवा असतो, म्हणून पत्नी राग रोष सहन करते व पतीला माणूस म्हणून जगात वावरण्याची शक्ती देते, पतीला शांत करते स्थीर करते सय्यम घालते. स्त्रीच्या प्रेमात इतकी शक्ती असते, तेज प्रखरता असते. कर्तव्य करतांना ती अष्टभुजा देवी स्वरुप असते. आजोबा पुस्तकातील ओळी वाचून आपल्या पत्नीच्या आठवणीत गढून गेले. खरोखर जीवनाच्या अखेरपर्यंत साथ दिली. मुलांवर संस्कार केले. मुलांना संस्कार व उच्च विभूषित बनवले. आजोबा मात्र दहा वाजले की सायकलवर टांग मारायचे, "येतो गं कमला" अशी आरोळी देऊन शाळेच्या दिशेने निघायचे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत ते शिपाई होते. पाच वर्षांपूर्वीच रिटायर झाले आणि नातवाला सांभाळणे त्याच्या बाललिला पाहणे यात ते वृद्धत्व विसरले. वर्षभरापूर्वी आजीचं आजारपणात निधन झाले. त्यामुळे आजोबा शरीराने जरी सर्वांबरोबर असले तरी मनाने खूप एकाकी झाले होते.

तेवढ्यात आतून सुनबाईचा आवाज ऐकू आला. "मी मोलकरीण नाही दिवसभर राबायला, तो म्हातारा दिवसभर घरात बसून असतो. काही प्रायव्हसी नाही, तू मात्र घरातून बाहेर पडला की मोकळा असतो. मी पण नोकरी करणार आहे. तसा राकेशला गले लठ्ठ पगार, मोठा फ्लॅट, घर कामासाठी मोलकरीण होती. सुनबाईला फक्त "स्वयंपाक" बनवून प्रेमाने खाऊ घालण्याची व गोड बोलण्याची माफक अपेक्षा बाप लेकांची होती. परंतु सीमा आधुनिक नारीच्या ग्रुपमध्ये होती. त्यात श्रीमंतीचा बडेजाव दाखवण्याची जणू स्पर्धाच लागलेली होती. त्यामध्ये फक्त स्वार्थ शरीराची चोचले आणि विलासी जीवन, पार्टी भीशी, पिक्चर, ब्युटीपार्लर, त्यामुळे एक प्रतिष्ठित उच्चवर्णीय सोसायटी असते. अशी तिची धारणा होती. त्यामुळे अपेक्षा वाढल्या आणि ब्रँडेड वस्तू घेण्याच्या नादात एवढा मोठा पगार ही त्यांना कमी पडू लागला.



रागाने राकेश घराबाहेर पडला. आजोबांच्या हृदयाला तीव्र दुःख झाले, केवळ आपल्यामुळे त्यांच्यात भांडण नको. आजोबांनी वाचत असलेले "भारतीय संस्कृती" पुस्तक ठेवून दिले. व नातवाच्या स्कूलबसची येण्याची वेळ झाली म्हणून बाबा रस्त्यावर उभे राहिले. तेवढ्यात बस येऊन उभी राहिली मुन्नाला बाहेर उभे दिसलेले आजोबा बघून त्याच्या चेहऱ्यावर आनंद झाला व बसमधून उडी मारून आजोबांच्या गळ्याला त्यांनी मिठी मारली. बस्स...! एवढ्या स्वर्ग सुखासाठी आजोबा कसले दुःख सहन करायला तयार होते.

संध्याकाळी राकेश ड्रिंक करूनच घरी आला. घरात तणावाचं वातावरण होतं. सुनबाईने डायनिंग टेबलवर जेवण आणून आदळलं. पण बाबांना वाईट वाटायला नको म्हणून राकेशने दोघांसाठी ताटं वाढली. सीमा मात्र जळफळाट करत किचनमध्ये जेवली. रात्री आजोबांना पुन्हा भांडणाचा आवाज आला. सीमा रागात बोलत होती, "मी शेवटचं निक्षूण सांगते, "उद्या एक तर मी घरात राहील नाहीतर तुमचे वडील." वडिलांना संपूर्ण दुनियेत 'एकटा' असल्याची जाणीव झाली. मुलाच्या संसारात आपले लुडबुड नको म्हणून आपला मार्ग शोधला पाहिजे या विचारातच आजोबांना झोप लागली. पहाटे लवकर जाग आली. त्यांनी आपली बॅग भरली व पहाटेच्या गाडीने ते गावी निघून गेले. आजोबांनी मुलांसाठी चिठ्ठी लिहून ठेवली. मी गावी जात आहे थोड्याच दिवसात परत येईन. राकेश काय समजायचं ते समजला. सीमा घरात कोणी नसल्यामुळे किटी पार्टी, मैत्रिणींचा दंगा यात ती 'घर' म्हणजे काय हेच विसरली.

तिला एका कंपनीत जॉब लागला. बाळाला सांभाळण्यासाठी बाई ठेवली. परंतु त्या बाईला आराम करण्यासाठी आणि टीव्ही बघण्यासाठी आयतच मोठे घर मिळाले. एक दिवस ती टीव्ही बघण्यात इतकी गुंग झाली की मुन्ना बॉल खेळत खेळत गॅलरीच्या दिशेने गेला व बॉल खाली पडला हे बघण्यासाठी तो वरतून डोकावला तसा त्याचा तोल गेला परंतु लोखंडी गजाला घट्ट पकडल्यामुळे तो लोंबकळत राहिला. मुन्ना जोरजोराने रडू लागला. खाली गर्दी जमली. तेवढ्यात सीमा ऑफिसवरून आली तिने खालूनच गॅलरीत मुन्ना बघितला. तशी ती ओरडू लागली पळतच लिफ्टमधून येऊन जोर जोरात दरवाजा वाजू लागली. तोपर्यंत मोलकर्णीने मुन्नाला खाली वाकून त्याचे दोन्ही हात पकडून त्याला वरती ओढून घेतले. मुन्ना जोर जोरात रडत होता. दरवाजा उघडल्यावर बाई पळून गेली.

सीमाला आता सासू-सासऱ्यांची किंमत कळाली. आज पैसा हव्यासासाठी काय अघटित घडणार याची कल्पनाच न केलेली बरी. घरात फक्त उंची फर्निचर, पडदे, महागड्या वस्तूंनी घर बनत नसते. तर घरात प्रेमाची जीवाला जीव देणाऱ्या माणसांपासून घर बनते. तिला आपली चूक कळून आली. तीने गावाकडे सासऱ्यांना फोन लावला, "बाबा मी चुकले तुम्ही उद्याच तुमच्या घरी परत या! हे ऐकून आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू तराळले.

## ओझे



आपण सर्वजण
वहात असतो
कसले न कसले ओझे
कोणी कोणाच्या प्रेमाचे
तर कोणी
स्वतःहून घेतलेल्या जवाबदारीचे
चैनीसाठी घेतलेल्या कर्जाचे
तर कोणी
न घेतलेल्या
कर्जाच्या परतफेडीचे
आज प्रत्येकजण दबलेला आहे
मानसिक ओझ्याखाली
स्ट्रेस, ताणतणाव झालाय
सगळ्यांचाच जिवलग मित्र
आनंदाचे ओझे का नको आहे
कोणालाच ?
स्वत्वामुळे सगळे देत आहेत
आनंदाचा बळी
अन स्वतःहून जातात
दुःखाच्या ओझ्याखाली
ओझे असावे पण
प्रेमाचे, प्रामाणिकपणाचे
चुकीचे काम न करण्याचे
समाजसेवेचे, देशसेवेचे
सर्वांना आनंदी ठेवण्याचे
जमलेच तर
एखाद्याचे ओझे कमी करण्याचे

@संजय काव्या 7743918559

## तुझं असं जाणं

तुझं असं जाणं
अळवावरचं पाणी गं
तुझ्या असण्यानेच
आयुष्यात मोती गं

तुझं असं जाणं
अंगावरचा काटा गं
तुझ्या सारख्या फुलाचा
आयुष्यात सुगंध गं

तुझं असं जाणं
यज्ञातील समिधा गं
तुझ्या असण्यामुळेच
मायेची त्या उब गं

तुझं असं जाणं
रानामधला भास गं
तुझं अस्तित्व सारं
माझ्यासाठी सत्य गं

तुझं असं जाणं
मायेचं त्या वलय गं
तुझ्याविना आयुष्यात
सारेच काही मृगजळ गं

- स्वरानंद



## नातं सासू सूनेच



घरची सून झाली लेक
अन् सासू झाली आई
अस हे गोड नातं
का कुणी समजत नाही ?

दोघी दोन घरातल्या
एकाच घरी आलेल्या
आपापल्या परीनं
संसार सावरु लागल्या..!

भिन्न विचारांच्या दोघी
तरीही समजून घेतात
एकमेकींना साथ देत
संसार फुलवू पहातात..!

सून कधी कधी रुसते
सासू कधीतरी खूप चीडते
रुसव्या फुगव्यातुन त्यांच
नातं घट्ट घट्ट बांधून जाते..!

घर म्हणल्यावर कधी
भांड्याला भांड लागणार
मनातले समज गैरसमज
तेंव्हा उद्वेगाने बाहेर येणार..!

जग मात्र अशाच क्षणाची
वाट आवडीने पाही
दुसऱ्याचां समाधानी संसार
त्यांना का पाहवत नाही ?

©® ज्योती ज.आळंदकर, लातूर.

## आभाळाचा खांब...



आभाळाचा खांब
धुंडे एक पक्षी
उरातली नक्षी
साद घाले..

पार करताना
डोंगर, पहाड
नजरेत झाड
क्षितिजाचे..


सागरही केले
आरपार सात
न्यारीच ती बात
मनाची त्या..

वेध घेता घेता
आकांत मांडला
त्वेषाने भांडला
स्वतःशीच..

दमला भागला
तरीही धावला
शोधही लावला
त्याचा त्याने..

आतून बोलला
'पळू नको लांब
आभाळाचा खांब
तूच लेका..!'

महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि. सांगली
मो. 9765374805




डुब डुब बाजा...

माझी ऐट माझी मजा
तिरछा तिरछा
डुब डुब बाजा

घुंगुर पट्टा उभे कान
माझा मोती माझी शान
बूट न टोपी मी ही राजा
तिरछा तिरछा....

डमरू घुमे दूर दूर
माझ्या सुर तुझा सूर
इजा बिजा आणि तिजा
तिरछा तिरछा....

एकच पाय नाचव रे
डम डमाक वाजव रे
सगळी कडे गाजा वाजा

तिरछा तिरछा
डुब डुब बाजा...

© बलराज संघई
9420015108



## भावना

तुझ्या भावना माझ्या मनाला येऊन का छळल्या
दुरावलेल्या भावना या नव्याने का उजाळल्या

भावनेने भरुनी आणले हृदयाला
श्वासपण लागला आता थरकाप करायला

तुझ्या भावना माझ्या मनाला येऊन का छळल्या
भावनेन या कल्लोळ का माजवला

गच्च गेले भरुनी आभाळ त्यालाही प्रश्न पडला
खंत का वाटली नाही त्याला पुन्हा प्रहार करायला

सुरळीत झाल होत सर्व पुन्हा का आला
ढवळाढवळ करायला

दुरावलेल्या भावना या
नव्याने का उजळावयाला

क्षीण झालेल्या आठवणी त्या
पुन्हा का लावतोय तू वेचायला

तोही बरा आहे तिही बरी आहे
विसवुनी गेलो दोघे तो भुतकाळ आता

का चालुनी आला पुन्हा
दोघांच्या सुखी जिवनात राडा घालायला

सावर तू स्वःताला या मोहमायेपासुन
या भावनेच्या भानगडीत घेऊ नकोस मनाला फसवुन

सावरला गेला यातुन तू समज मिळवला मोक्ष यातुन तु
गेले ते गेले शोक त्याबद्दल पुन्हा नको

नियतीने तुला नविन प्रेम जे दिले
त्यात नव्याने गुंतुनी जा पुन्हा

त्यागुनी टाक दुरावलेल्या भावना
मोह पुन्हा करु नकोस दुरावलेल्या स्वप्नाचा

जे जगताय तुझ्यासाठी
खंबीर उभा रहा तू त्यांच्या पाठी

जसाही आहे तू तसा तू त्यांना हवा आहे..
तुझ्या आपल्यांना तुझी गरज आहे....

लक्ष्मण वाल्डे-कन्नड

## माणुसपण गारठलय...!

माणसांच्या गर्दीतला माणूस
शोधुनीही मिळेना,
माणसा-माणसांच्या ऱ्हदयातल्या
तारकाही जुळेना.

जगतांना भले-बुरे दिवसही थट्टाच
करती,
स्वार्थाच्या चिखलातून
जिव्हाळ्याचा रथही पळेना.

व्यवहारी जगाच्या बाजारातून
चालतांना,
आपलेपणाची मुठभर भिक्षाही
कुणी देईना.

मधुरवाणीच्या संवादाला माणसे
पारखी झाली,
ऊरभेटीची नाळ ही कोणी तोडली
ते ही कळेना.



व्यथा-वेदनांच्या काटेरी प्रवासात
मानवाला,
ममतेच्या भुकेसाठी कोरभर
भाकरही मिळेना.

आता जगणे उदास झाले
धायमोकलून रडण्यास,
ओघळणाऱ्या अश्रुचा गळका
नळही गळेना.

हा कोणता मायाजालांचा काळ
चाल करूनी आला,
इथे माणसातल्या माणुसकीचा
लिलावही टळेना...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## शक्यच नाही रे

शक्यच नाही तुला टाळता येणे
गजरा केसांतला माळता येणे

अगदी तरणी नवेली प्रिया मी तर
शीकव चित्तास सांभाळता येणे

भारी मज वाटते आजही राजा
तू असतानाच हिंदोळता येणे

मित्रा जमणार नाही मला आता
श्वासातूनी तुला गाळता येणे

सांगा की आज येईल का राया
त्या मकरंदात गंधाळता येणे

घे ना समजून सगळे घरी असता
अवघड रे वेळ ती पाळता येणे

जमवू ना छान दोघे सहमतीने
गाठी संसार गुंडाळता येणे

- रज्जाक शेख (श्रीरामपूर)
9665778558



तुकारामनीती
भाग 38

# शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोसुलें ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068


आधुनिक केसरी

**संत तुकारामांच्या अभंगांचे बारकाईने सिंहावलोकन करतांना त्यांचे लक्ष काय काय होते(?) याचा अंदाज घेणे मोठे कठीण आहे. तुकाराम गाथ्यातील पहिल्या शब्दांपासून आणि तुकोबांना कळायला लागल्यापासून त्यांचा एकेक शब्द आणि एकेक क्षण हा केवळ आणि केवळ समग्र मानवजातीचे उत्थान व्हावे याच उद्देशाने प्रकट झाला आहे. प्रथम आणि अंतिम लक्ष केवळ आणि केवळ मनुष्य असल्यामुळे त्यांच्या गाथ्यातील अभंग मानवी सर्वशक्तीमत्वाच्या चिंतनाने ओतप्रोत भरले असून भक्ती-ज्ञान आदींच्या आधारे इथला माणूस माणूस शक्तिमान झाला पाहिजे हेच होते. "कोठे कांहीं कोठें कांहीं । एक आहे दुजे नाहीं।" प्रमाणे या पृथ्वीतलावर अनंत जीवांचे चलनवलन चालू असतांना त्या सर्व जीवांत सर्वश्रेष्ठ जर कोण असेल तर तो फक्त माणूस! पण दुर्दैवाने माणसाने अजून स्वतःला ओळखलेच नाही! तो केवळ भौतिक वस्तूंमध्ये अडकवून त्यात स्व अस्तित्व शोधतो आहे! इथेच माणसाच्या आनंदी जगण्याची गोची झाली. त्याच्या जवळ असलेली प्रचंड सामर्थ्य-शक्ती याची त्याला जाण नसल्यामुळे तो नेमाने राशिभविष्य पाहतोय, कुण्या तरी बुवा-बाबांना आपल्या हस्तरेषा दाखवून आपल्या भाग्यरेषा जाणून घेण्याचा हास्यास्पद प्रयत्न करतोय!**

या एवढे माणसाचे दुसरे दुर्भाग्य असूच शकत नाही! ज्याच्याकडे विश्वातील सर्वच गोष्टींच्या किल्ल्या असतांना तो कस्तुरीमृगासारखा सुगंधासाठी रानोमाळ हिंडतो आहे! हे केवळ आजचे सुरु नाही, फार फार काळापासून असेच वडिलोपार्जित संपत्तीसारखे चालत आले आहे! मानवातील ही सगळी वेड्यांची लक्षणे पाहून तूकोबांनी आपल्या शब्दसामर्थ्याने समाजाचा तळ ढवळण्याचे महत्कार्य केले. त्यासाठी त्यांनी अनेक अभंग खर्ची घातले, त्यापैकीच एक म्हणजे **शरीर दुःखाचें कोठार ।शरीर रोगाचें भांडार । शरीर दुर्गंधीची थार ।नाहीं अपवित्र शरीरा ऐसें ॥१॥ शरीर उत्तम चांगलें ।शरीर सुखाचें घोसुलें । शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥धृ॥ शरीर विटाळाचे आळें ।मायामोहपाश जाळें । पतन शरीराच्या मुळें ।शरीर काळें व्यापिलें ॥३॥ शरीर सकळही शुद्ध ।शरीर निधींचाही निध । शरीरें तुटे भवबंध ।वसे मध्यभागीं देव शरीरा ॥४॥ शरीर अविद्येचा बांधा ।शरीर अवगुणांचा रांधा । शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुधा एक शरीरीं ॥५॥ शरीरा दुःख नेदावा भोग ।न द्यावें सुख न करीं त्याग । शरीर वोखटें ना चांग ।तुका म्हणे वेग करीं हरिभजनीं ॥६॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 660)** हा एक अभंग.

घट म्हणजे घडा किवा घागर, परंतु घट म्हणजे शरीर हा सुद्धा एक अर्थ असून, हा घडा कशाने भरलेला आहे( ?) हे जाणणे अत्यंत गरजेचे आहे. हा अभंग काळजीपूर्वक वाचल्यानंतर स्वामी विवेकानंदांचे, "ईश्वर व मानव, संत व पापी यांच्यात ज्या एकाच गोष्टींमुळे फरक पडतो, तो म्हणजे अज्ञान ही होय. सर्वश्रेष्ठ मानव व तुमच्या पायाशी सरपटणारा किडा यांच्यात कशामुळे फरक आहे? अज्ञानामुळेच. सर्व भेद ह्या अज्ञानामुळेच होत असतो; कारण त्या छोट्याशा सरपटणाऱ्या किड्यातही अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत पवित्रता वसत आहेत, अनंत भगवान वसत आहेत. ते सध्या अव्यक्त आहेत, आपल्याला त्यांना व्यक्त करावे लागेल. हे सत्य म्हणजेच अध्यात्मिकता होय, आत्म्यासंबंधीचे शास्त्र होय." हे विचार वाचल्यानंतर सहजतेने हे लक्षात घ्यायला हवे की; खरंच मानवाचे ध्येय्य किती मोठे असावे, परंतु आज भोवताल मानवाला मिळालेल्या अनमोल शरीराची किंमत उरली नाही ही फार मोठी खंत आहे.

या अभंगात तुकोबाराय मानवी शरीराची क्षणभंगुरता विषद करतांना मानवी शरीर कसे आहे? याची एकएक उत्तरे देतांना दिसतात. तुकोबांना मानवी शरीराचे शास्त्राचे "शरीर आद्यम् खलु धर्मसाधनम्" हे वचन चांगल्याप्रकारे ज्ञात असल्याचे जाणवते. आपले इप्सित साध्य करण्यासाठी मानवी देह सर्वोत्तम साधन असून त्या आधारे सामान्य माणूस 'नराचा नारायण होऊ शकतो' ही शक्ती आहे. परंतु माणसाने नकारात्मक विचार करून शरीराचा गैरवापर करायला प्रारंभ केला. याचा परिणाम म्हणजे अनंत व्याधी यात येऊन बसल्या. शरीर आनंदाचे साधन होण्याऐवजी ते 'दुःखाचे कोठार आणि रोगांचे भांडार' करून टाकले. तसे पहिले तर मानवी शरीराची नवद्वारे सातत्याने द्रवत असतात. त्यामुळे त्याला शुचिर्भूत ठेवणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे, अन्यथा तात्काळ दुर्गंधी यायला लागते. माणसाने आपले शरीर अंतर्बाह्य स्वच्छ ठेवल्यास त्याच्या शरीराची आणि मनाची दुर्गंधी येणे बंद होईल. हा जसा शरीर शुद्धीचा मार्ग महत्वपूर्ण असतांना माणसाने त्याचा विपरीत वापर करायला सुरुवात केली आणि तिथेच सगळ्या अडचणी उभ्या राहिल्या. तुकोबाराय आपल्याला हवे ते ध्येय्य प्राप्तीचे शरीर हे उत्तमात उत्तम साधन असल्याचे प्रतिपादन करतात. सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य असा एवमेव सर्वश्रेष्ठ प्राणी आहे, जो आपला निरनिराळ्या कार्यातून आत्यंतिक उत्कर्ष करून घेऊ शकतो अन्यथा पारमार्थिक मार्गाने अनंताची प्राप्ती करून घेऊन परमोच्च सुखानंदाचा अखंड उपभोग घेऊ शकतो. मानव वेळीच जागृत होऊन तो या दोन्ही प्रकारचा उत्कर्ष साधून घेऊ शकणारा एकमेव प्राणी आहे आणि त्यासाठी शरीर हेच सर्वोत्तम साधन त्याच्याकडे आहे हे विसरून चालणार नाही. आपण आकर्षणाच्या मोहपाशात अडकायचे की मुक्त होऊन आपला उद्धार करून घ्यायचा( ?) हे आपल्याच हाती आहे. जन्मापासून ते मरणापर्यंतचा काळ या शरीरानेच व्यापलेला असून शरीराचे पतन करायचे की उत्थान करायचे? हे आपल्याच हाती आहे. तुकोबांना मानवी इतिहासाचा किती सूक्ष्म अभ्यास होता( ?) हे या अभंगातून लक्षात येते. शरीर हे सर्वात शुद्ध असून 'निधीचे निध' म्हणजे सर्व धनात श्रेष्ठ धन आहे. त्यासाठी शरीराने संसाराचे सर्व भावबंध तोडून त्याच्या केंद्रस्थानी



असलेला आत्म-ईश्वर जाणल्यास प्रत्येक माणूस महामानव झाल्याशिवाय राहणार नाही. माणसाने ठरवले तर आपले शरीरच विद्येचा अथवा अविद्येचा बांधा होऊ शकते. मानवी शरीरच गुण अथवा अवगुणांचा रांधा म्हणजे संसार होऊ शकते. शेवटी तुकोबाराय, शरीर चांगले की वाईट( ?) हे केवळ आणि केवळ माणसाच्या विचार-आचारावर अवलंबून आहे याचे प्रकर्षाने प्रतिपादन करतात.

मानवी देहाचे अनेक संत-महंत-विचारवंतांनी महत्व विषद केलेले आढळून येते. देह ही अनमोल तिजोरी आहे. या तिजोरीत आपण कोणते धन साठवून ठेवतो? हा फार मुलभूत प्रश्न आहे. मानवी देह हा देवाचे मंदिर असून त्यात आपण कोणत्या देवाची प्रतिष्ठापना करणार आहोत? हे फार महत्वाचे आहे. माणसाला नरदेह प्राप्त होणे किती भाग्याचे आहे? या अनुषंगाने संत एकनाथ महाराज 'भरत खंडे नरदेहप्राप्ती । हे तो परम भाग्याची संपत्ती' असे लिहून माणसाचा जन्म अतिदुर्मिळ असून तो भारतात होणे त्याहीपेक्षा दुर्मिळ आहे असे सांगतात. मानवी शरीर किती दुर्लभ आहे? या संबंधाने संत ज्ञानोबाराय एका अभंगात

दुर्लभरे दुर्लभरे दुर्लभु संसारु कां नेणा
। आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा ॥

असे लिहून लोकांना जागृत करतात. मानवी जन्माचे महत्व अनेक ठिकाणी विविध धर्म ग्रंथात पाहायला मिळते. जसे भागवतात संत एकनाथ महाराज मानवी देह किती अनमोल आणि दुर्मिळ आहे? याविषयी लिहितात,

होका सकळ भाग्याचे फळ । मनुष्य देह गा केवळ ॥

एवढा दुर्मिळात दुर्मिळ मनुष्य देह आम्हास लाभला असतांना आपण त्याचा विनियोग कसा आणि कशासाठी करतो? हा अत्यंत मुलभूत प्रश्न आज घडीला आपल्या समोर उपस्थित आहे.

असा हा अतिदुर्लभ आणि अतिदुर्मिळ नरदेह आपणास लाभला आहे. नरदेह हे निधान म्हणजेच सर्व धनाचे धन आपल्याला सापडले आहे. ज्यांना ज्यांना याची जाण झाली त्यांनी आपला काळ सार्थक करून या निधानाच्या सहाय्याने आत्मकल्याणाबरोबरच आपला भोवताल आनंदी केला. महापुरुष अत्यल्प जीवन जगले परंतु 'आपला काळ सार्थक' करून ते निघून गेले. दुसरीकडे शंभर वर्षे जगलेली माणसे आपल्या भोवताल फक्त काटे पेरण्याचे काम करतात, म्हणजेच त्यांनी त्यांच्या शरीराचा दुर्गंध सगळीकडे पसरवत आहेत, तर काही माणसे सुगंधी फुलाप्रमाणे काही तास जगून जगाचे कल्याण करून जाताहेत. संत ज्ञानदेव केवळ २१ वर्षे जगले परंतु ज्ञानेश्वरी, हरिपाठ, चांगदेव पासष्ठी आणि अनुभवामृत यासारखे अनमोल ग्रंथ जगाला देऊन नित्य प्रकाशमान झाले. दुसरीकडे संत तुकोबाराय केवळ ४२ वर्षे जगले परंतु आपल्या जगण्या-वागण्या-बोलण्या-लिहिण्याने तमाम मानवजातीचे कल्याण करण्याचे महत्कार्य केले. असे एक ना अनेक महामानवांनी आपल्या जगण्याने तमाम मानवाचे कल्याण केले. आज वर्तमानात माणूस अनावश्यक बाबींची व्यर्थ चिंता आणि आत्मकल्याण साधण्याच्या विचारापासून दूर जात असल्यामुळे एवढे सर्वोत्तम शरीर लाभले असतांनासुद्धा त्याचा योग्य विनियोग केला जात नाही ही अत्यंत खेदाची बाब म्हणावी लागेल. माणसाला आत्मानंदासाठी संत विचारांची, सत्संगतीची गरज असतांना माणूस व्यसनांच्या आहारी गेला आहे. गुटखा, तंबाखू, दारू या जीवघेण्या पदार्थांचे सेवन करून उत्तम-चांगले असणारे मानवी शरीर खऱ्या अर्थाने 'दुःखाचे कोठार, रोगांचे भांडार आणि दुर्गंधीचे थार' करून ठेवले आहे. तेंव्हा चला महानुभावांनो, आपल्या दुर्मिळ शरीराचे महत्व जाणून घेऊन स्वतःसह आपला भोवताल आनंदी-निरोगी करूया! असे झाल्यास तुकोबांनी दिलेल्या या इशाऱ्याचे आणि त्यांच्या या तुकाराम नीतीचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही! जय तुकोबाराय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# अभिनयातले डॉक्टर श्रीराम लागू !



१७ डिसेंबर जेष्ठ अभिनेते डॉ.श्रीराम बाळकृष्ण लागू यांचा स्मृतीदिन होय. आपल्या कसदार अभिनयाने व संवाद फेकीने तमाम रसिक चाहत्यांवर त्यांनी ठसा उमटवला. सातारा येथे १६नोव्हेंबर १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला.भावे हायस्कूल येथे प्राथमिक शिक्षण झाले, पुढील शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालय,बी .जे. वैधकीय महाविद्यालय पुणे येथे झाले.एमबीबीएस केल्यानंतर विदेशात दातांच्या शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण घेऊन काही काळ अफ्रिकेत वैद्यकीय प्रॅक्टीस केली. महाविद्यालयीन जिवनातच त्यांनी अभिनयाचे धडे गिरवले. शंभरहून अधिक चित्रपट, तसेच ४०हून अधिक नाटकांमध्ये त्यांनी अभिनय केला. त्याच बरोबर दिग्दर्शन क्षेत्रात त्यांनी काही चित्रपटांचे दिग्दर्शन केले. त्यांची नटसम्राट मधील अप्पासाहेब बेलवलकर भूमिका अजरामर ठरली. मराठी चित्रपट पिंजरा चित्रपटातील मास्तरांची भूमिका प्रेक्षक कधीच विसरणार नाही. कलावंताने नेहमी भूमिकेवर स्वार व्हायचे असते, असे ते नेहमी म्हणत. सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांनी केले. लग्नाची बेडी त्यांनी गावोगावी प्रयोग केले. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. नट म्हणून जितके ते श्रेष्ठ होते.तितकेच माणुस म्हणून ते महान होते. गरीबांकरीता त्यांच्या मनात आपुलकी होती सामाजिक दृष्टीकोनातून त्यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण होते. त्यांना साहित्याची आवड होती. वाचनाचा व्यासंग होता. आपला व्याप सांभाळून ते अफाट वाचन करीत असे. श्रीराम लागू यांना तन्वीर नावाचा मुलगा होता. परंतु एका दुर्दैवी अपघातात त्याचे निधन झाले. या धक्क्यातुन त्यांना सावरणे कठीण झाले होते. त्यांच्या आयुष्यातील एक हा दुःखद प्रसंग होता. मराठी चित्रपटांपैकी सामना, सिंहासन, पिंजरा हे चित्रपट दर्जेदार ठरले.त्यांना १९७८ साली घरोंदा चित्रपटासाठी फिल्मफेअर पुरस्कार, १९९७साली कालिदास सन्मान,२००६साली दिनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान चा जिवन गौरव पुरस्कार, २०१२मध्ये राजर्षी शाहू कला गौरव पुरस्कारानी त्यांना गौरवले गेले. आमच्या श्रीगोंदा तालुक्यात एका ग्रामीण साहित्य संमेलनासाठी ते प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. पत्रकार या नात्याने मला त्यांना भेटण्याची संधी मिळाली होती. अतिशय नम्र व आपुलकीने विचारपूस त्यांनी केली. आपल्या मातीशी प्रामाणिक असणारे व्यक्तिमत्त्व होते. १७डिसेंबर त्यांचा स्मृतीदिन आहे.खरोखर अभिनयाचे ते डॉक्टर होते. वयाच्या ९२व्या वर्षी १७डिसेंबर २०१९रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. डॉ. श्रीराम लागू यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

आधुनिक केसरी

लय भारी
## सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# कच्च्या कवठाची चटणी



कवठ (हिंदीमध्ये कैथा/कबीत, गुजरातीमध्ये कोठा, इंग्रजीमध्ये वुड ऍपल) हे औषधी मूल्य असलेले फळ आहे. फळाला कडक हिरवट तपकिरी कवच असते आणि पांढऱ्या बियांसह तपकिरी रंगाचा लगदा असतो. पिकलेल्या फळांना गोड आणि आंबट वास असतो. (गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहीती).

कवठ चटणी ही अतिशय चवदार गोड आणि आंबट चटणी बनवण्याची सोपी रेसिपी आहे. ही चटणी बनवण्यासाठी फक्त काही घटक आवश्यक आहेत. जर तुम्हाला चटणी ताबडतोब खायची असेल किंवा 2-3 दिवस टिकते.मग लिहून घ्या साहित्य आणि कृती.....

**हिरव्या कवठाची चटणी**- साहित्य :- दोन तीन कच्चे कवठ , दोन चार हिरव्या मिरच्या,आल्याचा तुकडा, लसणाच्या दोन तीन पाकळ्या, तीन चार चमचे ओलं खोबरं, फोडणीचे साहित्य, हिंग, हळद,मीठ साखर चवीनुसार .....

कृती::- कवठ फोडून आतला गर चमच्याने काढा . गॅसवर कढई ठेवून त्यात तेल घालून मिरच्यांचे तुकडे, लसुण पाकळ्या, कवठाचा गर परतून घ्या म्हणजे त्याचा कचवट पणा कमी होईल. परतलेले मिश्रण कोमट झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात घाला त्यात खोबरे, जिरे, चवीनुसार मीठ साखर घालून बारीक करून घ्या. त्यावर खमंग हिंग, जिरे मोहरी, मेथी दाणे घालून फोडणी करून घालावी व मिश्रण एकसारखे करून चटणी सर्व्ह करवी . चटणी फ्रिजमध्ये चार पाच दिवस टिकते. लसूण पाकळ्या घातल्या नाही तरी चालतील .मग करून बघा आणि कळवा नक्कीच.

# श्री नवनाथ माहिती

आधुनिक केसरी

**श्री दत्त जंयती निमित्ताने आपण श्रीदत्त अवतारी श्रीगुरू बद्दल माहिती घेत आहे सर्वात प्रथम संत श्री गजानन महाराज शेगांव निवासी यांची आणि श्रीदत्त स्वरूपी श्री साईबाबा यांची माहिती पाहिली आज आपण श्रीनवनाथ यांच्या बद्दल माहिती घेऊ श्रीनवनाथ नावे:- मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ, हे नऊ नाथ आहेत.**

आधुनिक केसरी

मुळात जन्मोजन्मीच्या कर्मबंधनांमुळे शरीर मलिन झालेले असते, आणि या नाडया मलाने भरल्याने संचारास उपयुक्त नसतात. योगमार्गात वर्णन केलेल्या बस्ती, धौती, नेती, त्राटक, नौली आणि कपालभाती या षट्क्रियांद्वारे ज्या वेळी मनुष्य शरीरातील नाडयांना मलापासून मुक्त करून घेतो, त्या वेळी कुंडलिनी जागी होते. मूलाधारचक्रापासून वर जात जात शेवटी आज्ञाचक्र पार करून ती सहस्त्ररचक्रात पोहोचते, त्या वेळी साधकास आत्मानुभूती प्राप्त होते आणि कैवल्याचा अनुभव येतो. या सर्व गोष्टी घडत असताना योग्य दिशेने प्रगती करण्याकरिता साधकास गुरूच्या देखरेखीची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे यामध्ये साहजिकच गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नाथ संप्रदायातील गुरू-शिष्याला उपदेश करताना त्यास कर्णमुद्रा धारण करायला लावतो आणि त्याचा कान उघडतो-फाडतो, त्यावरून कानफाटा असे नांव या संप्रदायातील लोकांना पडले आहे. अनुयायांनी विशिष्ट प्रकारची वेशभूषा करणे अपेक्षित असते. कर्णमुद्रा, शैली, शृंगी, झोळी, कंथा, एकतारी, पुंगी इत्यादी वस्तू हे गुरू धारण करतात. नियमित स्नान करून अंगास विभूती फासणे आवश्यक असते. 'अलख निरंजन'चा गजर करून भिक्षा मागणे आणि 'आदेश' शब्दाने इतरांशी अभिवादनादी क्रिया करणे असे प्रघात यांच्यामध्ये आढळतात. असे असले, तरी केवळ बाहय वेश महत्त्वाचा नाही, असे नाथपंथातील ग्रंथांमधून अनेक वार सांगितलेले आढळते. या धारण करावयाच्या वस्तूंमागेसुद्धा काही विशिष्ट तत्त्वज्ञान असून, ते समजून त्याचे आचरण करणे हे सर्वात महत्त्वाचे होय. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे शिव आणि दत्तात्रेय ही नाथ संप्रदायातील महत्त्वाची दैवते होत. याशिवाय ज्या विविध संप्रदायांनी नाथांचा मार्ग अनुसरला त्यांनी प्रायः आपापली दैवतेही सोबत आणली असावीत. त्यामुळेच बहुधा, इतर अनेक देवतांच्या मंत्रांचा समावेश नाथपरंपरेत झाल्याचे आढळते. दुर्गा, भैरव, नरसिंह, राम, हनुमान अशा अभिजनांच्या दैवतांसोबतच लोकधर्मातील म्हसोबा, वेताळ यासारख्या दैवतांचा, तसेच मुस्लीम पीर आणि फकिरांचा उल्लेख असणारे अनेक मंत्र नाथपरंपरेत सापडतात. ज्या ठिकाणी नवनाथांची वस्ती झाली अगर त्यांनी मठ स्थापिले ती ठिकाणे नाथांची तीर्थक्षेत्रे असून नाथपरंपरेतील जोगी अशा ठिकाणची यात्रा करतात. त्र्यंबकेश्वर, द्वारका, पुष्कर, रामेश्वर, हिंगळजा, गिरनार, गोरखपूर, पैठण अशी असंख्य ठिकाणे नाथांशी संबंधित असल्याचे प्रसिद्ध आहे. नाथ परंपरेमध्ये एकूण १२ पंथ विद्यमान असून त्यातील काही आदिनाथाने प्रवर्तित केले तर काही गोरक्षनाथांनी, अशी मान्यता आहे.

महत्त्वाचे सिद्ध नाथांच्या परंपरेत असंख्य सिद्ध आणि साधक होऊन गेले आहेत. त्यातील काही सिद्धांचा परिचय या ठिकाणी आपण करून घेऊ. मत्स्येन्द्रनाथ अथवा मच्छिन्द्रनाथ हे परंपरेनुसार नाथसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले जातात. मासळीच्या पोटात असतानाच त्यांनी शिवाने पार्वतीला केलेला उपदेश ऐकल्याचे मानले जाते. शाक्तसंप्रदायातील एक महत्त्वाचा पंथ जो कौलमार्ग या नांवाने विख्यात होता, त्याचे अनुयायी मच्छिन्द्रनाथ होते, असे विद्वानांचे मत आहे. त्यांच्या नांवावर कौलनिर्णय नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. या ग्रंथातून असे दिसते की, सिद्धांत म्हणून जरी शिव-शक्तीवर आधारित विचार मान्य असला तरी हठयोगावर आधारित आसन-प्राणायाम- चक्रध्यान इत्यादी मार्गाने जाऊन कुंडलिनी जागृती साधणे सर्वसामान्यांकरिता आवाक्याबाहेरचे ठरते. त्यामुळे आचरण्यास सोप्या अशा सहजयोगाची कास धरणे योग्य होय. नामस्मरण आणि ध्यानसाधना या दोहोंच्या साहाय्यानेही कुंडलिनीजागृती करून घेता येते, असे सहजयोग सूचित करतो. चौरंगीनाथ हे असेच प्रसिद्ध नाथ होत. नवनाथभक्तिसार या सुप्रसिद्ध ग्रंथामध्ये त्यांचे चरित्र सांगितले आहे. विदर्भ देशाचा राजकुमार म्हणून जन्माला आला असूनही सावत्र आईच्या दुष्कृत्यामुळे त्यास वडिलांकडून हातपाय तोडून टाकण्याची शिक्षा मिळाली. गोरक्ष आणि मच्छिन्द्रनाथांनी त्यास उचलून आणले आणि



त्याच्याकडून तपाचरण करवून घेऊन त्यास गुरुपदेश दिला. चौरंगीनाथांचा उल्लेख तिबेटी परंपरेतही केला जातो. चर्पटीनाथ हे असेच एक प्रसिद्ध सिद्ध होत. त्यांच्या काही रचनांमध्ये त्यांनी स्वतःस गोपीचंदाचा बंधू म्हटले आहे. 'नवनाथ भक्तिसार' या ग्रंथामध्ये मात्र चर्पटीनाथ ब्रह्मदेवाचे पुत्र असून त्यास प्रत्यक्ष दत्तात्रेयांनी उपदेश केल्याची कथा सापडते. जालंदरनाथ हे मच्छिन्द्रनाथांचे गुरुबंधू आणि थोर सिद्ध होते. नवनाथांची कोणतीही नामावली पाहिली तरी त्यामध्ये यांचा उल्लेख निश्चित असतो. वज्रयान परंपरेतील ग्रंथ, शिवदिनमठसंग्रह, तत्त्वसार, हठयोगप्रदीपिका, योगवासिष्ठ अशा इतरही अनेक ग्रंथांमध्ये यांचे नाव आदराने घेतल्याचे दिसून येते. ते मूळचे जालंदरचे असण्याची शक्यता आहे. त्यांच्या नावावरून त्यांचा जन्म यज्ञातून झाल्याची कथा प्रसृत झाली, असेही काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. परंपरेप्रमाणे कानिफनाथांना जालिंदरनाथांनी अनुग्रह दिला होता.

नवनाथांमधील सर्वात प्रसिद्ध सत्पुरुष म्हणजे गोरक्षनाथ. गोरक्षनाथांशी संबंधित कथा आणि स्थाने भारतभरात, तसेच आसपासच्या नेपाळ आणि तिबेटसारख्या देशांतही आढळतात. त्यांनी नाथपंथाची धुरा वाहत भारतभर भ्रमण करून हा संप्रदाय सर्वदूर पोहोचविला. इतकेच नव्हे, तर त्यांचे गुरू मच्छिन्द्रनाथ ज्या वेळी वाममार्गीय साधनेकडे वळले, तेव्हा त्यांना सावध करून पुन्हा मूळ मार्गावर आणले. संस्कृत आणि हिन्दी अशा दोन्ही भाषांमध्ये त्यांनी रचना केल्या असून त्यांचे सिद्धसिद्धान्त पद्धति, योगमरतड, अमरौघप्रबोध इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

नवनाथ आणि सिद्ध नामावलीतील अनेक सिद्धांचा महाराष्ट्राशी अगदी घनिष्ठ संबंध आहे. नागार्जुनाचा शिष्य कणेरीचे समाधिस्थान नेवाशाजवळ दाखविले जाते. हे रसेश्वर संप्रदायातील एक महत्त्वाचे आचार्य होते. नाथसिद्धांच्या परंपरेतील आनंदभैरव, मंथानभैरव, काकचंडी, सूरानंद हे शैव कापालिक होते असे दिसून येते. वीरशैवसंप्रदायाशी जवळून संबंध असलेले अल्लमप्रभू आणि रेवणसिद्ध हे नाथसिद्धांच्या परंपरेशीदेखील संबंधित होते. महाराष्ट्रातील नाथपरंपरेत सर्वात महत्त्वाचा उल्लेख करावा लागतो, तो निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वरांचा. मच्छिन्द्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ आणि त्यांच्याकडून ज्यांना उपदेश मिळाला ते (मातीच्या गोळ्यापासून अजाणतेपणी निर्माण झालेले) गहिनीनाथ होते. या गहिनीनाथांनी निवृत्तिनाथांना गुरुपदेश केला आणि पुढे ज्ञानेश्वरांना हाच नाथपरंपरेचा वारसा निवृत्तिनाथांकडून प्राप्त झाला. सहजयोगाचा वारसा पुढे चालू ठेवताना या परंपरेत प्रामुख्याने नामस्मरण, आणि भक्तिमार्गावर भर दिलेला आढळतो. ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिका', 'अमृतानुभव' यांसारख्या ग्रंथांचे डोळसपणे वाचन केल्यास त्यांनी नाथसंप्रदायाचे गुहय तत्त्वज्ञान अगदी सोप्या भाषेत उकलून दाखविल्याचे दिसून येते. ज्ञानेश्वरांनी एक प्रकारे नाथ संप्रदायाला भागवत भक्तीशी एकरूप केले आणि सहजयोगास उज्ज्वल स्थान प्राप्त करून दिले. अगदी नजीकच्या भूतळातील पावसाचे स्वामी स्वरूपानंद हे देखील याच परंपरेतील असून त्यांनीही 'स्वामी म्हणे माझा नाथ संप्रदाय। अवघे हरिमय योगबळे।।' इत्यादी उक्तींद्वारे आपली परंपरा स्पष्ट केली आहे.

गोरक्ष आणि इतर प्राचीन नाथांच्या संस्कृत आणि हिंदी रचना आणि ज्ञानेश्वरांनी निर्मिलेले विशाल ग्रंथभांडार यांसोबतच चिन्तामणिनाथांचा ज्ञानकैवल्य, आदिनाथभैरवाचा नाथलीलामृत, धुंडिसुत मालुकवीचा नवनाथभक्तिसार, गोपाळनाथ आणि त्यांच्या शिष्यपरंपरेतील 'श्रीनाथलीलाविलास', 'गुरुगीता', 'समाधिबोध', 'निजरत्नकर' इत्यादी ग्रंथ नवनाथ परंपरेचा अभ्यास करण्याकरिता विशेष महत्त्वाचे ठरतात. संप्रदायाची स्थापना मत्स्येंद्रनाथ ऊर्फ मच्छिंद्रनाथ यांनी केली, आणि गोरक्षनाथ ऊर्फ गोरखनाथ यांनी त्याचा पुढे विकास केला. नाथपंथ वा नाथ संप्रदाय हा शैव संप्रदायातील एक योगप्रधान संप्रदाय असून ह्याचा उगम (सुमारे ८व्या ते १२वे शतकात) आदिनाथ परमेश्वर शिव ह्याच्यापासून झाला, अशी ह्यांच्या अनुयायांची समजूत आहे. योगमार्गाने सिद्‌घावस्था प्राप्त करणे, हे ह्या पंथाचे ध्येय होय. नवव्या शतकातील मच्छिंद्रनाथ हे ह्या संप्रदायाचे पहिले मानवी गुरु. गोरखनाथांनी ह्या संप्रदायाला नावारूपाला आणले. नाथ संप्रदायाचा उगम कोठे झाला, ह्याबद्दल मतभेद आहेत. ह्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पाया म्हणजे शिव हेच अंतिम सत्य असून तोच पिंड बह्मांडाचा आधार होय, ही भूमिका.. नाथांचे नवनाथ कोण ह्याविषयी अभ्यासकांत एकमत नाही. नाथपंथीयांना सिद्‌घी प्राप्त असून ते अनेक प्रकारचे चमत्कार घडवून आणू शकतात, अशी समजूत आहे. भारतात आणि महाराष्ट्रात ह्या पंथाला महत्त्वाचे स्थान आहे ज्ञानेश्वर हे नाथपंथाशी संबद्‌घ होते. ज्ञानेश्वरांना नाथ संप्रदायाची शिकवण त्यांचे वडील बंधू निवृत्तिनाथ ह्यांच्याकडून मिळाली होती. त्यामुळे वारकरी संप्रदायाशी नाथपंथाचा संबंध आला. नाथ संप्रदाय वर्णव्यवस्थेला मानत नाही. भारतातील वेगवेगळ्या धर्मपंथांशी नाथपंथाचा कोणत्या तरी स्वरूपात संबंध आलेला दिसतो. बौद्ध धर्माच्या भारतातील शेवटच्या काळात महायान पंथात तांत्रिक कर्मकांड रूढ झाले होते. त्याचाच वारसा नाथ संप्रदायाने पुढे चालवला असे म्हणता येईल. या संप्रदायाच्या रूपनाथ येथील मंदिराशेजारी सम्राट अशोकाचा शिलालेख सापडला आहे. उगमस्थान- त्र्यंबकेश्वर हे नाथसंप्रदायाचे पहिले मानले जाते. याच ठिकाणी गुरू गोरक्षनाथांनी नऊ नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश केला आहे. ते उपदेश केलेले ठिकाण म्हणजे अनुपम शिळा होय. या अनुपम शिळेला बोलीभाषेत अनुपान शिळा असेही संबोधन आहे. अनुपम शिळा महत्त्व- ब्रह्मगिरीवरील कौलगिरीच्या पोटाला अनुपम शिळा आहे. या अनुपम शिळेविषयीची नाथांची धारणा अशी एकदा सिंहस्थ कुंभमेळ्यात साठ हजार ऋषी सध्या जिला अहिल्या नदी म्हणतात तेथे स्नान करीत होते. गुरू गोरक्षनाथ बालस्वरूपात तेथे आले व तेही स्नान करू लागले. त्या वेळी त्यांनी "हर हर गंगे' अशी हाक दिली. बाकीचे ऋषी म्हणू लागले की ही गंगा नाही, गोदावरी आहे. तू तिला गंगा कसे काय म्हणतोस? त्या वेळी गोरक्षनाथांनी गंगेची आराधना केली. प्रत्यक्ष गंगा तेथे प्रकट झाली. त्या वेळी ऋषींनी विचारले, महाराज तुम्ही कोण आहात. तेव्हा गोरक्षनाथ मूळ रूपात प्रकट झाले. तेव्हापासून नाथसंप्रदाय तिला गंगा मानतात. त्यामुळे ज्याला सामान्य व्यक्ती अहल्या-गौतमी संगम म्हणतात, त्यालाच नाथसंप्रदायाचे साधू गंगा-गौतमीचा संगम मानतात.

**नागपंचमी महत्त्व-** दर बारा वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ याच संगमावर स्नान करतात. साठ हजार ऋषींच्या विनंतीवरून गुरू गोरक्षनाथांनी त्यांना उपदेश देण्याचे मान्य केले. त्या सर्व ऋषींना घेऊन गोरक्षनाथ कौलगिरीकडे गेले. तेथे त्यांनी एका शिळेवर सर्व ऋषींना बसवून उपदेश दिला. त्यातील गुरू गोरक्षनाथांची सांगितलेला प्रत्येक शब्द जसाच्या तसा नऊ जणांनी ग्रहण केला. त्यांना नवनाथ असे म्हणतात. तो उपदेश ऐकून ८४ जण उभे राहिले व त्यांना त्यातील भावार्थ समजला. म्हणून त्यांना सिद्ध म्हणतात. नवनाथ व ८४ सिद्धांना या शिळेवर गुरू गोरक्षनाथांची उपदेश केल्याने या शिळेला अनुपम शिळा म्हणतात. अनुपम म्हणजे उपमा नसलेली शिळा.

# 'मस्तानी'

आधुनिक केसरी

**मस्तानीचे व्यक्तिमत्त्व नेमके कसे होते? ती कायम गैरसमजांच्या झाकोळाखाली का राहिली? बाजीरावांचे असामान्यत्व या ना त्या कारणाने सिद्ध होत राहील. परंतु मस्तानीचे काय? मस्तानीबद्दल तिरस्कार मात्र तिच्या मृत्यूनंतरही संपला नाही. 'श्रीमंत पेशवे बाजीराव-मस्तानी' या 'ई टी. व्ही. मराठी' वरील मालिकेतून सध्या तिच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला गेला. मस्तानीच्या अगम्य व्यक्तिरेखेचे रहस्य उलगडण्यासाठी या मालिकेच्या लेखकाने सखोल संशोधन केले आहे. या लेखकाचा, मस्तानीचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणारा लेख-**



शिवाय ती खानदानी नसून ती निजामाच्या रक्षेची मुलगी आहे, शहाजन खानाची कलावंतीण आहे- अशा कपोलकल्पित गोष्टींचा पुण्यात बोभाटा सुरू केला. आणखी एक आवई अशीच उठवली गेली, ती म्हणजे मस्तानी आल्यामुळे बाजीरावांचे काशीबाईंवरील लक्ष उडाले. परंतु वास्तवात मात्र मस्तानीचे व काशीबाईंचे संबंध सौहार्दाचे होते. मस्तानी आल्यानंतर ही काशीबाईंना तीन अपत्ये झाली. यातून एक गोष्ट दिसते, ती म्हणजे चारही बाजूंनी मस्तानीवर हल्ले होत होते. यात थोडा अंकुश होता, तो शाहू महाराजांचा. त्यातच बाजीरावांनी मस्तानीला तीन गावे इनाम दिली. पाबळ इथे मोठा वाडा बांधला. शनिवारवाडयात प्रशस्त हवेली बांधली. एवढे नव्हे तर, समशेरच्या मुंजेची तयारी सुरू झाली. या सर्व गोष्टींनी पेशवे कुटुंब धास्तावले. त्यांचा विरोधास आणखीनच धार चढली. त्यातच या लढयात पुण्यातील ब्रह्मवृंद उतरला आणि बघता बघता राजकारणात व रणभूमीवर महाप्रतापी ठरलेले बाजीराव कौटुंबिक संघर्षांत मात्र पराभूत झाले.

पेशवे कुटुंबाने मस्तानीला अटक केली. मस्तानीला मारण्याचे गुप्त मनसुबे रचले गेले. खरे तर मस्तानी ही योद्धा होती. तिने दिल्लीच्या मोहिमेत बाजीरावांच्या रिकिबीला रिकीब लावून घोडा पळविला होता; परंतु इथे मात्र बाजीरावांच्या अनुपस्थितीत एकटी मस्तानी असहाय्य झाली, अगतिक झाली. ती सहनशीलतेची ढाल पुढे करून जगण्याची पराकाष्ठा करीत होती; परंतु अखेरीस ती कोसळली.

आजही मस्तानी-बाजीरावांचे इंदोर येथील वंशज म्हणतात ते खरेच! मस्तानीला मराठी मुलखाने न्याय दिला नाही. मस्तानी ही कधीच सत्तालोलुप नव्हती. महत्त्वाकांक्षी नव्हती. सुखलोलुप नव्हती. तसे असते तर एवढे बुंदेला येथील वैभव, ऐश्वर्य, आई-वडील आपला मुलुख सोडून ती हजार किलोमीटर एवढया दूर पुण्यात आली नसती, यावरूनही ते सिद्ध होते. ती पुण्यात आली. राहिली. तिने इथली भाषा, पेहराव स्वीकारला. राऊंच्या पाठोपाठ काशीबाईंचे प्रेम मिळवले. मात्र ही पुण्याई तिच्यासाठी तुटपुंजी ठरली.

इतिहासाच्या कोणत्याही कालखंडात निर्दोष समाज हा भारतात कधीच नव्हता, आजही तो नाही. आणि तो तर तीनशे वर्षांपूर्वीचा काळ होता. परंतु, बाजीरावांनी सामाजिक सौहार्दाचा प्रकाश मस्तानीच्या रूपात पाहिला होता. तो मस्तानीच्या रुपाने त्यांना मराठी मुलुखात पेरायचा होता; परंतु तत्पूर्वीच बाजीराव मृत्यू पावले. त्यांच्या मृत्यूची खबर ऐकताच मस्तानीही त्या धक्क्याने पाबळ येथे मृत्यू पावली. सर्वसाधारण समज आहे, की मस्तानीमुळे बाजीरावांची राजकारणावरील पकड ढिली झाली, दुर्लक्ष झाले. व्यसनाधीनता वाढली; परंतु तो समज निखालस खोटा आहे. मस्तानी बाजीरावांच्या जीवनात आली ते वर्ष आहे इ. स. १७२२. यानंतर ११ वर्षांत त्यांनी १२ लढाया केल्या आणि मस्तानीच्या अगोदर त्यांनी १० लढाया केल्या आहेत. दुसरी गोष्ट मस्तानीमुळे गृहकलह पेटला असतानाही परकीय नादीर शहाचे आक्रमण होताच सबंध हिंदुस्थान वाचवण्यासाठी त्यांनी नर्मदेच्या तटावर सैन्य उभे केले होते. दक्षिणेत नादीर शहा उतरला नाही, यातील एक प्रमुख कारण बाजीराव होते. नादीर शहापाठोपाठ त्यांचे नासीरजंगाशी युद्ध झाले, त्याला पराभूत केले. हे युद्ध मोठे होते. आपल्यावर व मस्तानीवर होणारी बदनामी तलवारीच्या टोकावर झेलत त्यांनी मराठी राजकीय सत्तेची पुनर्रचना केली. त्याचे साम्राज्यात रूपांतर केले. होळकर, पवार, खेर (बुंदेला) शिंदे या मराठा सरदारांची नर्मदेपलीकडे अभेद्य फळी उभी केली, तो त्यांच्या व्यवस्थापनाचा व दूरदृष्टीचा महनीय नमुना होता.

चारित्र्यसंपन्न, निर्व्यसनी, बुद्धिमान, कष्टाळू, अलोट देशप्रेम अशा बाजीरावांच्या अकस्मात मृत्यूने मराठी राजसत्तेवर दूरगामी परिणाम झालेले आपल्याला आढळतात. वयाच्या विसाव्या वर्षी ते पेशवे झाले आणि चाळिसाव्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. म्हणजे राजकीय आयुष्य फक्त २० वर्षांचे. या २० वर्षांत त्यांनी ज्ञात २२ लढाया केल्या. आपल्या सरदारांच्या ३००च्या आसपास लढायांचे व्यवस्थापन केले व मुख्य म्हणजे ते अजिंक्य राहिले. बाजीरावांचे असामान्यत्व या ना त्या कारणाने सिद्ध होत राहील. परंतु मस्तानीचे काय? मस्तानीबद्दल तिरस्कार मात्र तिच्या मृत्यूनंतरही संपला नाही हेच. ना हिंदू-मुस्लीम ऐक्याचा गुलाब गळून पडला, ना त्याच्या सौंदर्यास किंमत, ना त्याच्या सुगंधास. तो फक्त अणकुचीदार काटयांना धनी झाला.

खरे तर हा महाकादंबरीचा विषय. मस्तानीचे खरेखुरे वास्तववादी जीवन लोकांपुढे यावे, असा एक प्रयत्न प्रामाणिकपणे होण्याची गरज होती. तो प्रयत्न निर्माते नितीन चंद्रकांत देसाई यांच्या विजया राणे दिग्दर्शित 'श्रीमंत पेशवे बाजीराव-मस्तानी' या 'ई टी. व्ही. मराठी'वरील मालिकेतून सध्या घेतला जात आहे. मस्तानीच्या अगम्य व्यक्तिरेखेचे रहस्य उलगडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

# आरोग्यदायी सफरचंद

आधुनिक केसरी

घरातील वयस्कर मंडळी असो, शिक्षक असो, हेल्थ एक्सपर्ट्स असो बालपणापासूनच असे आपल्या आयुष्यात बरेच शुभचिंतक असतात जे नियमित एक तरी सफरचंद खाण्याचा फुकट सल्ला आपल्याला देत असतात. सफरचंद सर्वांनाच आवडतं असं नाही पण तरीही एक सफरचंद १०० फळांची उर्जा देणारं फळ आहे. म्हणूनच रुग्णालयात असणा-या सर्व रुग्णांना डॉक्टर रोज सफरचंद खाण्याचा सल्ला देतात शिवाय भेटायला येणारी प्रत्येक व्यक्ती सफरचंदच घेऊन येताना दिसते. सफरचंद आरोग्यास लाभदायकच नाही तर भूकेवर विजय मिळवण्यासाठी देखील उपयुक्त ठरतं. दिवसातून ३ ते ४ सफरचंद खाल्ल्यास आपली



डायटींग यशस्वी होऊ शकते आणि पोटंही भरलेलं राहतं. इंग्रजीत एक सुप्रसिद्ध म्हण आहे, 'AN APPLE KEEPS DOCTOR AWAY' अर्थात 'रोज एक सफरचंद खाल्ल्यास डॉक्टरला दूर ठेवता येते' आणि हे का खरं आहे हेच आज आपण जाणून घेणार आहोत. सफरचंदाचे फायदे जाणून घेण्याची सुरुवात ही डोक्याला होणा-या फायद्यांपासूनच करुया. सफरचंद खाल्ल्याने मेंदूला नक्की काय फायदा होतो. हेल्थ एक्सपर्ट्सनुसार नियमित एक सफरचंद खाल्ल्याने आपली बुद्धी ऍक्टिव आणि कुशाग्र बनते. तणाव आपल्या डोक्यावर हावी होऊ शकत नाही. कारण सफरचंदातील विशेष पोषक तत्वं आपल्या डोक्यातील प्लेजर हॉर्मोन्स वाढवण्यास मदत करतात. जे लोक न चुकता दररोज सफरचंदाचे सेवन करतात त्यांना स्मृतीभंशाचा सामना करावा लागत नाही.

# "ये रात ये चाँदनी फ़िर कहाँ..."

आधुनिक केसरी

**तुटलेल्या ताऱ्यांना पाहून आता जिची आठवण सतावते, अबोल झालेल्या नजाऱ्यातून जिची चाहूल लागते, जिच्या गुलज़ार हकीकती; उसळत्या लाटा गावू लागतात, आसवांत भिजलेला वारा अन थबकलेले मेघ सांगतात जिची आधी-अधुरी कहानी... कसं विसरता येईल त्या मस्तानीला?**

सिनेसृष्टीचा; पन्नास-साठच्या दोन दशकातला तो काळच इतका नादमधुर आहे की, मीच काय; माझ्यासारखे या चित्रपटसृष्टीचे लाखों चहेते आजही त्या आठवणींचा आनंद लूट लूट लुटताहेत! सी. रामचंद्रांचं संगीत लाभलेली 'अलबेला' चित्रपटातली 'श्याम ढले खिड़की तले...' 'शोला जो भड़के...', 'भोली सूरत दिल के खोटे...', ही सगळीच गाणी तेव्हा सुपर हिट ठरली होती.

गीता बाली ती जान-ए-हमदम होतीच तशी! टपोर असे बोलके डोळे, ठसठशीत नाक, पार काळजात घुसणारी नजर, अन मोहक चेहऱ्यावरील लाघवी हासू 'अलबेला'ची ती हसीन आशा नेहमीसाठी माझ्या मनात जाऊन बसली. त्यानंतरही तिचे जुने चित्रपट बघण्याचा तो सिलसिला पुढेही चालूच होता. १९८४ची गोष्ट असेल, माझ्यातल्या कॉलेजकुमारचं वय संपून मी नोकरीसाठी मुंबईत आलो होतो. उल्हासनगरच्या चाळ मधल्या दोन रुमच्या खोलीतही माझी ही गाण्यांची, चित्रपटांची आवड काही कमी झाली नव्हती. टू-इन-वन अन कॅसेटच्या त्या जमान्यात माझ्या आवडीची लताजींची काही खास गाणी, मी कॅसेटमध्ये रेकॉर्ड करुन ठेवली होती. विशेष म्हणजे त्यात गीता बालीवर फिल्मांकित झालेलं 'जेलर' चित्रपटातलं 'हम प्यार में जलनेवालों को...' हे अतिशय आवडतं गाणं सुद्धा होतं.

गीता बालीचा जन्म १९३०ला विभाजनपूर्व पंजाबमधील सरगोधा शहरात, मोहयाल या अतिशय गरीब अशा शीख कुटुंबात झाला होता. कर्तारसिंग बाली हे तिच्या वडिलांचं नाव. ते चांगले गायकच नाही तर एक छान किर्तनकारही होते. त्यांच्या मांडीवर बसून छोटीसी गीता त्यांना साथ द्यायची. त्यामुळेच की काय तिच्या वडिलांनी तिचं नाव हरकिर्तन कौर असं ठेवलं होतं.

पुढे, चित्रपटात तिला ब्रेक मिळाल्यानंतर त्यांचं कुटुंब मुंबईत आलं. वयाच्या बाराव्या वर्षी १९४२ला प्रदर्शित झालेल्या 'द कोबलर' या चित्रपटात तिने बाल कलाकाराची भुमिका साकारली होती. नायिका म्हणून १९४६ला आलेला 'बदनामी' हा तिचा पहिला चित्रपट. बलराज साहनी हे या चित्रपटाचे नायक होते. या नंतर १९४८ला प्रख्यात दिग्दर्शक, पटकथा लेखक, निर्माता आणि गीतकार किदार शर्मा यांनी 'सुहाग रात' चित्रपटात तिला नायिकेची भुमिका दिली, तसं गीता बालीचं नशीब फळफळलं!

'सुहाग रात' पाठोपाठ प्रदर्शित झालेल्या 'दुलारी', 'बड़ी बहन', 'बावरे नैन' आणि 'बाज़ी'सारख्या चित्रपटांनी अवघ्या तीन चार वर्षातच तिला स्टारपद बहाल केलं. कुणासाठीही चॅलेंज ठरावी अशी यशाची शिखरं अगदी कमी वयातच तिने पादाक्रांत केली. 'बावरे नैन''मध्ये ती राज कपूरसोबत दिसली, तर 'बाज़ी'मध्ये तिच्या साथीला देव आनंद होता. १९५२साली आलेल्या 'आनंद मठ' या ऐतिहासिक चित्रपटात तिने अभिनीत केलेलं, 'वंदे मातरम...' हे गाणं अजूनही माझ्या डोळ्यांसमोर उभं राहातं. पृथ्वीराज कपूरसारख्या कसलेल्या दिग्गज अभिनेत्यासोबत बेधडक होऊन ती वावरली होती.

बऱ्याचशा चित्रपटात काम केल्यानंतर १९५३ला ती स्वतः निर्माती झाली. निर्माती म्हणून तिचा पहिला चित्रपट होता 'बाज'! १९४६ ते १९६५ या एकोणीस वर्षाच्या कारकिर्दीत अवघ्या सत्तावीस, अठ्ठावीस चित्रपटातून त्यावेळच्या आघाडीच्या श्याम, राज कपूर, भारत भूषण, अशोक कुमार, देव आनंद, गुरु दत्त, शम्मी कपूर या सर्वच नायकांसोबत आपली सिने कारकीर्द तिने बहरती ठेवली. त्यातही रोमँसिंग विथ लाईफ जगणाऱ्या माझ्या आवडत्या देव सोबत, 'बाजी', 'जाल', 'कश्ती', 'मिलाप', 'फ़रार' आणि 'पॉकेटमार' हे सहा चित्रपट तिने केले. सचिन देव बर्मन यांनी संगीत बद्ध केलेली देव सोबतची तिची काही गाणी आजही माझ्या खास गाण्यांमध्ये सम्मिलीत आहे. 'तदबीर से बिगड़ी हुयी...' बाजी १९५१ / 'ये रात ये चाँदनी फिर कहाँ...', 'दे भी चुके हम...', 'चोरी चोरी मेरी गली...' जाल १९५२.

## मला भावलेली सिनेरत्न

मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236






रसिक हो, गेल्या वर्षभरापासून 'आधुनिक केसरी'मध्ये प्रकाशित होणाऱ्या "मला भावलेली सिनेरत्न" या लेख माझ्या मालिकेतील आजचा हा शेवटचा लेख! माझ्या सर्वच लेखांना आपण भरभरून दिलेले प्रतिसाद हे मला एक आगळा उत्साह, चैतन्य आणि ऊर्जा बहाल करुन गेलेय. वेळोवेळी आवर्जून दिलेल्या सुंदर सुंदर अशा अभिप्रायाबद्दल ज्ञात, अज्ञात अशा सर्वच रसिक वाचकांचे शतशः आभार!

पन्नासच्या दशकाच्या सुरवातीला हिंदी सिनेसृष्टी ही भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रभावापासून थोडी दूरच होती. तेव्हा अनेक प्रकारच्या संगीताचा सिनेसृष्टीवर प्रभाव होता, त्यापैकी वेस्टर्न म्युझिक हे एक होतं. 'जाल' चित्रपटातल्या 'चोरी चोरी मेरी गली...' या गाण्यावर वेस्टर्न म्युझिकचाच प्रभाव जाणवतो. या गाण्याचे बोल आणि त्याचं संगीत इतकं काही गोड आहे ना की, गीता बालीच्या मुग्ध नजरेच्या त्या अभिनय खेळात आपण केव्हा हरवून जातो ते आपल्यालाच कळत नाही. लताच्या मधाळ सुरांसोबत तबल्यावर पडणारी खंजिरीची थाप आणि देवचा हळुवार पदन्यासही या गाण्याला मौज-मस्तीची एक वेगळी खुमारी बहाल करुन गेलाय. कधी न नाचलेला देव या गाण्यात चक्क थिरकलाय.

सगळ्याच धर्मावर विश्वास असलेल्या आणि त्यांचा सन्मानही करणाऱ्या गीता बालीची स्मरणात राहिलेली काही खास गाणी, 'मेरे दिल की घडी...', बदनामी १९४६ / 'चले जाना नहीं...' बड़ी बहन १९४९ / 'सुन वो बैरी बलम...' बावरे नैन १९५० / 'दिल धड़के नजर शरमाये...' अलबेला १९५१ / 'शरमाये काहे...' बाजी १९५१ / 'सुनो गजर क्या गाये...' जाल १९५२ / 'भुला नहीं देना जी...' बारा दरी १९५५ / 'सारी सारी रात तेरी...' अजी बस शुक्रिया १९५८ / 'हम प्यार में जलनेवालों को...' जेलर १९५८.

प्रसन्न मुद्रेच्या या अभिनेत्रींच्या सौंदर्यात तिचा एक छोटा दात अजूनच भर घालायचा. शास्त्रीय संगीत, नृत्य, घोडेसवारी, तलवार बाजी अशा बऱ्याचशा कलांवर तिचं प्रभुत्व होतं. ऑल इंडिया रेडिओवर ती गाणी सुद्धा गायिली होती. गुरु दत्त हे गीता बालीचे मोठे चाहते होते. मोठमोठे कलाकार तिच्यासोबत काम करायला उत्सुक असतानाच्या त्या काळात शम्मी कपूर तिच्या आयुष्यात आला. शम्मी कपूर तेव्हा अजून नवीनच होते. 'रंगीन रातें' चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी एका साहसी प्रसंगामुळे शम्मी कपूर गीता बालींवर लुब्ध झाले. या चित्रपटाच्या शूटिंगचा तो किस्सा तसा रोमहर्षकच आहे. शम्मी कपूरला त्या काळी शिकारीचा खूप शौक होता, आणि शिकार करायला त्या काळी मनाई नव्हती. नैनिताल जवळच्या रानीखेत परिसरात आऊट-डोअर शूटिंगला असताना जंगल रस्त्यावर शम्मी कपूर एकदा कारमध्ये होते आणि त्यांच्यासोबत गीता बाली सुद्धा होती. एवढ्यात समोरुन अचानक वाघ आला. वाघाला जराही न घाबरता गीता बाली सरळ गाडीच्या बोनेटवर जाऊन बसली. शम्मी कपूर जवळ तेव्हा बंदूक होती, बंदूक पाहून ती शम्मीला म्हणाली,

**"शम्मी तो बघ वाघ, लाव निशाना"**

तिचं ते मर्दाना बोलणं ऐकून शम्मी कपूर तर अचंबितच झाले. त्याच वेळी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली - हीच आपली बायको होईल. मात्र; या सगळ्या गडबडीत वाघ कुठं तरी पसार झाला. त्यानंतरही शम्मी तिला नेहमी म्हणायचे, 'चल, आपण लग्न करु या' पण ती नाहीच म्हणायची. मात्र एक दिवस शम्मी जेव्हा लग्नासाठी तिच्या मागेच लागले, तेव्हा ती उत्तरली - 'चल करु या, मात्र आत्ता या क्षणी करावं लागेल.' ती वेळ रात्री दहा साडे दहाची असेल. लगेचच, मलबार हिलच्या बाणगंगा मंदिरात ते गेले, पण तिथल्या पुजाऱ्याने सांगितलं की, मंदिर आता बंद झालंय, पहाटे चारला उघडेल, तुम्ही तेव्हा या. ठरल्यानुसार दोघंही पहाटे चारला पोहचली आणि तिथं त्यांचं लग्न लागलं. विशेष म्हणजे; गीता बालीच्या पर्समध्ये असलेल्या लिपस्टिकने शम्मी कपूर यांनी तिची मांग भरली होती. या जोडीला पुढे आदित्य आणि कांचन अशी दोन मुलं झाली. या नंतर मात्र शम्मीचा दौर सुरु झाला.

राजेंद्रसिंग बेदीच्या कादंबरीवर चित्रपट बनवायचा असं एकदा गीता बालीच्या मनात आलं. त्या कादंबरीवर 'एक चादर मैली सी' या चित्रपटाची निर्मिती ती करणार होती. मुख्य भुमिकेसाठी धर्मेंद्रची निवडही झाली होती. मात्र चित्रपटाच्या शूटिंगच्या आधीच तिची तब्बेत अचानक बिघडली. तिला देवीचा (स्मॉल पॉक्स) आजार जडला होता. तातडीनं तिला मुंबईला आणण्यात आलं. स्मॉल पॉक्समुळे काही दिवसातच तिचं सौंदर्य संपल्यात जमा झालं. आपला भेसूर चेहरा आरशात बघून, फार मोठा धक्का तिला बसला. त्या धक्क्यातून ती स्वतःला सावरु शकली नाही, आणि त्या आजारातच तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. योगायोग असा की, ज्या बाणगंगा मंदिरात शम्मी सोबत तिने लग्न केलं होतं, त्याच मंदिर परिसरात तिचे अंत्य संस्कारही करण्यात आले. पस्तीसाव्या वर्षीच तिचं असं अकाली जाणं, कपूर घराण्यालाच नाही तरी सगळ्यांच्याच मनाला चटका लावून गेलं.

जवाँ हसीन अशा या नाजनीला एकोणीस वर्षांच्या आपल्या सिने कारकिर्दीत सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री म्हणून 'कवी' (१९५५), चित्रपटातील भुमिकेसाठी आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून १९५५च्या 'वचन'साठी फिल्म फेअर पुरस्कारांचे दोन नामांकन तेवढे मिळाले होते. 'जाल' (१९५२) चित्रपटातला तिचा तो डायलॉग मला अजूनही आठवतो, मासे पकडणारा तिचा सहकारी सायमन तिला म्हणतो - 'मोहब्बत की हंसी ना उडाओ मारिया, कहीं एक दिन इस मोहब्बत के लिये तुम्ही भी ना रोना पड़े.' त्यावेळी ती उत्तरते - 'नहीं सायमन, तुम मुझे हमेशा हसतें हुये देखोगे,' आणि खरंच; तिचा चेहरा नेहमीच सोनचाफी गंध उधळीत राहिला.

तुटलेल्या ताऱ्यांना पाहून आता जिची आठवण सतावते, अबोल झालेल्या नजाऱ्यातून जिची चाहूल लागते, जिच्या गुलज़ार हकीकती; उसळत्या लाटा गावू लागतात, आसवांत भिजलेला वारा अन थबकलेले मेघ सांगतात जिची आधी-अधुरी कहानी... कसं विसरता येईल त्या मस्तानीला? ती, जिथं जिथं असायची, दिसायची ती सगळीच ठिकाणं आता सुनसान झालीये. माहित नाही; तिचा पत्ता आता मिळेल तरी कुठं?

'लहरों के लबों पर है खोये हुये अफ़साने
गुलज़ार उम्मीदों के सब हो गये विरानें
तेरा पता पाऊं कहाँ सुने है सारे ठिकाने
जाने कहाँ गुम हो गये, जाके वो अगले ज़माने
बरबाद है आरजू का जहाँ, सुन जा दिल की दास्ताँ
ये रात ये चाँदनी फिर कहाँ... '

साहिरच्या कसदार लेखणीतून उतरलेलं हे गाणं आता सारखं सारखं आठवत राहातं, आणि सोबत आठवत राहते ती बेमिसाल अदाकारा... गीता बाली!

**संदर्भ: विकीपिडीया, यु-ट्युब, peoples & history.**

# 24 ग्रा.पं.च्या 169 जागेसाठी आज लढत ; 382 उमेदवार निवडणूक रिंगणात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील २५ ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्य पदांसाठी १८ डिसेंबर रोजी मतदान होणार असून सुरु असलेला प्रचार अखेरीस शुक्रवारी शांत झाला. या निवडणुकीत २५ ग्रामपंचायतींच्या २१५ जागांपैकी नादी ग्रामपंचायतीत एका जागेसाठी नामनिर्देशन पत्र प्राप्त न झाल्याने ही जागा रिक्त असुन माघारीनंतर एका जागेसाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने ४५ जागा (सरपंच वगळता) बिनविरोध निवडण्यात आल्या. यात एक ग्रामपंचायत पुर्णपणे बिनविरोध निवडुन आल्याने २४ ग्रामपंचायतींच्या १६९ जागांसाठी प्रत्यक्ष मतदान होणार असल्याची माहिती निवडणुक विभागाने दिली असून या निवडणुकीसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे.या निवडणुकीत सरपंचपद प्रत्यक्ष जनतेतून निवडले जाणार असल्याने ग्रामपंचायतीवरील बहुमत मिळवण्यापेक्षा सरपंच पद मिळवून सत्ता आपल्याकडे कशी राहिले याकडे सर्वच पक्षानी जोर लावल्याचे दिसत आहे. या निवडणुकीत शिवसेना, शिंदे गट, राष्ट्रवादी व भाजपमध्ये प्रामुख्याने लढत होत असल्याने चारही पक्ष तयारीत आहेत. त्यामुळे मतदार गावाची सत्ता कोणाच्या हातात देणार याकडे सर्वांचे लक्ष आहे . वैजापूर तालुक्यातील हिंगणे कन्नड ग्रामपंचायतीसह अन्य ग्रामपंचायती चे एकूण ४६ उमेदवार निवडून आले आहेत असून आता वैजापूर तालुक्यातील २४ ग्रामपंचायतीं साठी निवडणूक होणार आहे. या २४ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी ७९ व सदस्य पदांच्या १६९ जागांसाठी ३८२ उमेदवार निवडणूक रिंगणात निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे शिंदे गटाचे आमदार रमेश बोरनारे, भाजपचे डॉ. दिनेश परदेशी, ठाकरे गटाचे भाऊसाहेब चिकटगावकर, राष्ट्रवादीचे पंकज ठोंबरे आदी सर्व नेते मंडळी ग्रामपंचायत ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



**या ग्रामपंचायतीं बिनविरोध**
हिंगणेकन्नड
**सरपंच :** मंगेश निकम **सदस्य :** भाऊसाहेब निकम, सुमित म्हस्के, रंजना निकम, रामदास निकम, राधाबाई काळे, नीलेश निकम, आशा निकम
**खरज- तित्तरखेडा :** अनिता पठारे,
**अव्वलगाव-हमरापूर :** शेख जबीना, विजय मोरे, अश्विनी पठारे
**गोळवाडी-मिरकनगर :** छाया कोकाटे, सुमनबाई पवार, सुनील डुकरे
**भग्गाव :** लता रहटकळ
**हिलालपूर :** सचिन सोनवणे, इस्माईल सय्यद, वैशाली पवार
**नांदूरढोक-बाभूळगावगंगा :** योगेश घंगाळे, जयश्री निकम, शांता गायकवाड, ज्योती फणसे, नारायण घोडे, उदयकुमार कुंजीर, रंजना हिरडे,
**नादी :** अरुण गायकवाड, रुपाली लांडे, वंदना काळे, (प्रभाग क्रमांक एक मधील एक जागा रिक्त)
**रोटेगाव :** सोनल राजपूत,
**तिडी :** कडूबाई गवळी
**वांजरगाव :** अझर सय्यद, पार्वतीबाई साळवे, खिर्डी : सचिन तांबे, शकुंतला तांबे, इंदूबाई तांबे, ताईबाई तांबे
**पुरणगाव :** दत्तात्रय ठोंबरे, हिराबाई कसबे, सुरेश ठोंबरे, संगीता ठोंबरे, भिकाजी ठोंबरे, रंजना लोखंडे

**या ग्रामपंचायती निवडणुकीसाठी रिंगणात**
महालगाव, पानवी बुद्रुक/ वक्ती, अव्वलगाव/ हमरापूर, बाबतारा, बेलगाव, भग्गाव/ डाकपिंपळगाव, गोळवाडी/मिरकनगर, हनुमंतगाव, हिलालपूर /कोरडगाव, कनकसागज, कविटखेडा/बिरोळा, कोल्ही, खरज/ तित्तरखेडा, खिर्डी / हरगोविंदपूर, माळीघोगरगाव, नादी, नांदूरढोक/बाभुळगावगंगा,पाराळा, पुरणगाव, रोटेगाव, टुणकी, तिडी / मकरमतपूरवाडी व वांजरगाव .

# संघटन कौशल्य असल्यास यश मिळते : संभाजीराव पा. केंद्रे

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कर्तव्य, नेतृत्व, कौशल्य हे त्रिसंघम असल्यास यश हमखास प्राप्त होते. महात्मा फुले विद्यालयाचे प्रचार्य मोतीराम केंद्रे यांनी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट योगदानामुळे राज्यस्तरा नेतृत्व करण्याची संधी मिळाली. गरीब कुटूंबातील कोणत्याही राजकीय वारसा नसताना तालुका, जिल्हा, विभाग आता राज्यावर नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने ज्याच्या अंगात कर्तव्य, संघटन कौशल्य असल्यास यश मिळते असे प्रतिपादन महात्मा फुले ग्रामीण शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा माजी उपसभापती संभाजीराव पा. केंद्रे यांनी केले.

अखिल भारतीय महाराष्ट्रा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्यध्यापक शाळा संयुक्त महामंडळ पुणेच्या सचिवपदी महात्मा फुले विद्यालयाचे प्रचार्य मोतीराम केंद्रे यांची मंडळाच्या अधिवेशानात निवड करण्यात आली. या निवडी बद्दल कंधार तालुक्यातील शेकापूर येथील महात्मा फुले विद्यालयात गुरुवार दि.१५ डिसेंबर रोजी जाहीर सत्कार केला. या वेळीअध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले ग्रामीण शिक्षण मंडळाचे सचिव तथा शेकापूर मा. सरपंच शिवाजीराव केंद्र, सोमठाणाचे मुख्याध्यापक नागरगोजे धोंडिबा, मुख्याध्यापक हाजी मोहम्मद अन्सारोद्दीन, सेवा निवृत्त सेवानिवृत्त पर्यवेक्षक रामराव वरपडे व्ही. के केंद्रे यांच्यासह आदी उपस्तित होते. या वेळी पुढे बोलताना संभाजीराव पा. केंद्रे म्हणाले की शिक्षण क्षेत्रात क्रांतीची ज्योत महात्मा फुले यांनी पेठविली.



दिन दलित गोर गरीब जनतेसाठी शिक्षणाचे दारे उघडली. फुले यांच्या वसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या नावाने शेकापूर असे ग्रामीण भागात विद्यालय उभारले. या विद्यालयाचे प्राचार्य मोतीराम केंद्रे मोठे योगदान आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्यामुळे तालुका, जिल्हा, विभागासह आता राज्य पातळीवर महत्वाचे सचिवपद मिळाले. शिक्षक आमदार पर्यंत पोहचण्याची मोतीराम केंद्रे यांच्यात क्षमता आहे. असे संभाजीराव पा. केंद्रे म्हणाले. यावेळी सत्काराला उतर देतेवेळी मोतीभाऊ केंद्रे म्हणाले की थोरांच्या आशीर्वादाने मला हे पद मिळाले आहे 1996 पासून कंधार तालुक्यातील सर्व शाळांना भेटी दिल्या व तेथील समस्या जानुन घेतल्या व मुख्याध्यापक संघटना नांदेड जिल्हा अध्यक्ष, विभागीय उपआध्यक्ष, शिक्षण मंडळ उपआध्यक्ष ह्या सर्व पदांचा अनुभव आसल्यामुळे आखिल महाराष्ट्र माध्यमिक व ऊच्च माध्यमिक मुख्याध्यापक शाळा संयुक्त महामंडळ, पुणे सचिवपदी निवड झाली आहे. . तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत आसताना छोट्या छोट्या बाबीकंडे निरीक्षण पुर्वक लक्ष देणे गरजेचे आहे आणि शिक्षकांनी अभ्यासपूर्वक विद्यार्थ्यांना शिक्षण दिल पाहीजे. यावेळी रामराव वरपडे व्ही. के केंद्रे , प्रा. भारतलाल सुर्यवंशी, प्रा.अरूण केदार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा.आरूण केदार ,व्यंकटराव पुरमवार, राहुल गित्ते, प्रा.सुर्यकांत गुट्टे , मोहीत दत्ता केंद्रे, अमित लोंड, प्रा.गिरीश नागरगोजे, महेद्र बोराळे,एस.पी.केंद्रे , किशन ठोंबरे, प्रा.देविदास जायभाये ,प्रा.गोविंदराव आडे ,प्रा.विजय राठोड ,चंद्रकांत पडलवार, शिवाजी मेंडके, प्रा. भारतलाल सुर्यवंशी , प्रा.मोतिराम नागरगोजे , आनिल बोईवार, प्रा.पंकज पाटील , प्रा.हाणमंत भालेराव , बालाजी केंद्रे , संभु वाघमारे, मुकेश केंद्रे, मधुकर नागरगोजे ,गणेश केंद्रे , प्रकाश मुंडे ,माधव कदम, परमेश्वर निलेवाड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्तित होते. सूत्रसंचलन व्यंकट पुरमवार यांनी तर आभार अरुण केदार यांनी मानले.

# महाराष्ट्रात बंसल क्लासेस आयोजित बूस्ट परीक्षेस एक लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नावनोंदणी!

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राष्ट्रविख्यात बंसल क्लासेसद्वारे विद्यार्थ्यांसाठी



आयोजित बूस्ट परीक्षेसाठी 1 लाख विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी पूर्ण केली आहे. देशभरात लाखो डॉक्टर्स, इंजिनिअर्स घडविणारे बंसल क्लासेस विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. कारण गेल्या 40 वर्षांपासून बंसल क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी देशभरामध्ये रेकॉर्डब्रेक कामगिरी केली आहे. बंसल क्लासेसचा भाग असणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल असणार यात शंकाच नाही परंतू इतर विद्यार्थ्यांचे भवितव्यही उज्वल व्हावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांना अभ्यासाची गोडी लागावी यासाठी बंसल क्लासेस नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असते. याचाच एक भाग म्हणजे बंसल ओपन अर्पार्च्युनिटी स्कॉलरशिप टेस्ट म्हणजेच बूस्ट. इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास उंचावण्यासाठी बंसल क्लासेसने बूस्ट परीक्षेचे दि. 18 डिसेंबर 2022, रविवार रोजी सकाळी 11 ते दु. 1 वाजेपर्यंत आयोजन केले आहे. या परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांना 1.50 करोड रूपयांची स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी 11 लाख रूपयांची रोख बक्षीसे असून 100 टक्के स्कॉलरशिप मिळणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी बूस्टसाठी नाव नोंदणी केलेली नाही अशा विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दिवशी परीक्षा सेंटरवर नाव नोंदणी करता येईल. बंसल क्लासेसच्या विविध शाखांवर, विविध शाळांवर आयोजन केले आहे. या परीक्षेसाठी आता पर्यंत तब्बल 1 लाखांपेक्षाही अधिक विद्यार्थ्यांनी

SCAN QR CODE
FOR BOOST REGISTRATION


नाव नोंदणी केली असून महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच खाजगी कोचिंग क्लासेसने आयोजित केलेल्या परीक्षेसाठी एवढ्या मोठया प्रमाणावर विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आहे. बूस्ट परीक्षेसाठी 1 लाख विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली आहे आणि अजूनही नाव नोंदणीची प्रक्रिया चालूच आहे. यावरून विद्यार्थी आणि पालकांचा बंसल क्लासेसवर असलेला अतूट विश्वास दिसून येतो जो की, बंसल क्लासेसने गेल्या 40 वर्षांमध्ये लाखो डॉक्टर्स, इंजिनिअर्स घडवून कमावला आहे. बंसल क्लासेसचे मुख्य प्रवर्तक मा.श्री.चंदुलालजी बियाणी सर यांच्या मार्गदर्शनाखाली बंसल क्लासेसचे 1 हजार 600 पेक्षा जास्त शिक्षक, अधिकारी व कर्मचारी बूस्ट परीक्षेची यशस्वी तयारी करत आहेत. विद्यार्थ्यांसाठी आयोजित बूस्ट परिक्षा ही ऑफलाईन मोड मध्ये घेण्यात येणार असून दहावी वर्गात शिकणारे सर्व विद्यार्थी ही परीक्षा देण्यास पात्र आहेत. महाराष्ट्रामध्ये बंसल क्लासेसच्या लातूर, अंबाजोगाई, अहमदनगर, गंगाखेड, औरंगाबाद, नांदेड, परभणी, उद्‌गीर, केज, माजलगाव, नाशिक, बीड, गेवराई, अकोला, पंढरपूर, परळी, उमरगा, पुणे, सोलापूर, बजाजनगर वाळूज, औरंगाबाद, जालना या सर्व ठिकाणी शाखा आहेत. या सर्व शाखा आणि या सर्व ठिकानी असणाऱ्या अनेक शाळांसह एकूण 250 पेक्षा जास्त ठिकाणी बूस्ट परीक्षेचे आयोजन केले आहे. बूस्ट परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी सूवर्ण संधी असून या संधीचा लाभ घ्यावा आणि स्कॉलरशिपसह विविध बक्षिसे जिंकावे असे आवाहन बंसल क्लासेसचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रवर्तक श्री. चंदुलालजी बियाणी यांनी केले आहे.

**राजस्थान कोटा येथे बंसल क्लासेस मार्फत मोफत शैक्षणिक सुविधा !**
मा .शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आणि लोकनेते स्व . गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त बंसल क्लासेसने आणखी एक मोठा निर्णय विद्यार्थी व पालकांच्या हितासाठी घेतला आहे . NEET, IIT-JEE ची तयारी करणाऱ्या 120 विद्यार्थ्यांना बंसल क्लासेस कोटा, राजस्थान येथे मोफत शैक्षणिक सुविधा देणार आहे . यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल . या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेता येणार आहे . सदरील परीक्षा ही 8 जानेवारी 2023, रविवार रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजेपर्यंत होईल . ज्या विद्यार्थ्यांना राजस्थान कोटा येथे मोफत शैक्षणिक सुविधेचा लाभ घेणे काही कारणास्तव शक्य नसेल,अशा विद्यार्थ्यांना बंसल क्लासेसच्या नांदेड व लातूर शाखेत मोफत शैक्षणिक सुविधा देण्यात येणार आहे . या परीक्षेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक असून नाव नोंदणीची शेवटी तारीख ही दि . 7 जानेवारी 2023 ही आहे . खाली दिलेल्या QR कोड स्कॅन करून विद्यार्थी परीक्षेसाठी नाव नोंदणी करू शकता .

# शेकोटी साहित्य संमेलनाचे लक्ष्मीकांत देशमुख अध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** कोकण मराठी परिषदेचे १७ वे शेकोटी साहित्य



संमेलन येत्या ३१ डिसेंबर २०२२ आणि १ जानेवारी २०२३ रोजी होणार असल्याचे 'कोमप'च्या सल्लागार समितीचे अध्यक्ष ॲड. रमाकांत खलप यांनी जाहीर केले. यंदाचे संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व ऊर्दूचे गाढे अभ्यासक माजी सनदी अधिकारी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांची निवड करण्यात आली. उद्घाटक म्हणून गोव्याचे लोकायुक्त अंबादासराव जोशी उपस्थित राहणार आहेत. यंदाचे साहित्य संमेलनदेखील केरी (फोंडा) येथील विजयादुर्गा देवस्थानातच होणार आहे, असे कोमपच्या सचिव चित्रा क्षीरसागर यांनी कळविले आहे.

**लक्ष्मीकांत देशमुख यांचा अल्प परिचय** - लक्ष्मीकांत देशमुख हे मूळचे मुरुम (ता. उमरगा) येथील आहेत. अनेक वर्षे ते नांदेड येथे असल्याने मराठवाड्यातील ते रहिवासी आहेत. ते सध्या पुणे येथे असतात. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडी विद्यापीठाचेएम. एस्सी (केमेस्ट्री) पदवीधर असून, त्यांनी शिवाजी विद्यापीठाची मराठीतून एम. ए. ची पदवी प्राप्त केली आहे. बंगळूर येथील आय. आय. एम. मधून एम. बी. ए. ची पदवी मिळवली. त्यांनी कोल्हापूरचे ते जिल्हाधिकारी होते. पुणे जिल्हा क्रीडा संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. गोरेगावच्या फिल्मसिटीचे ते माजी एम. डी. आहेत. प्रख्यात कादंबरीकार आहेत. त्यांच्या सलोमी, होते करुप वेडे, अंधेरनगरी, ऑक्टोपस, इन्क्लिाब विरुद्ध जिहाद, यंग इंडियाचा ग्रुप सेल्फी या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. पाणी पाणी (मूळ नाव उदक), कथांजली, नंबर वन, सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी आदी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अखेरची रात्र आणि दूरदर्शन हाजीर हो! ही बालनाटके प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय प्रशासननामा, बखर भारतीय प्रशासनाची आणि अविस्मरणीय कोल्हापूर ही ललितेर पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी इग्रजीतूनदेखील लेखन केले आहे. त्यांना तीन वेळा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार, तीन महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार आणि बेळगावच्या वांड्मय चर्चा मंडळाचा आणि इचलकरंजीच्या आपटे वाचन मंदिराचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. न्या. अंबादास जोशी यांचा अल्प परिचय न्या. अंबादास जोशी बी. ए. एल. एल. बी. असून त्यांनी १९९२ पासून वकिलीस सुरुवात केली. ते मुंबई उच्च न्यायालाय तसेच सुरुवातील बीड, औरंगाबाद न्यायालयात वकिली केली. महाराष्ट्र राज्याचे विशेष वकील म्हणून काम पाहिले . त्याकाळात भूसंपादनाच्या अनेक खटल्यात त्यांनी सरकारचे खास वकील म्हणून काम पाहिले. अनेक न्यायालायाचे कामकाज त्यांनी पाहिले. १६ मार्च २००४ रोजी मुंबई उच्च न्यायालयात त्यांची नियुक्ती न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाली. नागपूर खंडपीठाचे ते १६ वर्षे न्यायमूर्ती होते. २०१३ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतरही प्रशाकीय लवादाचे ते न्यायमूर्ती होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी विद्यापीठात त्यांनी १० वर्षे विविध विषयांचे अध्यापन केले. सध्या ते गोव्याचे लोकायुक्त म्हणून काम पाहत आहेत.

# विजेची तार तुटून मजूरासह म्हैस ठार

## एक जण गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील एरंडगाव समसूद येथे विद्युत



वाहक तार तुटून शॉक बसल्याने एक शेतमजूर व म्हैस जागेवर ठार झाली असून आणखी एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना घडली असुन शेवगाव पोलीस ठाण्यात त्याची आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. महादेव लक्ष्मण पूंड ( वय ५० ) रा. एरंडगाव हे शेतमजूर सकाळी साडेसातला ऊसाच्या शेतात पाणी भरत होते. यावेळी गोठयातील म्हैस सुटून ऊसाच्या शेतात घुसली असता तेथे तूटलेल्या विद्युत वाहक तारेत अडकून कोसळली. म्हैस का पडली म्हणून पहाण्यासाठी पुंड धावतच म्हशीजवळ गेले तेव्हा त्यांनाही वीजेचा शॉक बसून तेही कोसळले. यावेळी काही अंतरावर असलेल्या भाऊसाहेब रतन बनकर (वय ४२) यांनाही शॉक बसून ते लांब फेकले गेले. पुंड व बनकर यांना तातडीने शेवगाव येथील नित्यसेवा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र तेथे पुंड हे अगोदरच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तर बनकर यांचे वर उपचार सुरू आहेत. शवविच्छेदनानंतर सायंकाळी उशिरा पुंड यांचे वर एरंडगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. शेवगाव पोलीस ठाण्यात या संदर्भात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांचे मार्गदर्शनाखाली हवालदार बाबासाहेब शेळके तपास करीत आहेत.

# भोकरजवळील धानोरा तलावात मुरूमाचा भर टाकून झाले अतिक्रमण: नैसर्गिक सौंदर्य होते नष्ट: रिसॉर्ट मात्र बहरला

## राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतही बसवण्यात आले पेवर ब्लॉक






आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकरपासून जवळच असलेल्या धानोरा तलावामध्ये अनाधिकृतरित्या मुरूमाचा भर टाकून अतिक्रमण करण्यात आले आणि व्यवसाय थाटण्यात आला यामुळे तलावाचे नैसर्गिक सौंदर्य नष्ट होत असून व्यवसाय बहरला असल्याने पाटबंधारे उप विभाग झोपेत कसा, तलावात अतिक्रमण होत असताना शासनाकडून झालेली डोळे झाक या गंभीर प्रकाराबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. भोकर शहराला नगर परिषदेअंतर्गत कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना सुरू होण्यापूर्वी भोकर वाशीयांची तहान भागविणारा एकमेव धानोरा तलाव हाच होता भोकर साठी याच तलावातील पाणी आरक्षित करण्यात येत होते, भोकरसाठी सुधा प्रकल्पातून कायमस्वरूपी नळ योजना झाल्यानंतर धानोरा तलावाचे पाणी काही प्रमाणात शेती सिंचनाला देण्यात येऊ लागले, या तलावात 2.819 द.ल.घ.मी. पाणी साठवण क्षेत्र आहे, सदरील तलाव हा अतिशय निसर्गरम्य वातावरणात असून चोहो बाजूनी डोंगर झाडी आहे, नैसर्गिक सौंदर्य येथे आहे. दीड वर्षापूर्वी तलावाला लागूनच पूर्वी असलेले हॉटेल विकत घेऊन रिसॉर्ट व्यवसाय नव्या पद्धतीने सुरू झाला सुंदरता झाली. नवीन इमारती सुसज्ज झाल्या, रिसॉर्ट व्यवसाय सुरू करीत असताना तलावाच्या बाजूला लागूनच असलेल्या जागेत अवैधरित्या मुरूमाचा भराव करून अतिक्रमण करण्यात आले, तलावा मध्ये मुरुमाचा भर टाकल्यामुळे तलावाचे सौंदर्य नष्ट झाले आहे, दूषित पाणी देखील तलावात सोडल्या जात आहे, तलावाच्या जागेमध्ये झालेले अतिक्रमण हे संबंधित विभागाला मात्र दिसले नाही, संबंधित रिसॉर्टच्या समोरील जागा राष्ट्रीय महामार्गाची असताना त्या जागेमध्येही पेवर ब्लॉक बसवण्यात आले काही केबिन, पान टपरी ठेवून रस्ता देखील व्यापण्यात आला.

**पाटबंधारे उपविभागाकडून दिली होती नोटीस :** भोकर येथील पाटबंधारे उपविभागा अंतर्गत धानोरा तलाव येत असून तलावाच्या जागेत मुरूमाचा भर टाकून अनाधिकृत रित्याअतिक्रमण काही बांधकाम करण्याचा येत असल्याबाबत संबंधित मालकाला पाटबंधारे उपविभाग भोकर यांच्याकडून संबंधित तलावाच्या जागेत अतिक्रमण करू नये, बांधकाम करू नये अशी नोटीस 14 जून 2021 रोजी देण्यात आली असल्याची माहिती उप अभियंता जी . एस . गायकवाड यांनी दिली, त्यानंतर तिथे काय झाले हे पाहण्यासाठी मी संबंधित कर्मचारी यांना पाठवून प्रत्यक्ष पाहणी करणार आहे असे त्यांनी सांगितले मात्र त्या नोटीसीनुसार भराव टाकण्याचे काम काही थांबले नाही .

**राष्ट्रीय महामार्ग उपविभागाने रस्त्याबाबत दिली नोटीस :** भोकर नांदेड राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या रिसॉर्ट समोर राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्यावर देखील पेवर ब्लॉक टाकून अतिक्रमण करण्यात आले रस्त्याच्या बाजूचा काही भाग व्यापला गेला त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग असलेला रस्ता वाहतुकीला कमी झाला याबाबत राष्ट्रीय महामार्ग उपविभागाचे शाखा अभियंता एस . एस . देशपांडे यांच्याशी संपर्क साधला असता संबंधित रिसॉर्ट चालकास दीड महिन्यापूर्वी आम्ही नोटीस दिली आहे रस्त्यात आलेले अतिक्रमण काढून घ्यावे असे सांगण्यात आल्याचे ते म्हणाले . संबंधित दोन्ही विभागाकडून रीतसर नोटीसा देऊन सुद्धा होणारे अतिक्रमण का थांबले नाही, त्यासाठी संबंधित अधिकाऱ्याकडून पुढील काय दिशा असेल याबाबत वरिष्ठांनी दखल घेणे गरजेचे आहे .

# कंधार-घोडज रस्त्याच्या बोगस कामाचे प्रकरण चिघळणार

## अंदाजपत्रकानुसार काम होत नसल्याने माजी सैनिक करणार आत्मदहन

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** कंधार-घोडज रस्त्याच्या दुरुस्तीचे काम बोगस होत



असल्याचा विषय गेली तीन महिन्यांपासून गाजत आहे.या रस्त्याच्या कामावरुन प्रशासनाच्या बैठाकाही होत आहेत.परंतू हा विषय मार्गी लागतांना दिसत नाही. सार्वजनिक बांधकामांचे उपविभागीय अभियंता यांनी उपविभागीय अधिकारी यांनी बोलावलेल्या बैठकीत सदर काम अंदाजपत्रकानुसार करण्याचे आश्वासन दिले होते. परंतू आश्वासनानुसार काम झाले नसल्याने माजी सैनिक संघटना आक्रमक झाली असून उपविभागीय अधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे माजी सैनिक संघटनेने आत्मदहनाचा इशारा दिला असल्याने आता हे प्रकरण चिघळण्याची दाट शक्यता दिसत आहे.

कंधार-घोडज या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी केवळ खड्डे बुजविण्यासाठी निधी मंजूर झाला होता.दोन ते महिन्यानंतर याच रस्त्याचे पुर्णपणे नव्याने काम होणार होते.असे असतांनाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याऐवजी गिट्टी टाकून बोगस काम केले आहे.या कामात डांबर नसल्याने दोनच दिवसात हा रस्ता जैसे थे झाला. या संदर्भात दि.१० डिसेंबर रोजी माजी सैनिक संघटनेकडून रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते.त्यांच्या या आंदोलनाची दखल घेवून तहसीलदार अनुपसिंह यादव यांनी कंधार-घोडज रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन काम बोगस होत असल्याचे लक्षात येताच तातडीने १२ डिसेंबर रोजी माजी सैनिक संघटनेसोबत उपविभागीय अभियंता यांची उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात बैठक बोलावली होती.या बैठकीत अंदाजपत्रकानुसार काम करणार असल्याचे आश्वासन उपविभागीय अभियंता जोशी यांनी दिले होते.

सदरील काम हे रातोरात उरकून टाकले होते.यावर माजी सैनिक संघटनेने कामाच्या संदर्भात विचारणा केली असता सदर काम पुर्ण झाले असल्याचे सांगून अधिकारी मोकळे झाले.प्रशासनाच्या डोळ्यात धुळ फेकण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करत असून दोन महिन्यांनंतर नवीन काम होणार होते तर हा रस्ता कशासाठी केला? असा सवाल माजी सैनिक संघटना करत आहे. १८ डिसेंबर पर्यंत या रस्त्यावर कारपेट टाकून रस्त्याचे काम उत्कृष्ट करण्यात यावे अन्यथा दि. १९ डिसेंबर रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यलयासमोर आत्मदहन करण्यात येणार असल्याचे निवेदन माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी चुक्कलवाड यांनी दिले आहे. त्यामुळे भविष्यात हे प्रकरण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंगलट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# अल्पवयीन मुलीला अपत्य, आरोपी अटकेत

## पोलिसांनीच फिर्यादी होत नराधम केला जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अल्पवयीन पिडीतेला अपत्य झाल्या प्रकरणी नराधमाला जिन्सी पोक्सो आणि बलात्काराच्या गुन्ह्यात पोलिसांनी बेड्या ठोकल्या. सय्यद जुबेर सय्यद नासिर रा.किराडपुरा असे अटक आरोपीचे नाव आहे. १६जाने २० पासून पासून आरोपीचे पिडीतेशी अनैतिक संबंध होते. पिडीता ही घाटी रुग्णालयात प्रसुत झाल्यानंतर घाटी प्रशासनाने जिन्सी पोलिसांनाअल्पवयीन माता प्रसुत झाली म्हणून एमएलसी पाठवली. पीएसआय ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला. आरोपी सय्यद जुबेर ला अटक करण्यात आली पुढील तपास पोलिस निरीक्षक अशोक भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय काकड करंत आहेत.

# अनिरुद्ध नाग लँडमार्क फिल्म्सच्या बिझनेस हेडपदी नियुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विविधि कासलीवाल संचालित लॅन्डमार्क फिल्म्स नेहमीच दर्जेदार कलाकृतींच्या निर्मितीसाठी ओळखली जाते, जसे की त्रिभाषिक शॉर्ट डॉक्युमेंट्री - साथी हाथ बढ़ाना [२०१३], कॉर्पोरेट फिल्म - बिल्डिंग फॉर द फ्युचर [२०१३], मराठी चित्रपट - सांगतो ऐका...! [२०१४], वजनदार [२०१६], गच्ची [२०१७], राज्य पुरस्कार विजेता मराठी चित्रपट - रेडू [२०१८], नशीबवान [२०१९], राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मराठी चित्रपट - रिंगण [२०१७], आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशंसित मराठी चित्रपट - पिप्सी [२०१८], २२-भागांची वेब मालिका - मेमोयार्स ऑफ़ प्रेम रतन धन पायो [२०१५], माहितीपट - दाट्स व्हाट इट्स ऑल अबाउट [२०१७], चरित्रात्मक माहितीपट - विद्योदय [२०१८] आणि आता नुकताच प्रदर्शित झालेला एका नवीन विषयावरचा आणि वेगळ्या धाटणीचा मीडियम स्पाइसी [२०२२] नावाचा मल्टीस्टारर मराठी चित्रपट. अशा अनेक विविधरंगी चित्रपटांची निर्मिती करून लॅन्डमार्क फिल्म्सने चित्रपटसृष्टीत आपले एका वेगळे आणि अढळ स्थान निर्माण केले आहे.कंपनीने अनेक पुरस्कार विजेते माहितीपट, काही प्रशंसनीय लघुपट आणि रसिकांच्या मनात स्थान मिळवणारे अनेक मराठी चित्रपट तयार केलेले आहेत. कंपनी सध्या अनेक प्रोजेक्ट्सवर काम करीत असून यात हिंदी चित्रपटांसह काही वेब मालिकांचाही समावेश आहे. लॅन्डमार्क फिल्म्सची टीम अत्यंत सर्जनशील असून त्यांच्या आगामी प्रोजेक्टसाठी हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकार आणि तंत्रज्ञ काम करीत आहेत. मनोरंजन क्षेत्रात सर्व प्रकारच्या सर्वोत्तम कलाकृती निर्मितीचे ध्येय असलेली लॅन्डमार्क फिल्म्स रसिकांच्या हृदयात एका वेगळे स्थान निर्माण करण्यासाठी सज्ज झाली आहे.

लॅन्डमार्क फिल्म्सने भविष्यातील उपक्रमांसाठी दोन दशकांहून अधिकचा अनुभव असलेले या उद्योगातील तज्ज्ञ अनिरुद्ध नाग यांची बिझनेस हेड म्हणून नियुक्ती केली आहे. सर्व प्रकारच्या प्लॅटफॉर्मवर आणि सर्व प्रकारच्या फॉर्मेटवर काम करण्यासाठी प्रॉडक्शन हाऊसने रोडमॅप तयार केलेला आहे. अनिरुद्ध नाग या नव्या प्रोजेक्टसाठी सर्व व्यावसायिक चर्चा करण्यासोबतच विपणन आणि व्यवसाय-संबंधित गोष्टींवर लक्ष देणार आहेत. यामुळे आगामी काळात लॅन्डमार्क फिल्म्स एक वेगळीच उंची गाठणार यात शंकाच नाही.

शॉर्ट फिल्म्स, जाहिराती, वेब सिरीज, ओटीटीसाठी



ओरिजिनल चित्रपट, थिएटरसाठी चित्रपट आणि ॲनिमेशनचाही लॅन्डमार्क फिल्म्सच्या नव्या प्रोजेक्टमध्ये समावेश आहे आणि या सर्व प्रकारांची अनिरुद्ध यांना उत्तम माहिती आहे. अनिरुद्ध नाग कल्पक प्रवृत्तीचे असून अत्यंत हुशार व्यावसायिकही आहेत. या दोन्हींचा मेळ घालत उत्कृष्ट निर्मिती कशी करावी याची त्यांना सखोल जाण आहे, एवढेच नव्हे तर प्रेक्षकांना काय हवे याचीही त्यांना चांगलीच जाणीव आहे. अनिरुद्ध नाग एक बहुआयामी व्यक्तिमत्व आहे, त्यांनी अनेक चित्रपटांसाठी मार्केट रिसर्चचे काम केलेले आहे, तसेच प्रोजेक्टच्या व्यवहार्यतेचेही विश्लेषण केलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी अनेक चित्रपट वितरण मोहिमेचेही नेतृत्व केलेले आहे आणि सर्वांगिण अभ्यास करून त्यांनी ते चित्रपट जागतिक बाजारपेठेत यशस्वी केलेले आहेत. एवढयावरच न थांबता त्यांनी अलीकडच्या वर्षात लेखन, दिग्दर्शन आणि निर्मितीही केली आहे. अनिरुद्ध नाग यांनी यापूर्वी, यूटीव्ही मोशन पिक्चर्स, फॉक्स स्टार स्टुडिओ आणि बी4यू इंटरनॅशनल सारख्या मोठ्या स्टुडिओमध्ये वरिष्ठ पदे भूषवलेली आहेत. या कार्यकाळात त्यांनी जॉली एलएलबी, नो वन किल्ड जेसिका, डेल्ही बेली, राज 3 अशा सुपरहिट चित्रपटांसोबत 80 हून अधिक चित्रपटांसाठी काम केलेले आहे, यात जन्नत 2, बोल बच्चन, पान सिंग तोमर, देव डी, कमिने, बँग-बँग, ए वेनस्डे आणि अशा अनेक चित्रपटांचा समावेश आहे. अनिरुद्ध आमच्या मुख्य टीममध्ये सामील झाल्यामुळे, आम्ही मनोरंजन क्षेत्रात आमचा एक वेगळा मार्ग तयार करून धोरणात्मक विस्तार पाहत आहोत आणि हा मार्ग आम्हाला आमच्या उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाणार याची खात्रीसुद्धा आहे. असे लॅन्डमार्क फिल्म्सच्या संस्थापक आणि सीईओ विधि कासलीवाल यांनी अनिरुद्ध नाग यांचे स्वागत करताना सांगितले. गेल्या काही वर्षांपासून मी या क्षेत्रात असून सर्जनशील उत्कृष्टतेचा पाठपुरावा केलेला आहे. आज मला हे सांगताना आनंद होत आहे की मी लॅन्डमार्क फिल्म्सचा एक महत्त्वाचा सदस्य झालेलो आहे. लॅन्डमार्क फिल्म्सने गेल्या काही वर्षांत चांगल्या चित्रपटांची एक उत्कृष्ट लायब्ररी तयार केली आहे. नेहमी आशावादी राहण्याचे कंपनीचे उद्दिष्ट असून कंपनीने स्वतःची नाममुद्रा यशस्वी केलेली आहे. आता लॅन्डमार्क फिल्म्स अधिक विस्तृत आणि उच्च स्तरावर व्यक्त होण्यासाठी सज्ज झाला आहे.

# कारेगाव - पिंपळगाव रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणारा 'मिस्टर इंडिया' कोण?

## दोषी अभियंता कडेमवार व गुत्तेदारावर कारवाई करा : आमदार राजेश पवार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबाद तालुक्यातील कारेगाव ते पिंपळगाव रस्त्याचे काम मांजरम गटाचे जिल्हा परिषद सदस्य पूनमताई पवार यांच्या निधीतून झाले. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून यास जबाबदार असणाऱ्या संबंधित गुत्तेदारावर कारवाई करावी या आशयाची बातमी आधुनिक केसरीने प्रसिद्ध केली होती. याची दखल घेत नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र लिहून कनिष्ठ अभियंता कडेमवार व संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. हे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सागर तायडे, उपविभागीय अभियंता रायबोले, कनिष्ठ अभियंता केडमवार यांनी व आमदार महोदयांनी मान्य केले आहे. त्यामुळे संबंधित गुत्तेदार व कनिष्ठ अभियंता केडमवार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आमदार राजेश पवार यांनी ऑक्टोंबर मध्ये केली होती. त्यावेळी दोन महिन्याच्या आत संबंधित गुत्तेदाराकडून परत करून घेण्याचे आश्वासन आमदारांना देऊनही पुढे कारवाई का झाली नाही? या कामाची चौकशी करण्यासाठी नेमलेली समितीचा अहवाल गुलदस्त्यात का ठेवला जात आहे? आमदाराच्या मागणीकडे जिल्हा परिषदेचे बांधकाम विभाग का दुर्लक्ष करित आहे? गुण नियंत्रक विभागाकडून योग्य ती करावाई केली जाणार का? गुत्तेदार नेमका कोण आहे? गुत्तेदार व कनिष्ठ अभियंता केडमवार यांचे नेमके काय संबंध आहेत? गुत्तेदार व कनिष्ठ अभियंत्यांना पाठीशी घालणाऱ्या कार्यकारी अभियंता सागर तायडे, उपविभागीय अभियंता रायबोले यांच्यावरही कारवाई होणार का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक सरपंच व काँग्रेसचे कार्यकर्ते गुत्तेदार हा आमदारांचा निकटवर्तीय आहे असा आरोप करित असताना आमदारांनी मात्र गुत्तेदार हा कनिष्ठ अभियंता केडमवार यांच्या परिवारातील सदस्य आहे असा आरोप केला आहे.त्यामुळे हा मिस्टर इंडिया कोण? असा प्रश्न उपास्थित होत आहे. मुळात जनतेला गुत्तेदार कोण आहे? अभियंता कोण आहे? यात स्वारस्य नसून त्यांना केवळ चांगला रस्ता मिळणे अपेक्षित आहे.जनतेच्या करातून जमा झालेला निधी थातूर - मातुर कामे करून निधी लुटला जात असेल तर दोषींवर कारवाई झाली पाहिजे अशी माफक अपेक्षा जनता व्यक्त करित आहे.

आधुनिक केसरी इम्पॅक्ट


पूनम पवार यांच्या निधीतून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या गुत्तेदाराची चौकशी करा : नरेंद्र रेड्डी



## शेखर शिंदे यांना आर्मी एव्हिएशनचे अधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** कोल्हे गावचे आदिवासी कुटुंबातील शेखर छगन शिंदे आर्मी मन यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगीरी बद्दल आर्मी अविएशनचे वरिष्ठ अधीकारी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. परिस्थिती वरती मात करुन शेखर शिंदे यांनी स्वता खुप मेहनत घेऊन जिद्दीने काम केले. आज ते आर्मी मधे वरिष्ठ क्लार्क या पदावरती आहे. नाशिक येथे तोफखाना या ठीकाणी आर्मी एव्हिएशनचे महासंचालक लेफ्टनंट जनरल यांच्या हस्ते शेखर शिंदे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले शेखर शिंदे यांनी त्यांची प्रत्येक जबाबदारी चांगल्याप्रकारे पार पाडली त्यामुळे त्यांचे वरिष्ठ अधीकारी यांनी त्यांची स्तुती करुन त्यांना मेडल सन्मान चिन्ह देऊन आणि प्रमाणपत्र देऊन कार्यक्रमादरम्यान सन्मानित करण्यात आले.

## मुख्याध्यापकाच्या मनमानी विरोधात गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार

### कारणे दाखवा नोटीस बजावत शिस्तभंगाची कारवाई का करू नये; पाच दिवसांत मागितला खुलासा

आधुनिक केसरी न्यूज

**राहूल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील आघुर केंद्रातर्गत येणारी जरूळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापकाच्या त्रासाला कंटाळून येथील शिक्षिकांनी थेट वैजापूर पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर यांच्याकडे तक्रार अर्ज केला असून मुख्याध्यापकाचा चार्ज काढून घेत विशाखा समितीला तक्रार कळवण्याची विनंती केली आहे. या संदर्भात शिक्षक भारती तर्फे सुद्धा गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की वैजापूर तालुक्यातील आघुर केंद्रातर्गत येणारी जरूळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत येथील शिक्षिका यांना शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक हे असभ्य वर्तन करत असून होणारा मानसिक त्रास सहन न झाल्याने गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर यांना तक्रार केली आहे.

या तक्रारीत सदरील मुख्याध्यापक परिपाठ चालू असताना कारण नसताना विद्यार्थ्यांदेखत अपमानस्पद बोलायचे, मनमानी प्रशासन चालवायचे, वारंवार काम नसतानाही विनाकारण शिक्षिकांना कार्यालयात बोलवायचे तसेच शालेय कामकाज करताना दादागिरी ची भाषा वापरणे,स्वतः ऑफिस मध्ये बसून राहणे व वर्गावर न जाणे, जोडवर्ग घ्या सांगत फोनवर इतरत्र बोलणे, हक्काच्या रजा बाबत शिक्षिकांची अडवणूक करणे, हालचाल न भरता गैरहजर राहणे व नंतर सह्या करणे तसेच शाळेत गुटखा सदृश्य पदार्थ खाणे व झोपून राहणे अश्या अनेक विषयाच्या तक्रारीचा समावेश यात असून सदरील मुख्याध्यापकास मुख्याध्यापक पदाचा चार्ज काढून घेत तक्रार विशाखा समितीला कळवण्याची विनंती करण्यात आली आहे तसेच योग्य ती कायदेशीर कारवाई करून संरक्षण देण्याची विनंती येथील कार्यरत पाच पैकी तीन शिक्षिकांनी केली आहे. याबाबत गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर यांनी सदरील मुख्याध्यापकास मुख्याध्यापक पदावरून हटवले असून तक्रारी बाबत गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक जगदाळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून यात सदरील बाब शिस्त व वर्तणुकीचा भंग करणारी असून आपल्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1979 चा भंग केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये असा खुलासा पाच दिवसात सादर करण्यास सांगितले आहे.



## दहिवद येथे आढळले दोन रुखई जातीचे सर्प

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुक्यतील दहिवद येथील राजाराम कॉलनीत एका घराच्या छतावर चक्क दोन रुखई जातीचे दोन बिनविषारी सर्प दिसून आले. सर्पमित्र प्रेम बिऱ्हाडे यांनी दोघं सापांना ताब्यात घेऊन मूळ निवासात सोडले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दहिवद येथील राजाराम कॉलनीत एकाच घराच्या छतावर चक्क दोन साप दिसून आलेत याबाबत सिद्धू पाटील यांनी सातपुडा वन्यजीव संरक्षण समितीचे संचालक तथा सर्पमित्र प्रेम बिराडे यांना संपर्क करून माहिती दिली. सर्पमित्र प्रेम बिराडे हे तात्काळ येऊन त्यांनी दोघं सर्पांना ताब्यात घेतले. सदर सर्प बिनविषारी असून रुखई जातीचे असल्याचे सर्पमित्राने उपस्थितांना सांगितले. सर्पाची प्रकृती उत्तम असून त्यांना तात्काळ मूळ निवासात सोडणार असल्याचेही सर्पमित्राने यावेळी सांगितले.

## सोयगाव परिसरात अवकाळी पावसाने कापसाच्या वाती, गहू, हरभरा, रब्बीसाठी मात्र वरदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात बुधवार, गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने ग्रामीण भागाला मोठा फटका बसला आहे. हातातोंडाशी आलेली पिके तर हिरावली गेलीच आहेत.

अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची एकच तारंबळ उडाली. शेतकऱ्यांच्या वेचणीसाठी आलेल्या कापसाच्या मात्र वाती झाल्याने शेतकरीवर्ग पुन्हा एकदा अवकाळीच्या झटक्याने आर्थिक संकटात सापडल्याचे दिसून येते. दरम्यान, या पावसाने मोठया प्रमाणात पिकाचे नुकसान झाले असून काही पिकांना पाऊस वरदान ठरत आहे. या पावसामुळे सावळदबारा परिसरात नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. तर पावसाने वेचणीसाठी आलेल्या कापसाचे मोठे नुकसान झाले. शेतात साठवून ठेवलेल्या मकांच्या गंज्या झाकण्यासाठी शेतकरी वर्गात एकचं धांदल उडाली होती तर वेचणीस आलेला कापूस पूर्णतः ओला झाल्याने बळीराजाला आर्थिक फटका बसणार आहे. रब्बीचे गहू, हरभरा, ज्वारी या पिकांसाठी कालचा पाऊस जीवदान देणारा असला तरी अन्य पिकांचे नुकसान झाल्याने कभी खुशी कभी गम अशी गत बळीराजाची झालेली आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. कपाशी पिकांवर बोंडअळीचे प्रमाण वाढलेल्याने कैऱ्या सडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तर कापसाची आता चांगलीच वाट लागल्याने शेतकरी



आर्थिक संकटात सापडल्याचे दिसून येते. परिसरत झालेल्या पावसाने कापसाचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी चिंतातूर झाला आहे. अगोदरच अतिवृष्टीने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसामुळे खरीप हंगामासह रब्बीतील पिकांना देखील अवकाळी पावसाचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अवकाळी पावसामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे.

## पैठणगेट येथे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहीद अशपाक उल्लाह व रामप्रसाद बिस्मिल यांच्या शहीद दिनानिमित्त व अल्पसंख्याक समुदायाच्या विविध शैक्षणिक सावलीत बंद करण्याच्या विरोधात दिनांक 19 डिसेंबर रोजी पैठणगेट येथे दुपारी 4 वाजता धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. देशात व राज्यात सगळ्यात वाईट अवस्था सरकारने अल्पसंख्याक समाजाची आहे. त्यात शिष्यवृत्ती सारख्या योजना बंद करून अजून समाजाला खाईत लोटण्यासारखं हे सरकार करत आहे. या विराधात तंजीम ए इंसाफ व अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलनच्या वतीने सोमवारी दुपारी 4 वाजता पैठणगेट येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तंजीम ए इंसाफचे राज्य अध्यक्ष एस जी शुत्तारी राज्य सेक्रेटरी कॉ. अशपाक सलामी कॉ. डॉ. एस. एम नईम व अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलनचे राज्य सहसचिव कॉ. मधुकर खिल्लारे जिल्हा अध्यक्ष कॉ. भास्कर लहाने, कॉ. अतुल खंडगावकर, कॉ. मिलिंद काकडे, कॉ. अतीश गवळे यांनी केले आहे.

# उरल्यासुरल्यांच्या मोर्चालाही महाराष्ट्राने झिडकारले : उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उभ्या महाराष्ट्रातील उरल्यासुरल्या कार्यकर्त्यांची जमवाजमव करूनही महाविकास आघाडीला मुंबईत मैदानभर माणसेही गोळा करता आली नाहीत. उलट हिंदू दैवतांचा अपमान, संतांची कुचेष्टा करून समाजात धार्मिक तेढ पसरविणाऱ्या अपयशी महाविकास आघाडीला मोर्चे काढण्याचा अधिकारही नाही, अशी टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांनी केली आहे. महाराष्ट्रद्रोहींना धडा शिकवायचा म्हणून काढलेल्या मोर्चात महाविकास आघाडीने महाराष्ट्रद्रोहींनाच सन्मानाने मंचावर बसविले हा या आघाडीचा सर्वात मोठा विनोद आहे, अशी कोपरखळीही त्यांनी मारली. हिंदुत्वाचा गजर करत अंधारे बाईंसारख्या नेत्यांकडून कुराणातील अयाती वदवून घेणारे उद्धव ठाकरे यांच्या गटाची ताकद किती संपली हेच या मोर्चामुळे महाराष्ट्राला दिसले. काँग्रेस, राष्ट्रवादीबरोबरच जमवाजमव करून सोबत घेतलेल्या सर्व पक्षांनी मिळून मोर्चा काढण्याचा गाजावाजा करूनही राज्यातील जनतेने मोर्चाकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले. निवडणुकीत जनतेने ज्या पक्षांना नाकारले, त्या पक्षांना खोट्या व दिशाभूल करणाऱ्या कारणासाठी रस्त्यावरही साथ द्यायची नाही हे राज्यातील जनतेने दाखवून दिले आहे. उद्धव ठाकरे यांचा हिंदुद्वेष आता उघड झाला आहे. संतांचा, हिंदू देवदेवतांचा आणि स्वातंत्र्यवीरांचा अपमान करणारे व कुचेष्टा करणारे भाडोत्री नेते सोबत घेऊन उद्धव ठाकरे महाराष्ट्राच्या संत परंपरेची थट्टा उडवत आहेत. अशा नेत्याला जनता राज्यात थारा देत नाही हे लक्षात आल्यामुळेच जनाधार नसलेल्या पक्षांची जमवाजमव करून अस्तित्व टिकविण्याची केविलवाणी धडपड मोर्चामुळे उघड झाली, असे उपाध्ये म्हणाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सतत अपमान करणाऱ्या काँग्रेसचा आधार घेऊन संघटना बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ठाकरेंनी मागे वळून पाहिल्यास बाळासाहेबांच्या स्वाभिमानी सैनिकांनी पाठ फिरविल्याचे त्यांना दिसेल. पण अजूनही काँग्रेस-राष्ट्रवादीच्या कमकुवत कुबड्यांवर त्यांचा भाबडा विश्वास असल्याने त्यांच्या गटाला कोणीच वाचवू शकणार नाही, असा सणसणीत टोलाही त्यांनी मारला. संत, हिंदू दैवते, स्वातंत्र्यवीरांचा अपमान करणाऱ्या ठाकरे गटाच्या शिल्लक शिवसेनेविरोधातील असंतोष आज राज्यभर प्रकट झाला. राज्यात सुमारे सहाशेहून अधिक ठिकाणी भाजपतर्फे आयोजित माफी मांगो आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती उपाध्ये यांनी दिली.

## नगरसेवकाच्या भावाची दादागिरी; दोन गटात वाद

### कारवाईसाठी विलंब शहर पोलीस स्टेशन येथे ठिय्या



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भाजपचे नगरसेवक यांच्या भावासह साथीदारांनी मारल्याचा आरोप काही महिलांनी केला आहे व या घटनेनंतर कारवाईसाठी विलंब होत असल्याचा आरोपही तक्रारदारांनी केला व आम्ही पोलिसांना पैसे देऊन लगेच बाहेर येऊ असे धमकावून मारहाण केली, असे आरोप पीडित लोकांनी केला. शहरातील यशवंत नगर भागातील डीजे मध्ये नाचण्यावरून लहान मुलांमध्ये वाद झाला होता. लहान मुलांमध्ये झालेला वाद हा मोठ्यांपर्यंत पोहोचला. यात भाजपा नगरसेवका च्या भावासह त्याच्या साथीदारांनी दोन तरुणांना मारहाण करत त्यांच्या घराची देखील तोडफोड करण्यात आल्याची घटना घडली आहे. मारहाण करूनही हल्लेखोरांनी दोघ तरुणांना चार चाकी गाडीत टाकून मोराणे शिवारातील एका हॉटेलमध्ये पुन्हा जबर मारहाण करण्यात आली असल्याचा आरोप जखमी तरुणां च्या नातेवाईकांनी केला आहे. घडलेल्या घटनेमुळे यशवंत नगर भागातील नागरिकांनी शहर पोलीस स्टेशनशी संपर्क केला मात्र संपर्क करूनही पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल न झाल्याने संतप्त झालेल्या यशवंतनगर भागातील नागरिकांनी नगरसेवकाच्या भावासह त्याच्या साथीदारांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याच्या मागणीसाठी पोलीस स्टेशनच्या आवारात ठिय्या आंदोलन केले आहे. दरम्यान पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी जमावाची समजूत काढत गुन्हा दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. दुपारी उशिरापर्यंत शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याचे प्रक्रिया सुरू होती. पोलीस स्टेशनचे अधिकारी या घटनेचा अधिक तपास करत आहे.

## पैठण शहरात भाजपच्या वतीने पाकिस्तान मुर्दाबादची घोषणाबाजी



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शनिवारी पैठण येथे भाजपाच्या वतीने पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री राष्ट्राध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी  यांचा निषेध नोंदविण्यात आले. झरदारी यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जी-20 दरम्यान केलेले वक्तव्य हे अशोभनीय असल्याचे भाजप कार्यकर्त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात पाकिस्तानचा विदेश मंत्री बिलावल भुट्टो याने खालच्या पातळीवर केलेल्या टीकेचा निषेध करण्यासाठी आज भारतीय जनता पार्टी पैठणतर्फे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात तीव्र निदर्शने करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष तथा भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संभाजीनगर सुरज लोळगे, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा रेखाताई कुलकर्णी, भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडीचे जिल्हाध्यक्ष समिर शुक्ल, तालुका सरचिटणीस भाऊसाहेब बोरुडे, तालुका चिटणीस विजय चाटुपळे, बंडु आंधळे, सुनिल रासणे, सिध्दार्थ परदेशी, दाजी अंबेकर हरीपंडीत नवथर, अश्विनी ताई लखमले, ऋषिकेश बटुळे, विशाल पोहेकर, रमेश पाठक, योगेश गव्हाणे, कृष्णा लिंबोरे, सुरेश गायकवाड, रविराज क्षीरसागर, नितीन भिसे, रशिद कुरेशी, वैभव पोहेकर, लखन श्रीबास , सुरज पांडव, सुनिल वीर, योगेश धर्माधिकारी, कैलास बरकसे, गणेश डुकरे, लालू वीर, भगवान गालफाडे, एकनाथ जाधव, सोनटक्के मामा यांच्या सह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## धर्माबाद नगरपरिषद कर्मचारी- संवर्ग कर्मचारी संघटनेची कार्यकारिणी जाहीर

### भीमराव सूर्यवंशी अध्यक्षपदी, तर उपाध्यक्ष म्हणून नागेश अपलोड, सचिव किशन सोनकांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** नगरपरिषद कर्मचारी- संवर्ग कर्मचारी संघटनेची कार्यकारणी जाहीर झाली असून भीमराव सुर्यवंशी यांची अध्यक्षपदी, तर उपाध्यक्ष म्हणून नागेश अपलोड, सचिव किशन सोनकांबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या संघटनेचे माजी अध्यक्ष मोकले सुर्यकांत यांनी काही कारणास्तव आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. तसेच जुन्या कार्यकारणातील काही सदस्यांची बदली झाली तर काही सेवानिवृत्त झाले.



त्यामुळे संघटनेच्या कार्यकरणीत बरचसे जागा रिक्त होत्या.

या पार्श्वभूमीवर धर्माबाद नगरपरिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघटनेचे बैठक बुधवारी (ता.१४) संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राजु गुरलिंग स्वामी हे होते. या बैठकीत संघटनेचा अध्यक्ष म्हणुन भिमराव सुर्यवंशी तर उपाध्यक्ष नागेश अपलोड, सचिव किशन सोनकांबळे, कोषाध्यक्ष गंगाधर सूर्यवंशी, कार्याध्यक्ष राम मुळे, सहसचिव रमेश घाटे, महिला प्रतिनिधी चंद्राबाई मैलापुरकर, तुळसाबाई उत्तम कांबळे, सल्लागार सविता जुन्नेवार, सदस्य राजेश खटके, शंकर कांबळे, प्रवक्ता अशोक घाटे, मार्गदर्शक नरेश काटकर, गुरूलिंग स्वामी, गुरूनाथ कस्तुरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या नवनिर्वाचित कार्यकारणीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

